का०
७५१

भेटीगाठी

अशोक कामत

भेटीगाठी

(सहवास-चित्रांचा संग्रह)

अशोक कामत

मयूर प्रकाशन, पुणे २

प्रकाशक :
डॉ. ज्ञा. का. गायकवाड
मयूर प्रकाशन
७५५।२ गंज पेठ, नारायण निवास, पुणे २

सर्व हक्क सुरक्षित

मुखपृष्ठ, मांडणी
ल. म. कडू

प्रथम आवृती
मार्च १९७८

मूल्य : आठ रुपये

मुद्रक :
म. बा. जोशी
ज्ञानविलास छापखाना
२७ बुधवार पेठ, पुणे २

संदर्भ महर्षी तात्या ढमढेरे
आणि
मित्रश्रेष्ठ अनंतराव लिमये
यांना
सविनय सादर

' भेटीगाठी 'चे स्वरूप

माझा परिचित वर्ग खूप मोठा आहे. कर्तबगार लेखक-प्रकाशक अध्यापक-कलाकार अशा परोपरीच्या मंडळींचा सहवास लाभला. अशांना जवळून पाहणं, समजून घेणं आनंददायक असतं. मी ते बऱ्याच वेळा वृत्तपत्रीय माध्यमामधून काही निमित्तविशेषानं केलं. या कामामध्ये माझे विद्या-गुरू डॉ. रा. चिं. ढेरे, सन्मित्र आणि ' केसरी 'चे सहसंपादक श्री. वि. स. वाळिंबे, ज्येष्ठ स्नेही आणि ' सकाळ 'चे संपादक श्री. श्री. ग. मुणगेकर, साथी-सोबती श्री. सुधाकर प्रभु यांचे हार्दिक सहकार्य लाभले. जनमनापर्यंत जर औचित्यपूर्वक गेले, भल्या गोष्टींचा पुरस्कार करीत आणि प्रेरक कर्तृत्वाचा साक्षात्कार घडवीत गेले, तर आंतरिक समाधानही मिळते अशी माझी नम्र धारणा आहे.

प्रस्तुत संग्रहामध्ये सामान्यांचे असामान्यत्व आणि सन्मान्यांची थोरवी यांचा मेळ आहे. ते मूळचे वेळोवेळी वृत्तपत्रातून प्रकाशित झालेले लेखन. त्याला पुस्तक-रूप देताना त्यावर आवश्यक तो संस्कार करण्याचा प्रयत्न केला आहे. मूळ लेखनाची तारीख व प्रकाशनाचे माध्यम प्रत्येक सहवास-चित्राच्या शेवटी दिले आहे. या कामात प्रेमळ प्रोत्साहन दिल्याबद्दल महाराष्ट्र साहित्य परिषदेचे यशस्वी कार्यवाह श्री. म. श्री. दीक्षित यांचा मी ऋणी आहे.

ग्रंथाचे मुद्रक श्री. मधुकरराव जोशी, चित्रकार श्री. ल. म. कडू आणि मुद्रित शोधक श्री. गोविंदराव केळकर यांच्या परिश्रमाबद्दल त्यांचे आभार मानणे आवश्यक आहे.

प्रकाशक प्रा. यशवंत भिमाले, आणि डॉ. ज्ञानराज गायकवाड हे माझे एक तपाचे स्नेही-मित्र आहेत. साथी इरगोंडा पाटील आणि जुन्या मित्रांनी पुस्तक हौसेने काढले आहे. त्यांच्या स्नेह-प्रेमात राहणे आनंदाचे आहे.

' शिवश्री, ' २५८ सहजीवन, पुणे ९.
समर्थ रामदास नवमी ४ मार्च १९७८

अशोक कामत

अनुक्रमणिका

१. सकाळकारांचे स्नेहसौजन्यशील वारसदार–श्री. श्री. ग. मुणगेकर ७
२. आमची दीदी– सौ. ज्योत्स्ना देवधर १७
३. संस्कृतीचे रसिक उपासक– पं. महादेवशास्त्री जोशी २७
४. घरीदारी हरवलेला मेधावी माणूस– डॉ. रा. चिं. ढेरे ३६
५. मराठी प्रकाशनातील मनस्वी पण यशस्वी माणूस–
पं. अमरेंद्र गाडगीळ ४३
६. जिद्दीने आयुष्य वेचणारा अजब संग्राहक
अज्ञातवासी–दि. गं. केळकर ५०
७. सत्कारप्रसंगीही अलिप्तता जोपासणारा गूढ कलाकार–
श्री. चारुता सागर ५८
८. गांधीजींचा हिंदी सेवी अनुयायी– श्री. गो. प. नेने ६७
९. सद्सद्विवेकाला जागणारा शिक्षक– प्राचार्य ग. वि अकोलकर ७९
१०. चंदगीरामाशी वातचीत– मास्टर चंदगीराम ८६
११. कृत्रिम वाटणारा एक अकृत्रिम माणूस– भगवानराव पंडित ९३
१२. तुलसीरामाचा निष्ठावंत उपासक– फादर डॉ. कामिल बुल्के ९९
१३. निर्मळ कार्यकर्तृत्व आणि अपार स्नेह–श्री. वि. त्र्यं. शेटे वकील १०९
१४. विद्यार्थी आणि पालकांचे स्नेही सोबती–
श्री. कृ. वा. मोडक मास्तर ११५
१५. अद्भुत उद्योगात रमलेला लखनवी– पं. नंदकुमार अवस्थी १२१
१६. इतिहास जागविणे हाच एक उद्योग– श्री. माधवराव जोशी १२७

सकाळकारांचे स्नेहसौजन्यशील वारसदार

श्री. श्री. ग. मुणगेकर

आप्पा बळवंत चौकातल्या पुस्तक-पेठेत अनंतराव लिमयांचा व्हीनस बुक स्टॉल म्हणजे साहित्य-संस्कृति प्रेमी रसिकजनांच्या सहज सुखसंवादाची एक हक्काची जागा असायची. याच रसिक दरबारात केव्हातरी बारा-तेरा वर्षांपूर्वी अनंतराव मला म्हणाले,

'हे श्री. ग. मु. ! 'सकाळ' चे नंबर एक. नानासाहेबांच्या खास शिस्तीत तयार झालेले संपादक आहेत. आमचे चांगले दोस्त आहेत. आम्ही त्यांना भरपूर तसदी देतो. पण हे जाम रागवत नाहीत. कबूल ?'

कबुलीजबाबाचे निर्मळ हास्य मी पाहिले.

काळासावळा रंग, गोल चेहरा, त्यावर गंभीर भाव. पांढुरके होत चाललेले केस. मध्यम शरीरयष्टी. ही चष्मिष्ट व्यक्ती एखाद्या भारदस्त प्राध्यापकासारखी वाटली.

अनंतरावांकडे त्यांचं वृत्तपत्रविद्येशी संबंधित कुठल्याशा पुस्तकाचं बोलणं झाल्यावर निरोपाचं 'बराय' झालं. तेव्हा हाती हात घेऊन 'पुन्हा भेटू या' म्हणून ते परत एकदा प्रसन्नपणे हसले.

आपल्याशीच किंचित डोलले. तो सगळा सहजपणा ध्यानात राहून गेला.

पहिल्या भेटीत झालेला परिचय पुढे गहिरा होत गेला.... नंतरची प्रत्येक भेट ध्यानी राहिली ती हे सांगत....

.... हा संपादक राजकारणी नाही. त्याला पुढारपणाची मुळीच हौस नाही. सारा स्वच्छ कारभार. अध्ययनाची आवड. समाजातील दीनदुबळ्यांबद्दल आपुलकी. सर्वांच्या प्रश्नाबद्दल आत्मीयता, ' सकाळ ' शी विलक्षण निष्ठा. पहिल्यापासून 'सकाळ' मध्ये आहेत. तिथेच बातमीदाराचे संपादक झाले. जवळपास एकतीस वर्षे ' सकाळ ' ची सगळी सगळी स्थित्यंतरे अनुभवली आहेत. वृत्ती सदैव शांत ठेवण्याकडे कल आहे. अंगीकृत कार्यात अनवरत कष्ट करण्याची आणि समतोल साधण्याची मनापासून इच्छा आहे.

बी. कॉम्. झालेले मुणगेकर ऐन तारुण्यात ' सकाळ ' मध्ये आले ते बातमीदार म्हणून. नानासाहेब परुळेकरांच्या करड्या शिस्तीत त्यांनी वृत्तपत्रविद्येचे धडे गिरविले. १९५५ साली ' सकाळ ' नेच त्यांना नागपूरला वृत्तविद्या अभ्यास-क्रमासाठी पाठवले. वार्ताहर म्हणून पाकिस्तान सरहद्दीवर धाडले. हे सगळे करीत सह-संपादक म्हणून तब्बल पंचवीस वर्षे सपाटून काम केलंय. सकाळी ' सकाळ ' मध्ये यायचं. रात्री घरी जायचं. रात्र पाळी असेल तर संध्याकाळपासून दुसऱ्या दिवसापर्यंत ' सकाळ ' मध्ये राहायचं. उरला वेळही ' सकाळ ' साठीच द्यायचा.

.... मुणगेकरांची आपल्या व्यवसायावरची निष्ठा विलक्षण. जिद्द तशीच दांडगी. सहनशीलता कमालीची. सदैव शांत वृत्ती.

कष्ट करण्यात कसूर नाही. देहाचे लाड नाही की व्यक्तिगत सुख-दुःखाचा विचार नाही. गेली वीस-बावीस वर्षे त्यांनी मधुमेहा-सारख्या कट्टर शत्रूशी हसऱ्या चेहऱ्याने लढा दिला आहे. कायम पथ्य-पाणी. औषधांची संगत. पण कामात खंड नाही. प्रकृतीबद्दल साधे बोलणेही नाही.

मध्यंतरीचा एक प्रसंग . . . सन्मित्रांच्या सहवासाचा एक गप्पाटप्पांचा कार्यक्रम आखला होता. त्याला निमित्त होतं जिव्हाळ्याचं. मुणगेकर सहज आले. मैत्रीसाठी मोलाचा वेळ दवडला. राहिलं काम ते रात्री जागून केलं. मित्रासाठी स्वयं-सेवकाची भूमिका स्वीकारली. खाण्याचा आग्रह केला, तेव्हा केवळ स्नेहासाठी अपथ्यही केलं. त्यात जो आपुलकीचा अन् प्रेमाचा भाग होता तो शब्दांत सांगता येणार नाही. किंबहुना हेच त्यांच्या वागण्यामधलं बळ आहे. ते सहज वागून सर्वांना आपलंसं करू शकतात.

सर्व सहकाऱ्यांना सन्मानानं वागवायचं हा मुणगेकरांचा स्वभाव आहे. नानासाहेबांपासून त्यांनी सारे घेतले, पण कठोर-पणा त्यांना घेणेच जमले नाही.

त्यामुळे नानासाहेबांची गादी मुणगेकर कशी चालविणार अशी काहीजणांना स्वाभाविक शंकाही आली. पण शिस्तीने आणि धाकाने काम करून जसे घेता येते, तसेच सहकाऱ्यांना समजावून घेऊन आणि देऊनही कार्यभाग साधता येतो असा त्यांचा पिंड दिसतो.

मुणगेकरांना फोन करावा. ते सहज फोन वर भेटावेत. लगेच वेळ ठरावी. गेल्या गेल्या भेट व्हावी. पटकन बोलणं

घडावं. एखादी योजना त्यांचेसमोर ठेवावी, त्यांचा रुकार घ्यावा. कामाला लागावं. कामही व्हावं. त्यांनी दाद द्यावी. हा अनुभव अनेकदा घेतला.

मराठी साहित्य संमेलनासाठी किंवा हिंदी साहित्य संगोष्ठीसाठी गावोगावी जाणे घडले. अनेक कर्तृत्वसंपन्न व्यक्तींच्या मुलाखती झाल्या. किती तरी सामाजिक समस्यांचे भान घडले. सोपं आणि सर्वांसाठी लिहिण्याचा सराव घडला.

. . . या सर्व अनुभवामागे मुणगेकरांनी दिलेले प्रोत्साहन आहे. सहयोगातून सहयोग वाढावा असा त्यांचा निखळ स्नेहभाव आहे.

नानासाहेब असतानाची गोष्ट. गेल्या पिढीचे श्रेष्ठ कादंबरीकार नारायण हरि आपटे यांचा ऐंशीवा वाढदिवस होता. आकाशवाणीवरून रविवारी कार्यक्रम सादर व्हायचा ठरलेला. त्याच दिवशी पुण्यात संध्याकाळी समारंभ योजलेला. गुरुवारी मला मुणगेकरांचा निरोप अनंतराव लिमयांच्या करवी मिळाला. नानासाहेबांना वीस तासांत लेख हवा होता . . . प्रत्यक्ष ना. ह. आपटे यांना कोरेगाव येथे जाऊन भेटून त्यांची मुलाखत घेऊन लेख लिहायला हवा होता.

मुणगेकरांनी हसऱ्या शब्दात मला योजना सांगितली. हळूच ‘ नानासाहेबांची शिस्तही स्मरणात ठेवा ’ म्हणाले. मी लगेच कोरेगावी गेलो. लेख लिहिला. दिला. त्यात एक वाक्य होतं ना. ह. आपटे यांच्या बोलण्यात आलेलं . .

‘ सड तुटलेल्या वावडीसारखी माझी गत झाली. ’

मुणगेकरांनी या वाक्याची फेररचना केली . . . ' शेपूट तुटलेल्या पतंगाप्रमाणे माझी परिस्थिती झाली. '

' सुखाचा मूलमंत्र देणारा लेखक ' हे माझे शीर्षक ' थोर कादंबरीकार ना. ह. आपटे यांची ऐंशी वर्षे पूर्ण : ' सकाळ'साठी मुलाखत ' असे बदलण्यात आले. मी खट्टू झालो. मुणगेकरांनी मला समजावून सांगितले.

' आपला सकाळ सर्वसामान्य माणसांसाठी आहे. ' सुखाचा मूलमंत्र ' ही आपटयांची कादंबरी आहे आणि शीर्षका-मधून ते सुचवायचे आहे हे सर्वांना समजेल काय ? '

एखादी गोष्ट दुसऱ्याला पटवून देण्याची त्यांची पद्धतीही आर्जवी, अनाग्रही वाटावी अशी नम्र आहे. त्यांचं बोलणंही पटकन होणारं. ऐकणाऱ्याचं समाधानही लवकर होऊन जाणारं.

१९४७ साली दोन नोव्हेंबरला ते ' सकाळ'च्या सेवेत रुजू झाले. तेव्हापासून ' सकाळ एके सकाळ. ' आठ जानेवारी १९७३ ला नानासाहेबांच्या निधनानंतर संपादकत्वाची जबाबदारी मुणगेकरांचेकडे आली.

नानासाहेबांच्या शेवटच्या आजारातच मुणगेकरांवर नियमित अग्रलेखाची जबाबदारी आलेली. आजही त्यांचा अग्रलेख दुपारचा दुपारी होतो . . . अगदी ताजी बातमी पाहून. ताजा विषय, सुबोध मांडणी, स्पष्ट पण स्वतंत्र विचार. सर्वसामान्यांना सहज समजावी अशी सोपी भाषा हे नानासाहेबांचे ब्रीद होते. मुगणेकरांनी ते तंतोतंत पाळले आहे.

सकाळकरांचे म्हणणे असे . . ‘ वृत्तपत्र हे लोकशिक्षणाचे महत्त्वाचे साधन आहे. पत्रकार हा समाजाचा शिक्षक आहे ’.... मुणगेकरांनी हेही व्रत मोठ्या निर्धाराने आचरले आहे.

सभासंमेलने, परिषदा असोत अथवा छोट्या कार्यकर्त्यांची कामगिरी असो ... मुणगेकर उत्साहपूर्वक भाग घेतील. बोलायचं ते नेटकं, स्पष्ट, विचार करायला लावणारं बोलतील.

‘ सकाळ पुरस्कृत ’ उमेदवार आता दिसत नाहीत. पण सकाळ सर्वसामान्य वाचकांसाठी सर्वांची शक्य तेवढी तटस्थ ओळख घडवील. भल्याची प्रशंसा करील. चांगल्याचे अभिनंदन करील.

. . . आणीबाणीच्या काळात ‘ सकाळ’ने विलक्षण धैर्य दाखविलं. हुकूमशाहीची भलावण तर केली नाहीच. परंतु वीस कलमी वा अन्य कार्यक्रमांचा गाजावाजाही केला नाही. मंत्र्या-संत्र्यांना फाजील प्रसिद्धी दिली नाही. उलट स्वतंत्र बाण्याच्या व्यक्तींना कायद्याच्या चौकटीत जेवढी शक्य होती तेवढी प्रसिद्धी दिली. मुणगेकरांनी ‘सकाळ’चे ताटस्थ्य अधिक प्रभावी केले आहे. हे त्यांचा शत्रूसुद्धा मान्य करील.

‘ सकाळ’चे नूतनीकरण करण्यासाठी कितीतरी कल्पना पुढे आल्या. एखादे व्यंगचित्र टाकून त्यावर हलकेफुलके भाष्य-करावे असा बूट निघाला. ‘पी. एम्. टी. पुराण’ त्यातून झाले.

सामान्यांच्या साध्या अनुभवातही जीवनबोध असू शकतो या विचारातून ‘ उषःपान ’ आले. अग्रलेखाशेजारी गंभीर विषया-वरचा सारग्राही लेख येऊ लागला. वाचकांचा पत्रव्यवहार नेटका देण्यात येऊ लागला. समाजातील प्रासंगिक घडामोडींचे वृत्तांत

ताजेपणाने येऊ लागले. बातम्या वाढल्या. जाहिराती कमी करण्यात आल्या. नवा लेआउट आला. अशा सगळ्या नव्या गोष्टी 'सकाळ'च्या वाचकाची आवडनिवड ध्यानी घेऊनच सुरू राहिल्या वा बंदही झाल्या. मुणगेकरांपाशी 'अट्टाहास' नाही. सहजपणा आहे. त्यांचे सारे यश त्यातून सहज साधलेले आहे.

त्यांचे वाचन अखंड चालू असते. विविध सामाजिक समस्यांचा निरंतर विचार करावा, त्यासाठी संबंधित समाज-घटकांशी मनमोकळी चर्चा करावी, शक्य तेव्हा प्रवास करून प्रत्यक्ष भेटीगाठीतून समस्यांच्या सर्व बाजू समजावून घ्याव्यात असा त्यांचा मानस असतो. लिहिण्यामध्ये समतोल दिसतो. कधी कुणावर टीकेची झोड नाही की कुणाची वारेमाप प्रशंसा नाही. पण प्रतिपादन स्पष्ट, परिणामकारक आणि स्वतंत्र. ते वाचून जनमनाचा कानोसा कळावा, सर्वसामान्यांना दिलासा मिळावा. पुढारी मंडळींना शक्य तेथे पुनर्विचाराची संधी सापडावी.

मुणगेकर आकाशवाणीवरून बोलतात तेही मनःपूर्वक. एखाद्या आंतरराष्ट्रीय परिषदेचे सिंहावलोकन असो, वृत्त-विवेचन असो, त्यांचे बोलणे आग्रहाचे असणार नाही. आकाशवाणीच्या स्वायत्ततेसंबंधी चर्चा असो की बाल-मजुरांच्या भीषण अडचणींची ओळख करून देणे असो, त्यांचे बोलणे व्यासंगाचे वाटेल. पण त्यात कुठेही कुणाचा अधिक्षेप असणार नाही. विधायक विचार आणि सुबोध मांडणी त्यांनीच करावी.

पुणे विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या-विभागाशी एक जाणकार अभ्यासक-प्राध्यापक म्हणून त्यांचा नित्य संबंध आहे. या

विभागाच्या विकासातही त्यांचा महत्त्वाचा वाटा आहे. आपल्या अनेक नव्या विद्यार्थी-विद्यार्थिनींना त्यांनी वृत्तपत्र व्यवसायात प्रतिष्ठा मिळविण्यासाठी उत्तेजन दिले आहे. आज 'सकाळ'पाशी जेवढा ताज्या दमाचा नवपत्रकारांचा ताफा आहे, तेवढा अन्य वृत्तपत्रांकडे दाखविता येणार नाही.

आपला अग्रलेख जास्तीत जास्त वाचला जावा याकडे नानासाहेबांचा कटाक्ष होता. 'सकाळ'शी संबंधित व्यक्तींना अग्रलेखाबद्दल ते केव्हाही प्रश्न विचारीत. मुणगेकर या परीक्षेत कायम उत्तीर्ण झाले. आज त्यांचा अग्रलेख सर्वसामान्यांबरोबरच पुढारी, विचारवंत मंडळी आवर्जून वाचताना आढळतात. 'सकाळ'खेरीज अन्यत्र सहसा न लिहिण्याचे धोरण त्यांनी सांभाळले. पण त्यातही सहजपणा आहे. कधी आवडीच्या विषयावर आग्रहाखातर काही मासिकांतून आणि इंग्रजी वृत्तपत्रांतून त्यांनी लिहिलेही. आंतरराष्ट्रीय राजकारणाचे रागरंग तटस्थपणे बारकाव्यानिशी सांगणारे त्यांचे 'अमृत' अथवा 'किर्लोस्कर'-मधील लेखन वाचकांना आवडले. फ्री प्रेस जर्नल, अथवा स्टेटसमन-साठी त्यांनी इंग्रजीतून लेखन केलं. नानासाहेबांच्या काळात परदेशी वृत्तांचा उत्तम अनुवाद करण्याबद्दल त्यांना सतत शाबासकी मिळे. अर्थशास्त्र आणि भारताच्या आर्थिक समस्या हे त्यांच्या आवडीचे लेखन-विषय आहेत.

सध्या 'सकाळ'च्या संपादकत्वाचा, समाज-शिक्षक संपादकाला साजेशा सामाजिक कार्यक्रमांचा आणि वृत्तसंस्थांच्या अखिल भारतीय पातळीवरील कार्यांचा त्यांच्यावर इतका मोठा

भार आहे की, त्यांना हे सारे करण्यासाठी दिवस कसा पुरतो याचे कोडे वाटावे.

साडेपाच वर्षांपूर्वीच मुणगेकर 'सकाळ'चे मुख्य संपादक झाले आहेत. वार्ताहरापासून इथवर आले आहेत. प्रचंड जबाबदारी आणि फार मोठा अधिकार मिळाला तरी मुणगेकरांच्यात फारसा बदल नाही. साधी राहणी. निर्मळ चित्त. अपार कष्ट. मी आणि माझे काम. तुम्ही आणि तुमचे काम. ही पद्धती. म्हणून सर्वांचा लोभ संपादन करता आला आहे.

'मुंबई सकाळ' यशस्वी झाला आहे. त्याचा उत्तरोत्तर विकास होतो आहे. पुण्याला 'सकाळ'चा खप लाखाच्या घरात होता तो दीड लाखापर्यंत गेलाय, सहजपणाने गेलाय. जाहिराती कमी केल्या आहेत तरीही एका बाजूला आर्थिक यश आहे. दुसऱ्या बाजूला वाचकांची प्रसन्नता आहे.

'सकाळ'चे आंतरबाह्य स्वरूप देखणे होत आहे....'सकाळ' कचेरी आता आलिशान झाली आहे. आवार उजळले आहे.

कर्मचाऱ्यांची संख्या वाढली आहे. कामाचा व्यापही-नित्य मोठा होतो आहे.

पण मुणगेकर अजून चालत जाण्या-येण्यात आनंद मानू शकतात. साधा पेहराव . . फिकट रेघांचे बुशशर्ट, साधी पँट, साध्या चपला. त्यांच्या जाण्या-येण्याचा आवाज येऊच नये असे चालणे. सकाळपासून रात्रीपर्यंत सकाळ कचेरी. अग्रलेख स्वतःच्या हातांनी लिहायचा. रोजचा रोज. त्याचे प्रुफ पाहायचे. तपासायचे. येणारे-जाणारे नाना प्रकारचे. त्यांची कामे अनंत.

सभासमारंभ सारखे एका मागोमाग. पण सर्व मंडळींना मुणगेकर वेळ देतात . . . समाजाच्या भल्याच्या प्रत्येक उद्योगात भाग घेतात. अभ्यासपूर्वक बोलतात.

अभिनिवेश नाही. पक्षपात नाही. समतोल साधून आहेत. सकाळकारांचे समाज शिक्षणाचे व्रत त्यांनी अखंडपणे चालविले आहे. कै. नानासाहेब परुळेकर आणि त्यांच्या असंख्य चाहत्यांना संतोष वाटावा असा हा सारा प्रशंसनीय प्रवास सुरू आहे.

४ मार्च १९७८

卐 卐 卐

आमची दीदी

सौ. ज्योत्स्ना देवधर

दीदीची नि माझी विशेष ओळख स.प. मधल्या आमच्या विद्यार्थीदशेतली. १९५८ साल. मी पी. डी. ला. दीदी बहुधा बी.ए. ला. ज्यूनियरचं वर्ष तिचं. आमचं पहिलं नाटक बसवलं. दीदीच्या घरीच जमलो सगळी. मला आजारी नवऱ्याचं काम दिलं. चार दिवस केलं. पुढं मी कंटाळलो. पण दीदी जिद्दीची. नाटक तिनंच लिहिलं होतं. 'सोमा.' पुढे दिल्लीला स्पर्धा झाली. आकाशवाणीकडून बक्षीस मिळालं. हिंदीचे आम्ही विद्यार्थी खूप ॲक्टिव्ह होतो. दीदी ही आम्हा सर्व मंडळींना वडिलधारी, पण तिचा उत्साह आमच्यापेक्षा जास्त. शिवाय तिला गती सगळ्याच विषयांत. नाटक करणं असो की लिहिणं असो, कथा-वाचन असो की कथा-लेखन असो, दीदी सतत आघाडीवर. अठ्ठावनमध्ये कॉलेजातली आणि बाहेरील कुठली कुठली झाडून सगळी बक्षिसं तिनं पटकावलेली. तेव्हापासून आम्ही ज्यूनियर मंडळी दीदीला मानतो हीरो ऑफ अवर ग्रुप म्हणून ! दीदी पुढे, आम्ही मागे. भरपूर भाव. एरव्ही हिंदीचे विद्यार्थी म्हणजे आचार्य

...२

संप्रदाय, शेळीचे दूध आणि खजूर. खद्दर आणि मफलर शबनम. आम्ही चंट होतो. रसिक होतो. दीदी आमच्यात सहज तर मिसळायचीच पण खाणेपिणे, गप्पागोष्टी, साहित्य, कला, राजकारण काही काही तिला वर्ज्य नाही. मोठा मझा होता.

दीदीच्या शिक्षणाची तशी मोठी मौजच आहे. ती मूळची राजस्थानातल्या जोधपूरची. वडील तिथं संस्थानचे ऑडिटर. घरीदारी नोकरचाकर. अमृतसरचा तांदूळ, पंजाबचा गहू, बारमेरचं तूप. ज्वारी-बाजरी तर माहितीच नाही. घर भलंमोठं, तेही मुला-माणसांनी सतत भरलेलं. सगळी रेलचेल. राजघराण्यातल्या मंडळींशी ओळख. कशा कशाची म्हणून ददात नव्हती. आणि त्यातून दीदीही तशीच हट्टी. खेळात दंग, गणितात कच्ची. सातवीमध्ये तर दोनदा चक्क नापास. मराठी हा विषय तिच्या गावीच नव्हता.

बेचाळीसमध्ये पंधरा वर्षांची दीदी लग्न होऊन पुण्यात आली तेव्हा नववीपर्यंत शिकलेली. तेही सर्व हिंदीतून. मराठी बोलायची, पण कसं ? मजेचं.. ' घरात आटा नाही. चक्कीवर पिसून आणला पाहिजे.' 'आजची दाल अच्छी झाली.' ' काय पकवायचं आज '....हे असं! पण दीदी फार लवकर देवधर मंडळीत रमली. तिनं जोधपूर सोडलेलंच. पुण्याला आपलं म्हटलेलं. वर्षाच्या आत तिनं सासरचं सगळं सवयीचं केलं. ती आई झाली सोळाव्या वर्षी. विजयचा जन्म त्रेचाळीसचा. मारवाडातला भयंकर उन्हाळा, त्यातून मुलगा भारी अशक्त. सर्दी-पडशापासून विषमज्वर घटसर्पापर्यंत सगळे आजार लहानपणीच त्याने भोगले. एकदा तर त्याचा आवाज गेला ! पण नवससायास, अवचित

मंगळवार, अंगारे-धुपारे, व्रत-वैकल्ये. दीदी हे सगळं करायची. अगदी जुन्या जमान्यात जाऊन करायची. विजय सर्वांचाच लाडका मुलगा होता ना! दीदीच्या घरी मुलींचं प्रस्थ. दीदी जेव्हा विजयासाठी केलेल्या अंगाऱ्याधुपाऱ्याचं सांगते तेव्हा अंगावर काटा येतो. दीदीचे डोळे ओलावतात.

विजय बेटा पुढे चांगला तगडा झाला. पण त्याची पहिली सात-आठ वर्षं अजब गेली. दीदीनं त्याच्यासाठी खूप खूप सोसलं, खरं तर गृहिणी म्हणून दीदी मोठी झाली ती आकाशवाणीवर येण्यापूर्वीच, विजयच्या पालनपोषणाच्या काळात. हा विजय पुढे माझा माडीवाले कॉलनीतला खेळगडी बनला. त्यावेळी दीदी म्हणजे आम्हाला खाऊ देणारी विजयची आई आणि बॅडमिंटनची रॅकेट घेऊन महिला मंडळात जाणारी देवधर वहिनी म्हणजे एक उत्साहमूर्ती होती. तिचा तो हसरा बोलका स्वभाव, स्नेहशील वागणूक आणि काहीतरी नवे नवे वाचू–लिहू–करू अशी धडपड नवी नाही. मला तर ती माझ्या लहानपणापासून ठाऊक आहे आणि कदाचित म्हणून.... होय, म्हणूनच ज्योत्स्नाबाईंचा लेखनसंसार मी आपली दीदी म्हणून पाहिला, वाचला आहे.... विजयच्या आईचा म्हणून ध्यानात ठेवला आहे.

आजारी विजयला धट्टाकट्टा करायची तब्बल सात वर्षं दीदीची तपश्चर्या चाललेली. आणि ते शिक्षण विलक्षण होतं एकूण. दीदीनं सगळं पचवलं. मग पन्नास साली चंदा झाली. त्या वर्षी दीदीच्या मनानं घेतलं आता मॅट्रिक व्हायचं. पण कुठलं काय नि कुठलं काय ! चंदानं देखील परीक्षा सहज देऊ दिली नाही. त्यातून दीदी मॅट्रिक व्हायची म्हणजे काय साधी गोष्ट

होती ? तिचं आणि मराठीचं बोलण्यापुरतं जमलेलं. लिहिण्यात म्हणजे, आफतच होती की !

मग एकदाचा मॅट्रिकचा मनसुबा प्रयत्नांची पराकाष्ठा करून पुरा झाला तो १९५४ साली. त्यासाठी मुक्काम पोस्ट नागपूर ! हिंदी माध्यमातून शालांत परीक्षा. मराठी तिथं नव्हतंच. मराठीच्या कचाटयातून सुटल्याचा आनंद. शिवाय लग्नानंतर तब्बल तेरा वर्षांनी जिद्दीनं महाराष्ट्राच्या दुसऱ्या टोकाला जाऊन, मराठीची धोंड टाळून एक परीक्षा पार केल्याचा हर्ष वेगळाच.

पण या परीक्षेच्या लढाईत आणि घरसंसाराच्या धामधुमीत दीदी आजारी पडली. डोळे बिघडले. कितीतरी वैताग आला. सरतेशेवटी एकदाचे मराठी टाळून मॅट्रिक पदरात पडलं. या उत्साहात दीदीनं समाजसेवा सुरू केली. कुठे काडेपेटयांच्या उद्योगधंद्याचा सर्व्हे घे, कुठे वर्गण्या गोळा कर, महिला मंडळात काम कर, बॅडमिंटन, बालकमंदिर, पालक सभा, नाटक वगैरे.

देवधरांनी दीदीमागे लकडा लावला, 'हुषार आहेस. स. प. कॉलेज जवळ आहे, पुढे शीक !' त्यातून हिंदीची स. प. मध्ये सोय झालेली. दीदीच्या हे पथ्यावर पडलं, पण बी. ए. च्या परीक्षेच्या वेळी आजवर टाळलेलं संकट ओढवलंच....'मराठीचा पेपर लिहायचा !' हिंदीबरोबर मानसशास्त्र सहज जमतं, पण दुसरी भाषा? संस्कृत आवडीचं नव्हतं. इंग्रजी खरोखरीच परदेशी भाषा. संबंधच नाही. संकोचही त्याबद्दल नाही. मग ओघाओघानं आलं मराठी ! महाराष्ट्र-भाषा ! यक्षप्रश्न ! आता बी. ए. ला या मराठीमुळे किती वाऱ्या कराव्या लागतील ?

—पण दीदी मोठी जिद्दीची. तिनं मगभनपासूनची मराठी पुस्तके आणली. पहिली ते बी. ए. अशी सगळी मराठीची क्रमिक पुस्तकं वाचली.सपाटून अभ्यास.कोणता तर म्हणे मराठी! आयुष्यात प्रथमच मराठीचा पेपर लिहिला आणि बी. ए. झाली. त्याच वर्षी सगळ्या महाविद्यालयीन स्पर्धांत तिनं कितीतरी बक्षिसं पटकावली. बी. ए. हिंदीत पहिली आली. मग लगेच एम्. ए. आणि ते करता करता आकाशवाणी केंद्रावर नोकरीही चालून आली. दीदी म्हणते, 'मला खरंखुरं मराठी शिकायला जे मिळालं ते रेडिओवरच!'

दीदीला पहिल्यापासूनच नाटकांची आवड. ५८ साली तिनं 'माँ' लिहिलं, मग 'सोमा'. मला आठवतंय, यात मी दीदी-बरोबर काम केलं होतं, काही काळ. हे नाटक दिल्लीला आकाश-वाणी स्पर्धेत गाजलं. दीदी फार चांगलं काम करायची. तिचा आवाज विलक्षण. पुढे 'गृहिणी' त तो सतत गाजत राहिला.

तब्बल सोळा वर्षे दीदीनं 'गृहिणी' सांभाळली. शिवाय काही काळ आणि बरेच वेळा बालोद्यान, हिंदी कार्यक्रम. या सर्व उद्योगात सतत उत्साह राखला. नित्य नव्या कल्पना, योजना आखल्या. त्या यशस्वी केल्या. हे करताना घरचे गृहिणीत्वही राखले. अगदी आजसुद्धा दीदीला घरच्या लोणच्या—मसाल्याची हौस आहे. पापड लाटणं दर वर्षीचं आहे.घरात काही कमी नाही. पण हौस दांडगी. दीदी हे सगळं अभिमानानं सांगते.

आकाशवाणीवरची गृहिणी आणि घरची गृहिणी यात विसंवाद असा नव्हताच म्हणून 'गृहिणी' यशस्वी. दीदी लेखनाचा प्रपंच फार अलीकडे करायला लागली. तो प्रपंचही सगळा खरं तर हिंदीतूनच व्हायचा, पण....त्याचं असं झालं.

दीदीनं एक कथा लिहिली. 'पायल.' ५८ सालातच ती 'धर्मयुग 'मधून गाजली. मग हळूहळू हिंदीतच काहीबाही लिहिलं. राष्ट्रभाषा सभेनं संग्रह काढला–'अंतरा.' १९६७ मध्ये दीदीच्या पहिल्याच वाङमयीन अपत्याला भारत सरकारचं पारितोषिक मिळालं. पण हिंदी प्रकाशक काही दीदीकडे आले नाहीत.

मग दीदीच मनाशी म्हणाली, हिंदीत लिहायचं आणि महाराष्ट्रात राहायचं हे नाही नीट जमायचं. आपण चक्क मराठीतच लिहून पाहू जमतयं का ते! आणि दीदीनं लिहिली तिची पहिली कादंबरी. मोठी गंमत आहे ती एक. दीदीच्या वाचकांना खास खरी वाटायची नाही ती. पण आहे खरी. त्याचं असं झालं, दीदीचे वडील होते जरा आजारी. दीदी गेली भेटायला. भेट झाली. त्यांना बरं वाटलं, दीदीलाही माजघरात आई म्हणाली, सहज 'बायकांचं बरं बघ. मृत्युपत्रबित्र काही नसतं तयार करायचं. मला आधी मरण येईल तर....' ऐकणारी दीदी हरखली. मग तिनं वही भरून काय काय लिहिलं....बायकांचा जन्म. इथूनतिथून दुसऱ्यासाठी जगायचं आणि कर्तव्यं झाली की निघून जायचं. मागं काय उरतं? ....दीदीची वही 'मृत्यूपत्र' या विषयावर झालेली. तेच नाव दिलं, त्या साऱ्या मजकुराला. एक दिवस टिळक रोडला भाजी आणायला निघाली तेव्हा वहीदेखील घेतली बरोबर आणि 'तरुण भारत' कचेरीत आली. खाली पाटी होती ना 'नरकेसरी प्रकाशन!' कुणीसं म्हणालं, 'मजकूर आहे का? मग रविवार विभागात जा काकतकरांकडे.' दीदी कशीबशी गेली तिथं.म्हणाली, 'हे माझं मृत्युपत्र आणलंय. बघा छापता येण्यासारखंय का ते!' आणि तशीच परतली. संपादक मजकुरांनी दीदीची वही भल्या मोठ्या पसाऱ्यात ठेवून दिली. विषय संपला.

काही दिवसांनी दीदी परत गेली चौकशीसाठी. संपादक म्हणाले, 'मजकूर चांगला आहे. दिवाळी अंकात जागा आहे. घेण्याचा प्रयत्न करू, पण दिवाळी अंकात मृत्युपत्र !' दीदी– 'मग हात्तिच्या ! एवढंच ना ? नाव टाका की बदलून !'

संपादक–अहो इतकं का सोपं असतंय का हे ?

दीदी– नाही म्हणजे, मीच सुचवू का ? पाहा बाई चालेल का ! माझं आपलं घरगुती नाव आहे ह्या वहीचं. जरा चमत्कारिक आहे म्हणून म्हणत्ये.

संपादक–काय बोलू मी ?

दीदी–सांगत्येच–'घरगंगेच्या काठी' मी तर वहीला हेच नाव ठेवलंय.

संपादक बेहद्द खूष झाले. 'अहो, चांगलं म्हणजे काय उत्तम नाव आहे.'

अल्पाक्षरी भाषा, अर्थबहुल शब्द त्यांचं सौंदर्यही वाचकाला मोहवून टाकणारं. स्त्री-जीवनाचं अगदी वेगळं दर्शन. खरं. वास्तव. त्यातलं अवलोकन सूक्ष्म. तपशील हृद्य. मनोरंजकही. शिवाय काहीतरी विलक्षण अनुभव हलकाफुलका वाटेल असा. पण तरीही तुम्हाला आम्हाला गुंग करणारा.

कादंबरी गाजली. हातोहात खपली. प्रथम प्रकाशन म्हणून कौतुकाचं बक्षीस. आणि श्रेष्ठ कादंबरी म्हणून हरिभाऊ आपटे पारितोषिकही. दीदीला राजमान्यता मिळाली,पण यामागे तिचा अफाट मराठी शिक्षणाचा उद्योग होता. हिंदी कथा–साहित्य वाचनाचा दांडगा छंदही होता. गंमतच सांगायची तर तिने अगदी बिगरी पहिलीपासून एम्. ए. पर्यंतची सगळी मराठी क्रमिक

पुस्तके केवळ अभ्यास म्हणून वाचली ! मला मराठी आलं पाहिजे हा ध्यास !

दीदीला मराठी आलं. साधं, सोपं, सुंदर. अनुभव नाना परीनं व्यक्त करणारं. असं सुरेख मराठी की, ज्याला तोड सापडू नये. रस, रंग, रूप, नाद, गंध सारं कसं हां हां म्हणता व्यक्त करणारं मराठी. या ओघवत्या भाषेला सहजपणा आहे. गोडवा आहे.

' कल्याणी, ' ' कडेलोट, ' ' चुकामूक, ' ' ऐलतीर पैलतीर, ' ' कुंवरनी, ' ' वाळूचं फूल, ' चिमणीचं घर मेणाचं, ' ' उत्तर योगी, ' अशा दीदीच्या कादंबऱ्या वाचकांनी झेलल्या. टीकाकार कधी नाराज, कधी थक्क झाले. कुणी तिला कला अ–कला वादाचा विषय बनविले. कधी शरद्बाबूंच्या जोडीला नेऊन बसविले.

दीदीची कथा ' उध्वस्त, ' ' बोच, ' ' गाऱ्या गाऱ्या भिंगोऱ्या, ' ' गजगे, ' ' आकाशी, ' अशी संग्रहित झालीय. ' हो नाहीच्या उंबरठ्यावर ' ही तिची मायलेकीची पत्रावली गाजली. ' सेजदा ' ही तिनं कुमारांना दिलेली भेटही त्यांना आवडली. आणि हे सगळं आहे अवघ्या आठ--दहा वर्षातलं ! एवढंच कौतुक नाही. ज्या ज्योत्स्नाबाईंना मराठी येत नव्हतं, त्यांचं हे यश आहे. त्यामागे विलक्षण प्रयत्न आहे. वेगळेपण आहे. धीटपणा आहे. प्रामाणिकपणा आहे. श्लीलअश्लीलच्या वादात त्यांना अर्थ दिसत नाही. पण गलिच्छ लिहू नये असा त्यांचा स्वर आहे. ' कुंवरनी ' वर कुणी टीकास्त्र सोडले, तेव्हा ' हे बाईने लिहू नये, ' ' पुरुषाने लिहिले तर चालेल ' अशी काही महाभागांची शिफारस त्यांना हास्यास्पद वाटली. टीकाकारांनी खुशाल दोष काढावेत,

पण जे बरे आहे ते खरे तर सांगावेच, असा त्यांचा रास्त आग्रह आहे. तोही त्यांना विचारला तर त्या सांगतात. एरव्ही नाही.

दीदी पहिल्या मराठी कथालेखिका–संमेलनाची अध्यक्षा झालीय. 'कष्टाच्या मानाने यश मिळालं' इतकाच तिला आनंद आहे. मी म्हणालो, 'क्रेडिट कुणाकुणाला द्यायचं ?' दीदी मनापासून मग बोलत राहिली....

'शरद्बाबू, जैनेंद्र, अमृता प्रीतम हे तुमच्या आमच्या आवडीनिवडीचे लेखक आहेत. यांनी मला साहित्याचा आनंद शिकवला. रेडिओनं मला बहुश्रुत बनवलं. खरं तर मराठीही शिकवलं. माझी अभ्यासाची सवयच गेली होती, पण माझ्या हौसेला मिस्टर देवधरांनी सतत प्रोत्साहन दिलं. ते वाचूनसुद्धा दाखवीत. भूपटकर बोलूनचालून शिक्षक. ते शुद्धलेखनाचा, चांगलं वाचण्याचा लकडा लावीत. त्यांचा दरारा वाटे. आणखी एक न विसरण्यासारखं नाव आमच्या शंकरचं आहे.'

हा शंकर दीदीच्या घरचा हरकामी ठेकेदार. पण चाकरी करताना त्याची निष्ठा मुलखावेगळी. दीदीची कथा पोष्टात टाकताना बहाद्दर पोष्टाच्या पेटीला नमस्कार करून यायचा–कथा आली पाहिजे म्हणून !

आता आमची दीदी कृतज्ञ आहे ...धीट बनून लिहिले, नवे लिहिले, त्याचे वाचकांनी उदण्ड स्वागत केले. 'कल्याणी' वर नाटक झालं. 'घर गंगेवर' चित्रपट झाला. अलीकडे त्यांचं मुलांसाठी नाटकं गाजलंय, 'आजीची छडी गोड गोड छडी' नवे अनेक संकल्प आहेत. कितीतरी कथा, गोष्टी–कितीतरी कादंबऱ्या. मुख्य म्हणजे 'अजून एखादे उत्तम पुस्तक लिहायचं आहेच की !

दीदीचे हे म्हणणे खरे झाले पाहिजे अशी तिचीच जिद्द आहे आणि दीदीचा एकूण मराठीतला प्रवास ज्याला ठाऊक झाला तो म्हणेल, दीदीनं ठरवलं, तर काहीच अवघड नाही. आणखी एक गोष्ट आहे आणि ती फार महत्वाची....' दीदी टीकेला भिणारी नाही, टीकेतून शिकणारी आहे. हे तिचं बळ भाषेत आहे आणि धीट अनुभवात आहे हे तिचं तिला पक्कं ठाऊक आहे. शिवाय आपण लेखिका म्हणून स्वतंत्र आहोत. माझ्या लेखनवाचनात ' नोबडी डॅबल्स ! ' हा तिचा उत्साह टीकाकारांनी हेवा करावा असाच आहे. दीदीच्या घरगंगेच्या काठी अखंड आनंद आहे. नातवंडं भरपूर करमणूक करणारी. सगळं स्वास्थ्य मिळालेलं. जीवनाचा विचार केलेला. त्यानं मानसशास्त्रीय दृष्टी राखलेली. कोण काय म्हणेल हा भेकड विचार एकूण पटण्यासारखाच नाही, म्हणून आम्ही म्हणायचं ते म्हणालो तिचं अभिनंदन करून, 'दीदी, आगे बढो ' हिंदीत आता लिहायचं नकोच, अनुवाद करणारे करतील. तुम्ही मुक्तपणानं लिहा. धीट आहातच. अनुभव वाचणाऱ्यांना धीट बनण्यात आनंद वाटावा असं तुमचं भाषावैभव आहे. अनुभवविश्व आहे.

'जत्रा ' साप्ताहिक, २८ सप्टेंबर १९७५

卐 卐 卐

संस्कृतीचे रसिक उपासक

पं. महादेवशास्त्री जोशी

जमाना आहे डॉक्टरांचा. एखाद्या विषयाचा बारीकसारीक अभ्यास मंडळी करायला घेतात. मग मार्गदर्शकाच्या ज्ञानयोगाचा क्वचित् त्यांना लाभ मिळतो. काहींना कर्माचा संयोग लाभतो. बरीच मंडळी ' मना सज्जना भक्तिपंथेचि जावे ' म्हणतात.

बाकी कुठल्याही प्रकारे एकदाचे डॉक्टर होऊन जाण्यात ' मझा ' आहे. लोक डरून असतात; शिवाय मूठ झाकली राहते. कधी कुठे कुठे दाबलीही जाते म्हणतात. कुणाची चालेल तोवर मौज असते. असा हा चालू जमाना—थोर विद्यालयातील ज्ञानी डॉक्टरांचा.

विद्या-व्यासंगाचे वेड घेऊन, आला दिवस भला म्हटलेल्या शास्त्री-पंडितांचा काळ पडता आहे. त्यांच्या कुठल्या आडगावच्या भाषणांची चार दोन ओळींची वृत्तं आली तर येत असतात. चाहते षष्ठीपूर्ती समारंभ उरकण्याचा उत्साह दाखवतात. त्याचे श्रेयही बहुधा बड्या नेत्याकडे द्यावयाची प्रथा आहे. ' बुडती हे जन साहवेना डोळा ' म्हणणारे बिचारे सज्जन या शास्त्री–

पंडितांविषयी मनाच्या सांदी-कोपऱ्यात कुठे तरी थोडा आदर ठेवतात. अलीकडे तेवढा देखील राहील की नाही, शंका आहे. काही शास्त्री बुवाबाजी करतात, असा प्रवाद आहे. उबग येऊन वारंवार त्यासंबंधी लिहिलं–बोललंही जातं. पण एकूण काळजी वाटावी अशी ही व्यासंगाची स्थिती. कुठं असंगामुळे, तर कुठे सत्संगामुळे.

हे सारे आठवले एका तपोवृद्धाच्या ताज्या आठवणींनी. महादेव सीताराम जोशी त्यांचं नाव. वय वर्षे ६५. अजून दृष्टी उत्तम, अंगकाठी शिडशिडीत. पण ठेंगणीठुसकी आकृती मोहक. शुभ्र वस्त्रें नीटनेटकी. त्यावर टोपी स्वच्छ घडीची. सारी खादीच. पण आतबाहेर निर्मळ. शाल पांघरण्याची हौस, किंचित हसत शांतपणे चालणं–नाकासमोर. कुणी भेटला तर प्रेमपूर्वक नमस्कार. कळावे, लोभ असावा, इतकंच. विशेष विनंती नाही. पायघोळ बोलणे नाही, अघळपघळ मस्करी, विनोद चालेल, पण गावगप्पा नको.

आखून घेतलेला सरळ सीधा मार्ग, संथ चाल. सांप्रत मुक्काम धायरी-खडकवासला. सिंहगडाकडे जाणाऱ्या रस्त्याने पुण्यापासून अंतरावर यायचं. पुन्हा रस्त्यापासून सरळच आत खेडुतांच्या वाडीत पोचायचं. इथं जोशीबुवांची छोटी मठी आहे. 'असावे घरकुल अपुलें छान ' अशी, स्वत:ला हवी तशी.... या शांत खेड्यात प्रसन्न मनाचे, दृढ संकल्पाचे, गाढ्या व्यासंगाचे महादेव सीताराम जोशी राहतात. गावकऱ्यांनी त्यांना आणि त्यांनी गावकऱ्यांना आपले म्हटले आहे.

पुण्यात आणि मराठी मुलखात त्यांचे पंडित महादेवशास्त्री जोशी हे नाव आहे. जनमनात प्रतिष्ठेने ते जतन झाले आहे. पण

सध्या हे त्यांच्या गावीही नसावे. माझ्या आहे तेवढ्या परिचयात ही समजूत बळावली आहे. निकटच्या परिसरात त्यांना आम्ही बाबा म्हणतो. दुसऱ्यांशी बोलताना शास्त्रीबुवा मीही वापरतो. पण चार लोकांसारखे म्हणायचे म्हणून मनातला आदर त्यांना तीर्थरूप बाबा म्हणून प्रथम, मग रसिक पंडित म्हणून अभिवादन करील.

शास्त्री तर ते आहेत. पण त्यावर बुवाने मात केलेली नाही. ग्रंथपांडित्य विद्वज्जनांत चर्चेचा विषय ठरते. पण रसिक पंडिताला त्याच्याशी वावडे नसते. पांडित्य-चर्चेवरून एक गोष्ट आठवली. महात्मा गांधीची आहे. सैयद अहमदांनी अलिगढ मुस्लिम विद्यापीठाचा उद्योग सुरू केला. कुणाला आनंदाने, तर कुणाला उसने अवसान आले. एक भक्त महात्माजींना म्हणाला, ' बापूजी, हा सैयद तर भलतेच करून राहिला आहे.' त्यावर महात्मा शांतपणे उद्गारला, ' पण तो काही तरी करून राहिला आहे. तुमचे तर नुसतेच गर्जन सुरू दिसतेय. '

शास्त्रीबुवा रसिक आहेत. साक्षेपी आहेत. अध्यवसाय त्यांनी त्यांच्या स्वभावात बाणवला. म्हणून ते रसिक पंडित झाले. या त्यांच्या रसिक पांडित्यानं त्यांना भारतीय जनजीवन संस्कृती आणि नाना धर्म-संप्रदाय-विचारांच्या विविध क्षेत्रांत रमवून टाकले. हा उद्योग अनंत पण शास्त्रीबुवांची जिद्द त्याहीपेक्षा अनंत.

सारे ठरविले आणि तसे झाले. आता चांगले आहे. जीवनाचा किती तरी प्रवास सरला. आता उरली सायंकाळ-कुणी सृष्टीची शोभा पाहून व्यतीत करतो, कुणी सभासंमेलनांतून उपदेशाचे कुंभ रिते करून धन्य व्हायचं, मग छान गुच्छ–तुरे–हार घ्यायचे. पण बाबांचा अशा मार्गावर लोभ दिसत

नाही.... धायरीच्या मठीशेजारी गोमांतक आणून त्यांनी सृष्टीशी स्नेहाची सोबत साधलीय. घरच्या झाडा–फुलांचा ताजा गंध. हातांनी पेरल्या–पिकवल्या फळा–भाज्यांचा स्वाद, सारी मशागत जिवेभावे केलेली. गोशाळेतील गाई-म्हशीचे शेण काढण्यासही कचरणे नाही ... हा प्रकारच न्यारा आहे. संस्कृती जगल्याने लाभलेल्या बळातून संस्कृति–कोशाची रचना नित्य नव्या गतीने सुरू आहे. आनंद आहे. मन निवान्त आहे.

आजवर तसे किती तरी बोलणे झाले. प्रवचनकाराचा, पुराणिकाचा व्यवसाय पत्करावा लागलेला. शिवाय ते अफाट वाचून बोलून दाखवल्याशिवाय राहवत नसावे. पुढे लिहायला लागले, पण तप सोडले नाही. सांगलीला संस्कृत पाठशाळेत व्रतस्थ बनून वेदवेदांगाचा अभ्यास केला होता. मग आंबेडयाला जाऊन सत्तरी शिक्षणसंस्थेचा प्रपंच झाला. पुढे अखण्ड प्रवचन–कीर्तन ! जिथे जिथे जाणे शक्य झाले, तिथे तिथे गेले. मुसाफिर बनून गेले. महाराष्ट्राची धारातीर्थे धुंडाळली. जिथे म्हणून मराठी मनाला पावनत्व दिसले तिथे हा रसिक पंडित पोचला. ' तीर्थरूप महाराष्ट्र ' त्यातून लिहिला. मऱ्हाठी संस्कृतीचा हा लालित्यपूर्ण आलेख आगळा आहे. प्रवासवृत्ते आजही लिहिली जातात, पण शास्त्रीबुवांनी केला तो पहिलावहिला प्रयत्न. त्यात अस्सलपणा होता आणि जनमनाचे बिंब होते. शिवाय स्वतःचे विलक्षण व्यक्तित्व सहज प्रगट झाले ते वेगळेच. तसे लेखन पुढे राहिले ते राहिलेच.

आंतर-भारतीची सेवा बाबांच्या भारत-परिचय पुस्तकमालेने जेवढी साधली तेवढी दुसऱ्या कुण्या साहित्यकाराला जमली

नाही. त्यांच्या ' कथाकल्पलते'ने आणि प्राचीन सुरस गोष्टींनी बाल-मनावर मोहिनी तर घातलीच, पण कुमारांचेही उद्‌बोधन घडविले. आज तर आबालवृद्धांच्या बदललेल्या आवडींना ते प्रिय ठरले आहे. बाबांच्या निर्मळ दृष्टीला लोकसाहित्याचे जे आकलन झाले ते प्रामाणिक तर आहेच. पण ते जनमनाला समर्थ, समृद्ध करणारं आहे हे सांगितले पाहिजे.

....असा सारा साहित्याचा उद्योग अनंत प्रकारे केला. रसिकमान्य अशा कमीत कमी पन्नास ग्रंथांचे कर्तृत्व सारस्वतात समाविष्ट झाले. रसिकांना रुचले म्हणून आवडीने लिहिले. वाचकांच्या स्नेहात सारे सुख सापडले.

मांडल्या संसाराचा सारिपाट अर्ध्यावरच उधळला गेला होता. मग आपले आपणच सावरले. आठवतात साऱ्या गोष्टी.... सुधाबाईंशी लग्न झाले. संसार पुन्हा फुलला. एक तारखेचा आनंद असा नव्हताच. आवडी-निवडीच मुलखावेगळ्या. नोकरी कशी लागायची ?.... पण अध्ययनाचे व्रत सोडले नाही. खूप वाचले. मनाने ते सारे जतन केले. टिपून ठेवले. पुराणे-प्रवचने केली. रसना तृप्त झाली. मिळाले त्यावर सुधाबाईंनी भागविले आणि त्यांचा तरी उत्साह कसा....साऱ्या वेडात सोबत केली. आपल्या मुलाबरोबर शास्त्रीबुवांना किती तरी मुलं मोठी करायची हौस. त्या साऱ्या हॉस्टेलची रेक्टरशिप सुधाबाईंनी करायची-मनापासून !.... सारी मुले मोठी झाली. येतात आपुलकीने. ही सारी सुधाबाईंची पुण्याई. अपार कष्ट, सहनशील आणि योजक स्वभाव. काय काय केले ? बांगड्यादेखील विकल्या घरोघर जाऊन !

मुलांच्या घरचे मोठे मूल शास्त्रीबुवा. या मोठ्या भाग्यवान 'मुलाला' सांभाळलं. आज त्या साऱ्या आठवणी डोळ्यांच्या कडा ओल्या करतात. पण ते सुधाबाईंना ठाऊक होऊ देण्याची सोय नाही. आवडायचे नाही.

मराठी साहित्याच्या संसारात बाबांची कथा-कांताही सात्त्विक आणि सोशिक म्हणून कदाचित उपेक्षिता ठरली. त्याही आठवणी ताज्या आहेत. अधून-मधून अलीकडे व्यक्तही होतात.... उमेदवारीच्या काळातही योग्य माध्यम लाभले नाही. म्हणून मनाविरुद्ध किती तरी तडजोडी पत्कराव्या लागल्या. पुण्याच्या 'चैतन्य' मासिकासाठी ३४ साली शास्त्रीबुवांनी पहिली कथा लिहून आपल्या लेखक-जीवनाचा उत्साहाने आरंभ केला होता. पुढल्याच वर्षी ते पुण्याला रहायलाही आले. मग 'चैतन्या'चे संपादन आणि पुराण-प्रवचन असा नित्यक्रम केला. खूप वाचायचे, प्रवास करायचा, चिंतन करायचे आणि टिपणेही काढायची रसाळ निवेदन करायचे. आनंद होता....४१ साली 'वेलविस्तार, हा पहिलावहिला कथासंग्रह प्रकाशात आला. पुढे 'खडकातले पाझर,' मग 'विराणी,' 'मोहनवेल' आणि 'भावबळ' वाचक तृप्त होत होते, लेखक फुलत होता. 'प्रतिभा' 'घररिघी' ही गाजली. नंतर 'कल्पित आणि सत्य' 'पुत्रवती' आणि दहा 'कन्यादान' संग्रह निघाले. संपलेही. आजही पुन्हा हवे झालेत. ती नावंसुद्धा बाबांच्या सात्त्विक रसिकतेची साक्ष देणारी आहेत.

....कथा आता थांबवलीय निग्रहाने. लोकप्रियतेच्या शिखरावर आरूढ असताना थांबवली. प्रत्येक दिवाळी अंकात मागणी असे...पण माल देण्याघेण्याची प्रकृतीच नव्हती. संस्कृति-

कोशाच्या तपाचरणासाठी कथासाहित्याचा निरोप घेतला. कुण्या नव्या साहित्यिकाला हे खरेसुद्धा वाटायचे नाही. कारण मागणी तसा पुरवठा हे आजचे धोरण. पण तो व्यवहारच वेगळा. म्हणून त्याच्याबद्दल काही वाटणेच नाही. छान आहे, तुमचेही आमचेही! एवढेच प्रसन्न म्हणणे ! आपली कथा टीकाकाराला रुचली नसली तरी सहस्रावधी रसिकांनी पसंतीची पावती दिली हे खरे बळ. मनी-मुखी आनंद असलाच पाहिजे. कथा मनामनातून घोळली. चित्रपटातून साकार झाली. ज्याला त्याला सांगावी अशी ती वाचणाऱ्याला वाटली. आनंद अभिमानपूर्वक असायला हवा, आहेही.

... निसर्गाचा वरदहस्त लाभलेल्या गोमंतकाच्या रम्य भूमीत एका पुराणिक परिवारात बाबा वाढले. पारंपारिक विद्यांची उपासना हे या घराचे व्रत. इमानेइतबारे ते आचरायचे-कीर्तना-प्रवचनाद्वारे प्राप्त विद्या रंगून रंगवून आबालवृद्धांना सांगायची. बाबांनी जीवनाची सुरुवात अशीच केलेली. मध्यावर येईपर्यंत तोच सरळ सीधा मार्ग कंठावा लागला होता.

धर्मनिष्ठा आचरून समाजाला सदाचाराचे आदर्श घालून देणे वाटते तेवढे सोपे नसते. गृहस्थ जीवनाची प्रतिष्ठा पाळायची असते आणि कथन करायची असते, असा बाबांचा कयास. आज-मितीला वेडाबागडा ठरणारा हा विचार. कौटुंबिक जिव्हाळा उपभोगला, मग सांगितला तसा एक तृप्तीचा भाव. खरोखरीच आपल्या एक मर्यादित जगात बाबांनी अमर्याद अनुभव घेतले पुराणकारांच्या विराट जीवनदर्शनाची आणि अफाट कल्पकतेची खाण तर त्यांना घरीच गवसलेली. विदग्ध संस्कृत महाकवींची

मोहिनी त्यांच्यावर घरच्या स्वाध्यायानं घातलेली. जुन्या रीतिभाती जतन करणाऱ्या घराण्यात संतांचे बोल आठविण्याचा परिपाठ होताच. बाबा त्या हरिरंगात रंगून निघाले... व्यक्तिमत्वाच्या सुसंस्कृत आणि सुसमृद्ध घडणीतून हा कथाकार महाराष्ट्राचा 'गृहस्थ' कथाकार म्हणून जनमनात प्रतिष्ठित झाला.

ते जसे जीवनात तसे साहित्यातही आदर्श 'गृहस्थ'च राहिले. जीवन हे काही काळ प्रेयसी वा पत्नी या नात्यांशी पिंगा घालीत असले तरी तोच नित्यक्रम नव्हे. त्या नात्याशिवाय, किंबहुना त्या नात्यांतूनच अन्य अनेक नाती निर्माण होतात, जीवन समृद्ध करतात. याची व्यापक जाणीव खऱ्या 'अस्तित्वावर' विश्वास असणाऱ्या गृहस्थाला असावी लागते. ती असली तरच तो जबाबदार नागरिक होतो. आपले मन–अनुभव कोणत्याही माध्यमातून व्यक्त करताना जबाबदारीचे भान राखतो. कामवासनेच्या विकृतीने जीवनात निर्माण होणारी आवर्ते हेतुतः शोधून केवळ त्यांनाच कथाविषय बनविण्याचा चालू काळ.... तशी उर्मीच शास्त्रीबुवांनी जवळपास फिरकू दिली नाही. असे काही तरी केले की खळबळ माजते. उलट-सुलट चर्चा होते. समीक्षकांचे लक्ष वेधले जाते. संपादकमजकूर भाव वधारून देतात. सीझन तेजीत जातो. रसिकांसमवेत साहित्य संमेलनातून मजामौजही लुटता येते. शास्त्रीबुवा वर्षानुवर्षे हे सारे पाहत आले. पण हा सच्चा गृहस्थ वासू नाक्यावर रेंगाळलाच नाही.

सुधाबाईंनी गोमांतक मुक्तीच्या आंदोलनात ५५ साली उडी घेतली. पोर्तुगीजांच्या कारागृहात बंदिनी झाल्या, महादेवशास्त्र्यांना घर भकास दिसू लागलं. गृहस्थ कथाकारांचं मनच

कुठं तरी काही तरी हरवल्याच्या जाणिवेने झाकाळून गेले असेल. त्या मानसिक दु:खाच्या काळात त्यांचा कथाकार संन्यास घेऊन बसला. विद्वान पंडित जागा होऊन त्याने दृढ संकल्पाचे बळ उभे केले. ३० एप्रिल १९५७ ला भारतीय संस्कृतीच्या विराट दर्शनाचा प्रचंड कोश करण्याची योजना मार्गस्थ झाली. काही शासनाचे औदार्य, बरीच जनसामान्यांची स्नेहाची सोबत आणि रसिक पंडिताची विलक्षण जिद्द....यातून पुण्याच्या ज्ञानोपासक परंपरेत वैभवाची भर घालणारा एक महान यत्न उभा राहिला. बारा वर्षे लोटली. कोशाचे पाच खंड प्रकाशात आले आहेत. पुढच्याचीही सिद्धता आहे. येत्या चार-पाच वर्षांत या महत्कार्याची पूर्तता होईल. आधीच प्रसन्नतेचे वैभव भोगणारे शास्त्रीबुवा अधिकच कृतार्थ होतील. तोवर वाटचाल करायची आहे....संथ, पण निश्चित. कोणाच्या अध्यात नाही, मध्यांत नाही. कुणी निंदो, कुणी वंदो. कथाकार म्हणून उपेक्षा होवो की पंडित म्हणून अवहेलना होवो, शासनाचा कृपालोभ लाभत राहो अगर दुर्लक्ष होवो.... रसिक पंडिताचा जिद्दीचा प्रवास सुरू आहे. गती संथ असेल, पण उद्दिष्ट गाठण्याची उमेद आहे. निश्चित प्रयत्न आहे. म्हणूनच मनीमुखी सिद्धीचा विश्वास आहे, आनंद आहे.

'सह्याद्री' मासिक, जुलै १९७०

卐 卐 卐

घरीदारी हरवलेला मेधावी माणूस

रा. चिं. ढेरे

तशी आजूबाजूला मोठी माणसं बरीच असतात. या पुण्यात तर मोठी माणसं पुष्कळ.... कुणी मानानं, कुणी स्थानानं, कुणी धनानं. कुणी ज्ञानानं.... पण बहुतेक या साऱ्या मोठ्या माणसां-जवळ सहजासहजी जाण्याची सोयच नसते. बहुधा त्यांना फुरसत नसते. अनेक वेळा पर्वाच नसते. बऱ्याच वेळा जाणाऱ्यांचा भ्रमनिरास घडण्याचा संभव दाट, पण याच पुण्यात एक असा मोठा माणूस आहे की, ज्याच्याकडे फारसा मानपान नाही; स्थान बिचाऱ्याच्या भाग्यात अजून तरी लाभलेले नाही. धनाची तीच परवड, पण त्याचं मन मोठं. ज्ञान हा त्याचा पहिला आणि शेवटला छंद....

रस्तोरस्ती कुठे जुनीपुराणी रद्दी दिसते काय म्हणून सकाळ-सायंकाळ भटकंती करणारी ही आसामी मावळातल्या आडगावाहून या पुण्यात तीस वर्षांपूर्वी आली. जगण्यासाठी स्वाभिमान राखून सर्व प्रकारच्या खस्ता खाल्या. कुठे कपबशा विसळल्या. रात्रीची शाळा केली. प्रेसमध्ये पुस्तक बांधणी केली.

जुळारी-काम केले. पुढे मुद्रिते वाचली. गजबजलेल्या वाड्यातल्या दहा बाय दहाच्या खोलीत संसार थाटला .... आणि रद्दीतून धुंडाळलेली दहा हजारांवर पुस्तकेही त्यानं तिथंच शेजाऱ्या-पाजाऱ्यांच्या मदतीने जोपासली पानशेतच्या प्रलयात तो खराखुरा बुडाला. रद्दीतून धुंडाळलेली आणि जिवापाड जोपासलेली त्याची ती प्रचंड ग्रंथसंपत्ती त्या संकटात सापडली.

त्यालाही आता सोळा सतरा वर्षे लोटली. पुन्हा पंधरा हजारांची ग्रंथशाळा सिद्ध झाली आहे. वाहून गेलेल्या हस्तलिखितांचेही ग्रंथ झाले, त्याचा व्यासंग थांबला नाही.... अभिजात वाङ्मयावरच जगला-वाढलेला हा माणूस त्या प्रलयाच्या धक्क्यानें मुळीच खचला नाही. उलट नव्या जोमाने कष्टत राहिला आहे. कसल्याच प्रतिकूलतेची तमा न बाळगता, काहीतरी नवेच करीत राहिला आहे.

असा हा मोठा माणूस. मराठी भक्तिपरंपरेच्या अभ्यास-क्षेत्रात आपल्या व्यासंगपूर्ण ग्रंथसंपदेनं ज्यानं फार मोलाची भर टाकली अशा आधुनिक महाराष्ट्रीय विद्वानांमध्ये या छोट्या माणसाचे स्थान फार मोठे आहे.

‘श्रीनरसिंह सरस्वती: चरित्र आणि परंपरा’ अथवा ‘दत्तसंप्रदायाचा इतिहास आणि श्रीगुरू गोरक्षनाथ: चरित्र आणि परंपरा’ अथवा ‘नाथसंप्रदायाचा इतिहास’ हे त्याचे दोन ग्रंथ सर्व भारतीय भाषांत या विषयावरचे प्रमाणभूत ग्रंथ मानले जातात. मराठी नाथपरंपरेच्या मौलिक संशोधनाने युक्त असलेला त्याचा नाथसंप्रदायेतिहास हा मराठीतील आद्य आणि आजही या विषयावरचा एकमेव ग्रंथ.

खंडोबा या कर्नाटक-महाराष्ट्रातील प्रख्यात लोकदेवाचा विकासक्रम उलगडून दाखविण्याचा गंभीर प्रयत्न करून त्यानं लोकसंस्कृतीच्या अध्ययनाच्या विस्तृत क्षितिजांची जाणीव करून दिली.

वासुदेव, गोंधळी, भराडी, वाघ्या, मुरळी इत्यादि लोक-धार्मिक आणि लोकरंजक संस्थांचा शोधपूर्ण, पण वेधक परिचय सादर करून त्याने या क्षेत्रातील मराठी ग्रंथसंपदेत स्वतःचं असं वर्चस्व निर्माण केलं.

मराठी भक्तिधारेत भिजलेल्या अनेक अल्पज्ञात आणि बव्हंशी अज्ञात अशा मुसलमान संतकवींच्या चरित्रांची, साधनेची आणि कवितेची संशोधनाची सर्व पथ्ये सांभाळून त्याने करून दिलेली ओळख विद्वन्मान्य ठरली आहे.

देव-देवता, साधूसंत आणि साऱ्याच मऱ्हाटी संस्कृतीच्या अंगोपांगांना स्पर्श करणारा त्याचा 'विविधा' हा लेखसंग्रह एक उत्कृष्ट संदर्भ ग्रंथ म्हणून मान्यता पावला आहे. कृष्ण दयार्णवकृत 'हरिवरदा' या बृहद् ग्रंथाच्या पाच खंडांचे त्याचे व्यासंगी संपादन आणि आज्ञापत्र, संत आणि समाज, मराठी भक्तिपरंपरा, नरेंद्र-रुक्मिणी स्वयंवर, निरंजनमाधव-विरचित सुभद्रास्वयंवर, संतांच्या आत्मकथा इत्यादी महत्त्वाच्या ग्रंथांचे चिकित्सक संपादन म्हणजे प्राचीन मराठी वाङ्मयाच्या अभ्यासाला लाभलेली अमोल देणगी आहे.

विविध विषयांवरील त्याच्या संकीर्ण पुस्तकांची संख्या पन्नासांवर गेली आहे. यांतील स्थलपरिचयपर पुस्तकांचे एकत्रीकरण जरी केले, तरी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासाची उत्कृष्ट तोंडओळख सिद्ध होईल.

वयाची पन्नाशी उलटण्यापूर्वी रचलेली पंचाहत्तरावर ग्रंथांची ही मालिका आणि अद्‌भुत व्यासंगाने रसरसलेले सुमारे एकशे साठ लेख ! आश्चर्याने थक्क होऊन जावे असा हा सारा प्रकार आहे....एकाच एक विषयात अभ्यास करण्यात मंडळी गढून राहतात. मग अनेक ग्रंथांत त्याच त्या विषयाचे पुन्हा पुन्हा प्रतिपादन होते. अशी ही फुगीर संख्या नाही.... विद्यापीठात किंवा महाविद्यालयात आपल्या प्रतिष्ठेचा दरारा निर्माण करून व्यासंगाच्या निमित्ताने विद्यार्थिवृंदांचे शिव्याशाप घेत आणि भरपूर साधनसोयीचे फायदे मिळवून संपादित केलेली ही विद्वत्ता नव्हे.... केतकरांच्या अफाटपणाची आठवण करून देणारा हा ध्येयवेडा छांदिष्ट संशोधक.

परिस्थितीची पर्वा न करता पुस्तकांवर पैसा ओतीत राहायचे. एखाद्या अभ्यासविषयावर लिहायचे म्हणजे साऱ्या अस्सल साधनपुराव्यांची बालंबाल खात्री करून घ्यायची. लेखाच्या मोबदल्याचा कधी विचार नाही. सदैव छळणाऱ्या प्रकृतीचीही तमा नाही.... घरीदारी हरवलेला हा मेधावी माणूस !

याचे ' रामचंद्र चिंतामण ढेरे ' हे जाडेजुडे नाव आणि त्याचे अफाट लेखन-संशोधन सामान्यांना चकवणारे आहे. ते ऐकल्यावर वयाची साठी उलटून गेलेला हा कुणी पगडीबहाद्दर असेल असा कयास झाल्यास नवलही नाही. पण माणूस हाडाचा रसिक आहे. साधासुधा मामला. सदरा आणि पायजमा. नीटनेटका, हाती छोट्या पिशवी-छत्रीची सोबत. त्यात नवी मिळालेली ' अद्‌भूत ' चीज-जुने पुस्तक किंवा पोथी. पण मित्र-मंडळीबरोबर आनंद लुटताना त्याची रसिकता सांगण्यासारखी. तासन्‌ तास गप्पा ऐकेल,

स्वत:हि सामील होईल. भजीबिजी असली तर प्रकृतीचीही पर्वा नाही.

बंडगार्डनजवळ कुणी म्हातारी मस्त भजी तळते. सन्मित्रासमवेत चार मैलांची पायपीट करीत संशोधक ढेरे या भज्यांपर्यंत पोहोचतात. तिकडे लॉ-कॉलेजासमोर कुण्या कंट्रीसाईड हॉटेलची आठवण करून देणारी करंदीकरांची मठी आहे. तिथला चहा आणि टोस्ट चाखायला जायचं तेव्हा फर्ग्युसनच्या टेकड्यांवरून चौखुर भटकत जायचं. गावातच जायचं झालं तर अण्णा बेडेकरांची वेळ साधून ! दाटीवाटीत शिरून मिसळ खायची....या साऱ्या आनंदाला 'स्वर्गीय' असा एकच शब्द त्यांच्या कोषात. कुणी परीटघटीचा प्राध्यापक त्यांना आरोग्याची आठवण करून देईल तर ते वैतागतील. हा सारा मस्तमौला प्रकार न करणे म्हणजे मराठी मुलखात जगायची आपली लायकी नसणे होय, असे ठाम मत. ढेऱ्यांना मराठीच्या अशा अफाट बापुरावांचेच वेड आहे. पठ्ठे बापूराव, ज्ञानकोशकार केतकर, इतिहासाचार्य राजवाडे अशा किती तरी विक्षिप्त वल्लींशी त्यांचं मागच्या जन्मी नातंच असेल.

असे हे ढेरे मला विद्यापीठाच्या वाटेवर भेटले. आज परिचयाला एक तपाहून अधिक काळ लोटला. आम्ही कितीतरी गावांच्या संशोधनयात्रा केल्या. दिवसचे दिवस अन् रात्र रात्र गप्पा. ढेरे बोलत राहिले. माझ्यासारखे मित्र ऐकत राहिले. त्यांची सोबत म्हणजे ज्ञानदेवांची संगत. तीच स्नेहार्द्र कोवळीक. आईच्या वात्सल्यासारखी. शीतल शब्द. मधुर आर्जवी बोलणं. त्यातलं तेज कानामनाला दिपविणारं....

अलिकडच्या सहासात वर्षांत ढेऱ्यांनी आपल्या कामाचा वेग प्रचंड वाढवला. व्यापही अफाट केला. केवळ संत-साहित्य संपादनाचीच संख्या तीसांवर गेली.लोकसंस्कृतीच्या अनेक अंगांचे दर्शन घडविणाऱ्या लेखांचे तोलामोलाचे संग्रह निघाले. त्यांचा मराठी पीएच. डी. चा प्रबंध ' चक्रपाणि ' हा यादवकालीन मराठी भाषा साहित्य आणि संस्कृती याच्या पुनरवलोकनाचा विराट आराखडा ठरला आहे. त्यातून नव्या संशोधकांना असंख्य नव्या वाटा मिळाल्या आहेत.

आता ढेरे संतवाङ्मयाच्या पलीकडे पुराण अन् पुरातत्वाकडे आले आहेत. त्यांचा मातृदेवतेचा अद्भूत व्यासंग लज्जागौरीच्या ' महाग्नी'च्या रूपानं सिद्ध होतो आहे. हा प्रबंध ढेऱ्यांना विदेशात नेणार आहे.

ढेऱ्यांचा हा उत्तुंग कीर्ती शिखरांचा प्रवास सुरू असला तरी पेहराव तोच. बोलणे-चालणे, नम्र वागणे-राहणे साधेच.

विद्वत्तेच्या क्षेत्रात आपल्या मौलिक संशोधनाने उत्तुंग शिखर गाठलेला हा माणूस असा जनमनाच्या रंगसंगतीत असतो. साधा राहतो, सर्वांना वेळ देतो, उगाच टेंभा मिरवीत नाही. हारतुरे मिळविण्याचा उद्योगच नाही.पण ढेरे साऱ्या बाबतीत शांत असतात. ' शंकरराव जोश्यांचे काय झाले, सूचिकार दात्यांचे काय झाले, आपण त्यांच्यापेक्षा मोठे नाही, अशी नम्र भावना ! सुखदु:खाच्या पलीकडे गेल्याशिवाय ज्ञानाची उपासना करता येता नसावी... प्रकृतीच्या प्रतिकूलतेने सदैव त्रासलेला हा सभ्य माणूस ज्यांच्या हाती कुठली ना कुठली सत्ता असते त्यांची अनुकूलता आपल्याला नसतेच अशा मन:स्थितीत जगतो.

इथेच मस्त मंडळीचे फावते. कुणी दावा लावण्याचा धाक घालतो. कुणी कामापुरता मामा होतो. कुणी घेतल्या संदर्भाला जागत नाही.

पण ढेऱ्यांना या साऱ्या उफराट्या जगरीतीचा मुलाहिजा नाही. पौथ्या पाहिल्या की समाधि लागते....कॅलेण्डरचे वरचे महिने फाडावेत तसे ढेरे इतिहाचार्य राजवाड्यांनी करून ठेवलेल्या प्रचंड संशोधन-यादीतील ' हा भाग झाला, हा भाग झाला' म्हणून समाधानात जगतात. आपल्या वाट्याला प्रतिकूलता आलीच नाही असा भाव ठेवून-मजेत गप्पाटप्पा करतात. कर्ज काढून प्रपंच करतात. बऱ्याच वेळा पुस्तकेच घेतात. मित्रमंडळीबरोबर खाणे-जेवणही उरकतात. पण त्यांच्यातला तो मराठी संस्कृतीचा अर्थ लावण्यात हरवलेला मेघावी संशोधक सदैव जागा असतो. रात्र रात्र जागा असतो. झोपेतही जागा असतो. कर्तव्याची हाक खोल कुठे तरी सलत राहते.

लढताना आपल्याच हातांनी जखम दाबावी तशी ती सलणारी खंत दाबून टाकीत ढेऱ्यांचे संशोधन सुरू आहे. राजवाड्यांची यादी पूर्ण होईपर्यंत सुरू राहणार आहे.

' रविवार केसरी ' २५ जुलै १९६९

卐 卐 卐

मराठी प्रकाशनातील मनस्वी पण यशस्वी माणूस

पं. अमरेन्द्र गाडगीळ

'मंगल साहित्य' या पाव शतकापूर्वी महाराष्ट्रभर गाजलेल्या ज्वलज्जहाल पुस्तक मालेचे ध्येयवादी चालक अमरेंद्र गाडगीळ यांचे नाव १९४५ पासून या ना त्या कारणाने गाजले. विशेष करून लेखन प्रकाशनाच्या क्षेत्रात त्यांचा बोलबाला आजही आहे, पण तो आहे एका दबदब्याने. विलक्षण करारी स्वभाव, प्रचंड कल्पनाशक्ती आणि योजकतेचा मेळ, उदंड ध्येयासक्ती आणि अहर्निश उद्योग म्हणजे अमरेंद्र गाडगीळ. प्रसिद्धीच्या आजच्या युगात सभासंमेलने, वृत्तपत्रे, आकाशवाणी या सर्वांपासून फटकून असणारे गाडगीळ आपल्या साध्या सायकलवरून हजारांचे व्यवहार करीत जात-येत असतात.

केव्हातरी बालपणी कोकणातलं घरदार सोडून केवळ जगण्यासाठी अमरेंद्र पुण्यात आले. कोकणात नांगर-रहाटी केली. पुण्यात पडतील ती कामं पत्करली. लोकांचे खाण्याजेवण्याचे डबे पोहचते केले. पोटाला चिमटे घेत १९३४ साली मॅट्रिक पार झाले. पुरे झाले पुस्तकी शिक्षण म्हणत चतुशृंगीच्या रस्त्यावर रामनारायण बंगल्यात कुणी चतुर्वेदी म्हणून पत्रकार होते त्यांच्याकडे आले.

त्यांनी वृत्तपत्रीय शिक्षणाचा खाजगी डिप्लोमा दिला तो घेऊन मुंबईला शि. ल. करंदीकरांच्या 'त्रिकाळ' मध्ये स्वारी दाखल झाली. वर्ष गेलं. सोळा रुपये मिळायचे. चेम्बुरच्या डांसपुरीत रात्र कंठायची. वैतागले. मग एक दिवस 'सकाळ' कारांच्या 'तेज' साप्ताहिकात आले. एकच दिवस.

मुंबईत आजाराने त्यांचा पिच्छा पुरवला. पुण्याला पळनीटकर गुरुजींकडे व्यायामाचे धडे घेऊन कमवलेलं शरीर होतं. त्याची हेळसांड करणं लोकमान्य बाण्याच्या गाडगीळांना परवडेना. तडक पुण्याला परतले. लोकमान्यांच्या केसरीत आले. दुसऱ्या महायुद्धाच्या धुमश्चक्रीत उसळत्या लेखणीचा एक जहाल तरुण केसरीला मिळाला. ज. स. करंदीकरांना अमरेंद्रांच्या रूपाने बाणेदार सहकारी मिळाला. त्यांनी त्यांना भरपूर संधी दिली. पाच वर्षे निघून गेली. अमरेंद्रांना वाटले केसरीने आता प्रकाशनाचे क्षितिज पाहायला हवे. नाही जमत म्हटल्यावर त्यांनी खिशातला राजीनामा सादर केला. त्यात आपल्या स्वभावाशी इमान राखून नोंद केली, 'इथे माझ्या कर्तबगारीला वाव नाही.'

अमरेंद्रांनी मग एका महत्त्वाकांक्षी उद्योगाला हात घातला. फर्ग्युसन रस्त्यावर एक अभिनव पुस्तक उभारलं. प्रकाशन सुरू केलं. पुस्तकमालेचा प्रपंच थाटला. मुद्रणालयाचाही डोलारा सांभाळायला सुरुवात केली. जहाल लेखणी, करारी वागण्या-बोलण्याची धाटणी आणि कुणावरही भिस्त न ठेवण्याची कडक शिस्त. अमरेंद्रांची मंगलसाहित्य माला गावोगाव गाजली. पण फर्ग्युसन रस्त्यावरच ग्रंथालय, ग्रंथ मंदिर आणि मुद्रण प्रकाशन यांच्या व्यवहाराला भरघोस पैशाचे पीक आले नाही. कुठल्यातरी

कंत्राटात अमरेंद्र अडकले. सव्वा लाखाचा फटका बसला. सर्व उभारलेलं आवरून त्यांना पुण्याचा निरोप घ्यावा लागला.

अमरेंद्र १९५० साली महाराष्ट्राच्या दुसऱ्या टोकाला गेले, ते अनंत गोपाळ शेवड्यांच्या खाजगी चिटणीशीसाठी. केसरीचे मध्यप्रदेशातील प्रतिनिधीही ते बनले. भरपूर काम करायचे, मोठ्या योजना काढायच्या, स्वतः राबायचे. जे पत्करले ते आपले घरचे म्हणून काम करायचे. काही महिने दादासाहेब ओगल्यांच्या स्नेहाने 'महाराष्ट्र' दैनिकातही राहिले. स्वतंत्र कर्तृत्वाला वाव नाही ही रुखरुख टोचत-डाचत होती. मग एकदा इंदूरकडे हिंदी पत्रकार म्हणून कसे काय जमेल पाहू म्हणून जाऊन आले.

विचित्र मनस्थिती, जिद्दीने कोकणी दारिद्र्यावर मात करायची म्हणून घरादाराचा निरोप घेऊन पुण्यात पाय ठेवला. पळनीटकर गुरुजींकडे पहिलवानीची मेहनत केली. अध्यात्माचीही वाट शोधली. त्याच वेळी श्रीधरस्वामींचा परिचय झालेला. सज्जन-गडाची आणि स्वामींची संगत १९३३ पासून जडलेली. 'काही तरी नवेच केले पाहिजे.' राम-कथा ब्रह्मांड भेदून पैलाड नेली पाहिजे असे विचार अस्वस्थ करायचे. त्रिकाळ झाला, केसरी झाला, महाराष्ट्र आणि नागपूर टाईम्स झाला. मंगल साहित्य, प्रकाशन, मुद्रणालय, वाचनालय, पुस्तकविक्री किती किती गोष्टी केल्या. नशिबानं साथ दिली नाही म्हणण्यापेक्षा धंद्यात पैकाच कसा करावा याचा ध्यास करता आला नाही. कारण तो पिंड नव्हता.

विदर्भातील तुकडोजी महाराजांची गाठ झाली. त्यांनी आज्ञा केली, सेक्रेटरी म्हणून या. पण अमरेंद्रांचा आता तिशीतलाच

निर्णय पक्का झाला होता. कुणाचीही नोकरी करायची नाही. झाली तेवढी खूप झाली.

अमरेंद्र पुन्हा मुंबईस आले. ढवळचांनी जनरल मॅनेजर करतो म्हटले. जमायचे नाही हेच झालं. कुणी एक हिंदी हरिशंकर भेटला. त्यानं अमरेंद्रांच्या आईनस्टाईनचं हिंदी भाषांतर केलं. वोरा शेठकडे घेऊन गेला त्यांना. नमस्कार चमत्कारानंतर शेठजी म्हणाले, 'तुमचा आमचा व्यवहार कॉंट्रॅक्ट बेसीसवर करू या.'

ही १ फेब्रुवारीची गोष्ट. सोळा फेब्रुवारीला श्रीधरस्वामींची तार आली. अमरेंद्र म्हणाले, 'हा मी चाललो' वोरांनी संपूर्ण महिन्याचा पगार हाती ठेवला. अमरेंद्र भारावले. त्यांच्या कामाची कदर करणारा पहिला माणूस त्यांना भेटला होता.

पुढे अमरेंद्रांनी मुंबईत स्वास्थ नाही म्हणून सांगितले. आपण पुण्याला राहू म्हटले. वोरांनी सर्व वेळी होकार दिला. 'तुम्ही काम करणारे आहात. तुमचे काम कुठेही कसेही करा. मी ढवळाढवळ करणार नाही.' केवढा थोर विश्वास, कर्तृत्वाची किती उदार जाणीव.

अमरेंद्रांसारखा करडा माणूस वोरा शेठजींच्या प्रेमात कायमचा पडला. आज या गोष्टीला सतरा वर्षे उलटून गेली. वोरा म्हणजे गाडगीळ आणि ही दोन माणसं म्हणजे वोरांचा यशस्वी मराठी प्रकाशन विभाग. पाचशे पुस्तकांचा प्रपंच जोमाने पुढं चाललेला. कदाचित आज मितीला सर्वांत मोठा आणि सफलतेचा निकष लावायचा तर शंभर टक्के लावता येईल असा मराठी प्रकाशन प्रपंच.

एक फेब्रुवारी १९५६ ला या उद्योगाचा आरंभ झाला. संस्कृत साहित्य सरिता ही पहिली माला. बत्तीस पैकी एकोणीस पुस्तके अमरेंद्रांनी तयार केली. पन्नास रुपये पुस्तक. पार्सले स्वतः बांधली, हमाली स्वतः केली. ५८ साली मोठी जागा मिळाली. मग घर व कार्यालय एक करून अमरेंद्रांनी कामाला कंबर कसली. आधीच्या नोकऱ्यात अमरेंद्रांच्या प्रचंड कष्टाळू मनाला पेच असायचा. मालकाची मर्जी सांभाळायची का कर्तव्य करायचे ? वोरा शेठजींकडे हा प्रकार नव्हता आणि नाही म्हणूनच जमले आहे. बहुसंख्य मराठी प्रकाशक १९५६ पर्यंत शालेय प्रकाशनात होते. ढवळे, पाठक, तुकाराम इत्यादि अपवाद. पण क्रमिक पुस्तकांचे सर्वस्वी सोडून केवळ सांस्कृतिक पुस्तकांवर पुढे आलेले एकमेव प्रकाशक म्हणजे वोरा-गाडगीळ.

'प्रकाशन ही एक लोक-शिक्षणाची थोर संधी' इतकेच नव्हे तर ती 'एक मोठी सामाजिक जबाबदारी आहे' हा गाडगीळांचा सिद्धांत.

गाडगीळांनी एकापुढे एक माला काढल्या. 'बहुश्रुत व्हा,' 'संत चरित्र माला', 'कुमार साहित्य माला', 'साहित्य शारदा', 'चित्रमय विज्ञान', 'सांस्कृतिक महाराष्ट्र दर्शन' 'मराठ्यांचे महापराक्रम,' 'देवादिकांच्या सणाच्या गोष्टी', 'काही तरी नवेच करा' अशा छोटया छोटया, आकर्षक सजावटीच्या आणि कमी किमतीच्या पुस्तक-पुस्तिकांचे संच. सामान्यांनी विज्ञानाची कास धरावी, बहुश्रुत व्हावे, काही तरी नवेच करावे. त्याआधी आपला देश, आपली माणसं, आपली संस्कृति म्हणजे काय ते जाणून तपासून पाहावे, असा उद्बोधक योजक प्रपंच गाडगीळांच्या रामकथा ब्रह्मांड भेदून पैलाड न्यावी म्हणणाऱ्या मनात असायचा.

गाडगीळांच्या माला म्हणजे खेड्यापाड्यातल्या शाळा संस्थांना पर्वणी वाटली. बाल, किशोर, कुमार, स्त्रिया, प्रौढ पुरुष असे वाचकांचे गट समोर ठेऊन नव्या नव्या लेखकांची सुसंपादित पुस्तके गावोगाव आणून देणारे प्रामाणिक प्रचारक आणि अखंड मेहनती गाडगीळ व त्यांच्या पाठीमागे उदार सावली देणारा समंजस मालक. आज वोरांच्या किशोर कादंबरिकांचा जमाना आहे. शासनाच्या पारितोषिकात वोरा पुस्तकांना अंगभूत योग्यतेतून हमखास स्थान आहे.

आता गाडगीळांना सगळे नानासाहेब म्हणतात. नानासाहेबांचे शरीर अजूनही कमावलेले आहे. गोरापिठ्ठ रंग, त्यावर तांबूस निरोगी छटा. स्वाभिमान सांगणारे ताठ नाक, थोडी बुटकी वाटावी अशी अंगकाठी—कामाला वाघ असल्याची द्योतक वाटणारी, चेहऱ्यावर हास्य पण त्यात अनुनय, विनय नाही. या बसा नमस्कार, काम असेल तर संवाद, अन्यथा घालवायला वेळ नाही, सरकारी अनुदानाचा मुलाहिजा नाही. प्रेस, बाईंडर, चित्रकार आणि लेखक सुद्धा नियमाप्रमाणे वागाल तर जमेल नाही तर दुसरे पुष्कळ आहेत, असा सरळ ठोक व्यवहार. नानासाहेब जिल्हा परिषदेच्या नादी लागायचे नाही म्हणतात. तसे ते नादी नाहीत असे नाही. नाद आहे सज्जनगडाचा. कृतिशील साधू-सज्जनांचा, ध्येयवादी प्रकाशनांचा. अमर ठरावेत अशा कोश रचनेचा.

असमाधानही आहे. चांगली माणसं मिळत नाहीत. कुणावर अवलंबून राहता येत नाही. पण तरीही 'गणेशकोश' झाला, 'मातृपूजन' झाले, 'राम कोशा'चे सहा खंड मार्गस्थ आहेत. 'राष्ट्रीय ज्ञानकोशा' चा संकल्प सिद्धीस नेण्यास श्री समर्थ आहे

आणि मुख्य म्हणजे नानासाहेब गाडगीळ यांचा कर्तव्यकठोर ध्येयवाद समर्थ आहे. कुणी सोडल्याची खंत नाही. फटकळ म्हणून तुटल्यास दुःख नाही. मनोमय प्रसन्नता आहे. ढवळे यांच्यानंतर मराठी प्रकाशनांना पडलेले सांस्कृतिक खिंडार त्यांनी बरेच बुजविले आहे. विमल चारित्र्याचा, साधनशुचिता पाळणारा, मोठ्या भावासारखा वागणारा मालक आहे. त्यांच्या ठायीहि डिटॅचमेंट आहे, कमिटमेंट बरोबर.

नानासाहेब गाडगीळ नामक श्रीधरस्वामींच्या शिष्यांच्या रामदासी चैतन्याचे इथे नेमके जुळले आहे हे एक अखंड समाधान आहे.

'रविवार सकाळ' २७ मे १९७३

卐 卐 卐

जिद्दीने आयुष्य वेचणारा अजब संग्राहक

अज्ञातवासी-दि. गं. केळकर

पुणे म्हणजे संस्थांचं आणि त्यांच्या अजब चालकाचं माहेर. तुम्ही कुठल्याही रस्त्याच्या कडेने चला, घराघरावर एखादी पाटी कुठल्या तरी संस्थेची असायचीच. आणि सहज कुतूहल म्हणून जरी आत डोकावलेत तरी कुणीतरी अफाट उद्योगात रमलेला पुणेकर तुम्हांला भेटायचाच.

.... सदाशिवपेठेत एक नातूची बाग. अलीकडची वस्ती. शनिपारावरून बदामी हौदाकडे येणारा रस्ता. बालोद्यान मुद्रणालयाच्या अलीकडे आदर्श विद्यालयाकडे वळणाऱ्या गल्लीला एक रेखीव पाटी . . 'राजा केळकर संग्रहालय मार्ग' आत गेलात तर जयपूरला आल्याचा भास होईल. हवामहलासारखी 'देखते रहो' अशी मनोहर इमारत. बहुधा रस्त्यावरच तुम्हांला एक म्हातारा तरुण आढळेल.

वय वर्षे त्र्याऐंशी. पंचावजा धोतर, पैरण त्यावर. कधी बंडी. हात बहुधा हालचाल करणारे. काहीतरी बोटाने दाखविणे खुणावणे सुरू. त्यांच्या शेजारी उभ्या असलेल्या कुणाशी तरी

बोलणे आणि कामगाराला सूचना देणे एकाच वेळी चालू. तो बहुधा त्यांच्या आवडीचा सुतार-मिस्त्री असायचा. खास निवडीचा आहे हा मिस्त्री. जुनं नव्यावर कसं रेखीव ' फिट् ' करायचं याचे धडे त्याने आमच्या या म्हाताऱ्या तरुणाकडूनच घेतलेत.

हे कवी अज्ञातवासी दिनकर गंगाधर केळकर. आमच्या आजोबांकडे म्हणजे कानडी कवी श्रीधर खानोलकरांकडे यायचे. पूर्वी झाली असतील चाळीस-बेचाळीस वर्षं याही गोष्टीला. कदाचित जास्तही. तेव्हा कविता करायचे. गायचे. आता कविता जगतात अजब कथा आहे यांची. दुसऱ्यानंच ती सांगायला हवी. ते सांगणाऱ्या गाणाऱ्यांपैकी नव्हेत. शिवाय त्यांना वेळ कुठं आहे मागचं स्वतःचं सांगत बसायला. तो त्यांचा स्वभावच नाही. आता एक जबरदस्त नाद आहे. त्यातच साठीनंतरची बावीस-तेवीस वर्षं सरली .... केळकरांचा मुलगा राजा केळकर. त्याला छंद जुन्या वस्तूंचा. त्यानं काही हौसेमौजेनं जमवल्या. आणि तो अल्पायुषी ठरला. भरल्या घरातून त्याचं जाणं झालं. उदास केळकर राजाच्या वस्तूंतच त्याचा शोध घेऊ लागले. त्याचा कष्टी बाप स्वतःलाच म्हणाला," वेट्या, किती काळ शोक करीत राहशील? दैवगती कुणाला चुकली आहे ? राजाचा छंद आपला म्हण. विसरून जा दुःखाला आणि स्वतःला. " झालं; अज्ञातवासींनी कवितेचा निरोप घेतला. औदास्यही दूर सारले. आणि एका अद्भुत उद्योगाला लागले. जुन्यात जुन्या दिव्यांचा, अडकित्त्यांचा, सोंगट्यांचा असा कशाकशाचा अविरत शोध, हेच एक ध्येय.

गेली पंचावन्न वर्षे हाच एक अफाट उद्योग निष्ठापूर्वक सुरू आहे. तसे पाहिले तर केळकर हाडाचे कवी. महाराष्ट्रावरील

प्रेमानं ऐतिहासिक लिहायचे. तेही ' अज्ञातवासी ' या टोपण नावाने. त्यावेळी त्यांच्या मनात सहज आलं.... आपल्या घरच्या अभ्यासिकेमध्ये काही जुन्या काळच्या वस्तू असाव्यात. आणि त्यातून हा छंद वाढतच गेला. कविता लिहिण्यापेक्षा जुन्या जिवंत काव्याशी त्यांचं आंतरिक नातं जुळलं.

राजा केळकर संग्रहालयात आता सिंधु संस्कृती, शुंगकाल, कुशान काल, गुप्त काल अशा प्राचीन मृत्तिका शिल्पांचे असंख्य नमुने आहेत. गेल्या सातशे वर्षांतील पाषाण शिल्पे, ताम्रपट, सोन्याचांदीची आणि तांब्याची जुनी नाणी, कागदाचे दुर्मिळ कातर काम, भारतातल्या सर्व शैलीचा विविध चित्रसंग्रह, काष्ठ, चर्म चित्रे अशा अक्षरश: हजारो अपरूक चीजा हारीनं मांडून ठेवलेल्या आहेत. नुसती जुनी वस्त्रकला पाहायची तर ऐतिहासिक व्यक्तींचे तऱ्हेतऱ्हेचे पेहराव, दुर्मिळ पैठण्या, शाहू, दुपट्टे, किमखाब, शेले, डाक्क्याच्या मलमलीचे कपडे, अंबारी–मेणा–पालखी यावरची भरजरी आच्छादने, गालिचे, तक्के, लोड, किमखाबी पडदे असा हरखून जावे असा संग्रह आहे. असंख्य प्रकारचे दिवे, उदबत्तीची झाडे, आडकित्ते, पानांचे डबे, चुन्याच्या डब्या, कुलुपे, हुक्के, चिलमी, दौती आणि पूजेची उपकरणेसुद्धा–अफाट गोळा केली आहेत. या सर्वांची मांडणी इतकी आकर्षक आहे की सांगता सोय नाही.

.... हा संग्रह विनामूल्य पाहता येतो. महाराष्ट्र राज्य सरकारनं अपवाद करून पंचवीस वर्षांच्या करारानं तो देखभाल करायला घेतला आहे. पुण्याच्या महापालिकेने कायमची सालाना पाच हजारांची देणगी दिली आहे.

केळकर अजून तरुणाच्या उत्साहानं या संग्रहालयाच्या वाढीच्या असंख्य योजना आखीत आहेत. त्यांच्या पंचाहत्तरीच्या वेळी—म्हणजे त्यालाही झाली की आता सात आठ वर्षे. अभिनंदनासाठी गेलो त्यावेळी दि. गं. केळकर अभिमानाने म्हणाले, " राजा केळकर म्युझियम हे पुण्याचे एक भूषण ठरले आहे. मी आयुष्याची पंचावन्न वर्षे वेचून हा मौल्यवान पसारा जमविला. त्यासाठी सर्व प्रकारची झीज सोसली आणि आजही वयाची ७५ वर्षे लोटली तरी माझे काम पूर्ण झालेले नाही. एकाच व्यक्तीच्या खटाटोपाने तयार झालेला आणि इतका लोकप्रिय बनलेला भारतातील हा एकमेव म्युझियम आहे. "

खरोखरीच केळकरांचा उत्साह उदंड आहे, वयाची पाऊणशे वर्षे सरली हे त्यांनी म्हटले, म्हणूनच विश्वास ठेवावयाचा. कारण, या वयातील त्यांची कार्यशक्ती आणि जिद्द आश्चर्य वाटण्यासारखी आहे. अलीकडेच ते पश्चिम जर्मन सरकारच्या खास निमंत्रणावरून त्या देशातील संग्रहालये पाहण्यासाठी जाऊन आले.

त्यासंबंधी बोलताना ते म्हणाले, " परदेशांत संग्रहालयांची महती तेथील लोक आणि शासनही समजू शकते. मनोरंजनाद्वारे शिक्षण देण्याचा त्यांचा सतत प्रयत्न असतो. प्राचीन परंपरा आणि संस्कृतीच्या अभिमान-विषयाची त्यांना फार कदर करावीशी वाटते. लक्षावधी रुपये खर्च करून गावोगावी उत्तमोत्तम संग्रहालये उभारली आहेत. अमेरिकेत तर चाळीस टक्के शिक्षण संग्रहालयाद्वारे देतात. "

आमच्याकडे संग्रहालये मुळातच कमी, त्यातूनही उपेक्षा त्यांचे वाटयाला आलेली. श्री. केळकर यांना यासंबंधी दुःख वाटते

ते व्यक्त करून ते म्हणाले, " डायरेक्टर ऑफ आर्काइव्हजचे काम केवळ दप्तरखाना सांभाळण्याचे असले पाहिजे. आणि डायरेक्टर ऑफ आर्किऑलॉजी म्हणजे उत्खनन-शास्त्रासाठी स्वतंत्र अधिकारी हवा. एकाने जमिनीखालील वस्तूंचा वेध घ्यावा. एकाने इतिहासाची सामग्री संग्रहित करावी. पण त्यातून समाज-प्रबोधन घडविणारा संग्राहक पुन्हा वेगळा कलाकार असतो. त्याला जुन्या नव्याची जाणीव आणि दृष्टि असते. तो मेहनतीने वस्तू आणि वास्तू पाहून सुरेख संग्रहालय उभारतो. ते पाहून इतिहास सजीव होतो. प्रेरक आणि मार्गदर्शकही ठरतो. हा उद्योग किती मेहनतीचा आणि महत्त्वाचा आहे, हे पाहायला आम्ही परदेशीच जाऊन आले पाहिजे.

" डायरेक्टर ऑफ म्युझियम्स ही स्वतंत्र अधिकाराची जागा फक्त गुजरात सरकारने निर्माण केली आहे. माजी मुख्य-मंत्री श्री. बळवंतराय मेहता याबाबतीत अत्यंत आस्थेने लक्ष घालणारे होते. प्रगतिशील महाराष्ट्र शासन मात्र याबाबतीत अजून मागे आहे. उत्खनन, संग्रहालये, दप्तरखाने, हे सारे ज्ञान विभाग शासनाने एकाच कार्यालयाकडे सोपविले आहे. शिक्षण-खात्याच्या व्यापक पसाऱ्यात हा एक सारा उपविभागच बनला आहे. वास्तविक तीन स्वतंत्र विभाग असावयास हवेत. "

" भारत सरकार तर याबाबतीत भलतेच उदासीन दिसते. चार दोन महिन्यांनी एकदा भेटणारे एक कौन्सिल तयार करून याबाबतीतील त्याची जबाबदारी तूर्ततरी संपलेली दिसते. सारी सल्लागार मंडळी तशी मोठी माणसे आहेत. पण त्यांच्या योजना टेबलखुर्चीवरच्या. त्यांनी केवळ सल्ला द्यायचा. सत्ता हाती अस-

लेले अधिकारी ऐकायचे तेवढे ऐकतील, शिवाय आपला देश गरीब असल्याचे सबळ कारण याबाबतीतही फार महत्त्वाचे ठरतेच."

याच संदर्भात त्यांना सरकारी संग्रहालयातील चोऱ्यामाऱ्या संबंधी विचारता श्री. केळकर अत्यंत दुःखाने म्हणाले, "अहो चोऱ्या व्हावयाच्या नाहीत तर काय! आमच्या या घरच्या संग्रहालयात माझ्या समोरदेखील वस्तू हातोहात लांबवल्या जातील. इथे आहे का काही व्यवस्था ?"

या दृष्ट लागण्यासारख्या वास्तूस आज हत्यारी पोलीस नाही. विमा नाही. संरक्षण नाही. या अनास्थेबद्दल त्या साऱ्या जीवनाचा होम करणाऱ्या माणसास हळहळ का वाटू नये ?

श्री. केळकर म्हणाले, "सरकारी संग्रहालयात जिद्दीची आणि या विषयावर निष्ठा असलेली माणसेच दुर्मिळ. शिवाय नको तिथे काटकसरीचा प्रकार मोठा. त्यातून परकीय हस्तक दावा साधायला असतातच. आणि भारतातील वस्तू झपाट्याने परदेशी लुटल्या जात आहेत, यावर माननीय मंत्र्यांचासुद्धा विश्वास बसत नाही."

सरकारी यंत्रणाच चमत्कारिक आहे. विशेषतः शिक्षण-खात्याशी संबद्ध अधिकाऱ्यांची उदासीनता खटकणारी आहे, असे आपले अनुभव कथन करून श्री. केळकरांनी आपली अधिकाऱ्यांकडून असलेली किमान अपेक्षा व्यक्त केली, 'चांगल्या गोष्टी स्वतः राबून करणे-करविणे, जमत नसेल तर निदान एखाद्या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक करावे, शासनाचा पैसा कारणी

लागावा, म्हणून या अधिकाऱ्यांनी फक्त आस्था दाखविली आणि चांगल्या माणसांना हेरून त्यांना प्रोत्साहन दिले तरी खूप कामे होतील.'

श्री. केळकर यांचे अनुभव अत्यंत बोलके आहेत. त्यांनी आधी संग्रहालय उभारण्यासाठी अपार कष्ट सोसले. सारे आयुष्य वेचले. आता 'आधी केले मग सांगितले' अशी त्यांची भूमिका कोणासही पटावी अशी आहे. पण शासकीय अधिकाऱ्यांच्या उपेक्षेने आणि असहकाराने आपण त्रस्त होतो असे त्यांनी सांगितले. माजी कमिशनर श्री. चिन्मुळगुंद यांच्यासारखा एखादा रत्नपारखी भेटतो. या विषयी कृतज्ञता त्यांच्या मनात आहे. म्हणूनच आजचे कटु अनुभव सांगूनही ते नावनिशी लिहू नयेत, असे मला त्यांनी बजावले.

शासकीय संग्रहालयातील चोऱ्या काय किंवा एकूण संग्रहालयेच नसणे काय ! सारी इथूनतिथून उपेक्षा कारणीभूत आहे. पण छंदवेडे लोक कमी नसतात. कितीही प्रतिकूलता लाभली तरी ते आपला नाद सोडत नाहीत. केळकरांच्या यशाचे रहस्य हेच आहे. म्हणूनच त्यांचा उदंड आशावाद मला आवडला. त्यांचा निरोप घेताना सहज म्हणालो, 'उपेक्षा, सरकारी लाल फीत आणि एकूण संग्रहलयासंबंधी अज्ञान, उदासीनता हे सारे गृहीत धरून आम्ही नव्या मंडळींनी काही करायचं ठरवलं तर काय करू या, सांगा पाहू !' यावर मिठ्ठास हसून आणि डोळे किंचित किलकिले करून केळकर म्हणाले, 'सांगतो, तुमच्यासारखे तर करू शकतीलच. पण क्षणभर असं समजा, मीच अजून काही करायचं ठरवलं तर....

'मी एक गाव घेईन. तिथली समजंस माणसे गोळा करीन. सुबुद्ध धनिकांचे सहाय्य घेईन. मुलांना या विषयाची गोडी लावून त्यांचे त्यांच्याकडूनच संग्रहालय उभे करीन. एक जिल्हा असा चार वर्षांत होईल. मग सारा महाराष्ट्र त्याचे अनुकरण करील.' केळकरांचे हे बोलणे प्रथम स्वप्नासारखे वाटले. पण राजा केळकर संग्रहालय हे एक त्यांनी साकारलेले सुंदर स्वप्नच आहे. त्याकडे पाहून मला त्यांच्या आशावादाविषयी विश्वासच वाटला.

'रविवार सकाळ' १० जानेवारी १९७०

卐 卐 卐

सत्कारप्रसंगीही अलिप्तता जोपासणारा गूढ कलाकार

चारुता सागर

पुण्यातली नित्याची एक रम्य संध्याकाळ. टिळक रस्त्यावरले मराठा चेंबरचे झक्क सभागृह. एकोणीसशे एकाहत्तर सालच्या सर्वश्रेष्ठ मराठी लघुकथेबद्दल कॅप्टन लिमये पारितोषिक मिळविणारे श्री. चारुता सागर यांच्या सत्काराचा सोहळा. लिमये समितीचे सभासद आणि पुण्यातले अगदी हाताच्या बोटावर मोजावे असे साहित्यिक. सभागृह थोडेफार भरले होते ते अनाम रसिकांनी. सर्वांच्या चेहऱ्यावर कुतूहल–चारुता सागर कोण ? स्त्री ? पुरुष ? मग आपापसात चर्चा. विभावरी शिरुरकरांच्या नावानं एके काळी अशीच धमाल उडवली होती.

एकानं मला विचारलं, ' कमलेश्वर कोण हो ? ' त्याच्या प्रश्नांत कमलेश्वरही चारुता सागरांसारखाच मराठी लेखक की काय असा संभ्रम होता.

मंचावर मंडळी विराजित झाली तेव्हासुद्धा सभागृहात चारुता सागरांसंबंधी संशोधन चालू होते. उषा चिपलकट्टींनी गोड गळयाने पसायदान मागितले. मग सौ. शकुंतला लाटकरांनी

स्वागतापासून आभारापर्यंत सर्व गोष्टी उरकल्या. उगाच संयोजकांचा सारखा अडथळा नको. सभारंभ सुरेख व्हावा, संपतानाही सुखद राहावा, असा त्यांचा हेतू. तो त्यांनी स्पष्टही चांगला केला. बरे वाटले आणि सभा पु. लं. च्या स्वाधीन झाली.

पु. ल. उभे राहिले. एकदा पाणी पिऊन सहज बोलण्यात दंग झाले. कमलेश्वर कोण हा ज्यांना प्रश्न होता ते थक्क झाले. ' हा एक जबरदस्त हिंदी लेखक. माणसांची भाषा माणसांना ऐकवणारा. त्यानं एक नवं विश्व उभं केलं. जुनं-नवं; व्याख्या-परिभाषा, कला जीवनासाठी की कलेसाठी, असे कितीतरी चर्चा-विषय. पण हे सारे बांध फोडणारा हा बलवान लेखक. बाइम्सच्या ' सारिके'चा समर्थ संपादक. त्याला न ओळखणारा कथाकार विरळा. '

मी थक्क. आमचे काही मित्र गप्प.

मग राम कोलारकर उभे–' एकोणीसशे एकाहत्तरमध्ये एकूण तीन हजार तीनशे कथा मिळाल्या. त्यांपैकी सर्वच्या सर्व (इथे ते थांबतात) मी व सौ. छाया कोलारकर, म्हणजे माझ्या पत्नी यांनी वाचल्या. नंतर गाळून उरल्या त्या दोनशेपस्तीस मी (ठासून) स्वतः वाचल्या. माझ्या चाळणीमधून प्रथम चव्वेचाळीस तदनंतर फक्त बा-वी-स उरल्या. दोन लेखकांनी परवानगी नाकारली. पाहुणे परीक्षक डॉ. भालचंद्र फडके यांची मदत झाली. पु. ल. देशपांडे यांचीही बहुमोल मदत झाली. कॉन्शस् आर्ट आणि अनकॉन्शस आर्ट यांतील नेमका फरक त्यांनी आम्हांला सांगितला आणि परीक्षक समितीतील आठ सभासदांमध्ये जवळजवळ

साडेतीन तासांनंतर एकमत झाले. खरी जातिवंत प्रतिभा ज्या कथेत आहे ती–'

पुन्हा मंडळी चारुता सागरांच्या शोधात ('कोलारकर, तपशील आवरा, लेखक दाखवा म्हणतात.)

एवढ्यात आनंद यादव उभे राहिले म्हणाले, 'परिचयाचे काम माझ्याकडे सोपविण्यात आले आहे. माझाही चारुता सागरांशी फारसा परिचय नाही.

यादव मग असे सांगत राहतात–

चारुता सागर यांचा जन्म १९३० च्या आसपास केव्हातरी झाला असावा. ते शेतकरी. कष्ट करण्यात जन्म जाणारं घर. कसंबसं सात इयत्तापर्यंत पोचले असतील, नसतील. ४८ साली सैन्यात गेले. त्यापूर्वी जुनंपुराणं काही ऐकलेलं, वाचलेलं. भटकंती हा स्वभाव. संन्याशांबरोबर देशात इथंपासून तिथंपर्यंत कुठं कुठं जात राहिले. त्यांना अध्यात्माची ओढ असावी. नावाचं सगळं गूढच आहे. बहुतेक त्या प्रवासी काळातलं ते नाव असावं. '

मंडळी सगळं रहस्यकथेसारखे ऐकत असतात. मी चारुता सागरांकडे मध्येच टक लावून पाहतो. कोणताही भाव नाही. जणू काय चाललंय् यांच्याशी देणघेणं नाही. ढिम्म बसले होते. दूरवर टक्कल पाडीत गेलेलं भव्य कपाळ. काळासा रंग. देवीचे वण चेहऱ्यावर. शांत मुद्रा. चकचकीत टेरिलिनचा बुशशर्ट अगदी कोरा करकरीत वाटत होता. एकूण प्रकृतीशी विसंवादी.

इकडे यादव परिचय देत राहतात–

हिमालयाची त्यांना ओढ आहे. कलावंतांची कलंदर वृत्ती आहे. सेवादलात होते. पाकिस्तानच्या पहिल्या स्वारीच्या वेळी

सैन्यदलात गेले. युद्धबंदीनंतर काय करायचं सैन्यात राहून म्हणून मुंबईला आले. तिथलं बकाल जिणं जगले. हमाली केली. मग गावाकडे आले. १९५६ मध्ये पोटाचा व्यवसाय म्हणून शाळा काढली.

मला कुणीसं सांगितलेलं आठवलं की त्यांच्या शाळेत नागडी पोरंच अधिक येतात. शाळा कसली ? जा पाटी घेऊन म्हणत पिटाळली की काही आली अशी. आजही हीच शिक्षणाची प्रगती. मास्तर काय करणार? यादवांचं सांगणं चालू होतं–' सैन्यात काय काय वाचलं होतं. शरदबाबू विशेष आठवणीत राहिला. मग कधी काय मिळालं ते वाचलं. फारसं असं नाही. एकदा एक गंमत झाली. सातार्‍याला आले होते. वाचनालयात काय मिळतंय का म्हणून गेले. सत्यकथेचा दिवाळी अंक शिल्लक होता. मग तो वाचला. त्यात ' मोट ' कथा होती.

ही यादवांची फार गाजलेली कथा. अस्सल ग्रामीण जीवनावर आधारलेली. ही कथा चारुता सागरांना नवी वाट दाखवून गेली.

' ६७ च्या जूनच्या कथेत चारुता सागरांनी ' वाट ' कथा लिहिली. मग यल्लमाच्या जत्रेची कथा. सैनिक पेशाची कथा. जोगीणीबरोबर प्रवास केल्याची कथा. ह्या सगळ्या अगदी वेगळ्या म्हणून गाजल्या.'

इथं प्रा. यादव एक महत्त्वाचा मुद्दा मांडतात–स्वातंत्र्यानंतर दलितांच्या दारी शिक्षण आलं. त्यांचा विश्वास जागा झाला. खालच्या तळातलं जीवन साहित्यात व्यक्त झालं. माडगूळकर, पाटील, मिरासदार यांच्या ग्रामीण लेखनापेक्षा हे सगळं अगदी

निराळं. अधिक खरं. मनःपूर्वक लिहिलेलं. कला-आकार, आशय आदि बंध न मानणारे, चारुता सागराचं लेखन या कोटीतलं आहे त्यात क्वचित शहरी–ग्रामीण अशी सर मिसळ आहे, पण अनुभव ताकतीनं प्रकट झालाय.'

परिचय संपतो.

चारुता सागर कोण ?

मग सत्कार सोहळा. लोक आता समजतात, तोच गप्प राहिलेला माणूस. जो आतापावेतो असून नव्हता तो माणूस.

मग पु. ल. विलक्षण विनयानं, गंभीर विनंती करतात, 'आता चारुता सागर यांनी काही बोलावं.'

पु. लं. च्या सविनय नमस्काराला तटस्थपणे स्वीकारून उभी राहिलेली व्यक्ती बहुदा प्रथमच माईकपुढे आलीय. " मी चारुता सागर. व्यक्तीपेक्षा कलाकृती श्रेष्ठ. सत्कार 'नागीण' या कथेचा आहे. माझा नाही. मला या प्रसंगी यापेक्षा काही बोलायचं नाही."

सगळं संपलं एवढ्यात–

सर्वांचं कुतूहल तसंच्या तसं. अगदी आधी होतं तेवढंच.

परिचयाच्या वेळी जुन्या जमान्यातले किस्से सांगून पु. ल. नी हसवलेलं. कमलेश्वरांनीही मग तशीच सुरुवात केली. म्हणाले, 'माझं हिंदी नाही रुचलं पटलं तर पु. ल. ना दोष द्या. तेच या पामराला घेऊन आलेत.'

पु. ल. ची नि त्यांची मैत्री जुनी. गडद गहिरी आणि ओलाव्याची.

कमलेश्वर म्हणाले,

'तुमचं पुणं कसं अलाहाबादेसारखं साहित्यिक शहर आहे. मला इथं बरं वाटतं. हिंदीतले पहिले आधुनिक कथाकार माधवराव सप्रे हे एक महाराष्ट्रीय सद्‌गृहस्थ आहेत.

ऐकून मंडळी थक्क. काही अतिशय खुश.

कमलेश्वर म्हणाले, 'तीन बाते 'विचित्र' लगी' (म्हणजे वैशिष्टचपूर्ण बरं) इथे एकाच कथेसाठी लेखकाला पारितोषिक दिलं जातंय. माझ्या माहितीत हा उपक्रम इतर भारतीय भाषांत कुठेही नाही. दुसरं यासाठी की मराठीतले आठ विद्वान एकमत झालेत ! आणि तिसरं हा सैन्यात वगैरे असलेला माणूस सुरेख लेखणी चालवतोय. ज्याचा एकही संग्रह नाही. जो पदस्थ नाही असा हा अगदी नवा लेखक आहे.

मग ते म्हणाले--

'सांप्रत देशाची स्थिती भयानक आहे. साहित्याचं म्हणाल तर एक कथा पेश करतो.

दोन प्रवासी. दिल्ली ते मुंबई. वाटेत बक्कळ प्रश्न. सर्वांची उत्तरे प्रश्नांतच सामावलेली. तुम्ही तिथे आम्ही तिथेच. हे असे. हो हे असे. ते तसे. हो ते तसे. अखेर सहप्रवासी भडकले. म्हणाले, काय पाचकळपणा लावलाय ? तशी ते म्हणाले, 'आम्ही बापलेक आहोत. एवढा प्रवास करायचा. वेळ नको जायला ? बसलो झालं बोलत !'

सगळ्या निरर्थक गोष्टी. साहित्याचा बराच प्रवास आजवर अशा रस्त्यानं झालाय. आलतू फालतू फार. खरं कमी. खोटं खूप.

मग एक सैनिक कथा. हल्लेखोर, आक्रमक, क्रूर, लुटारू आणि संरक्षक, क्रांतिकारक, असलं सगळं नेमकं कोण ? कोणीच

नाही. सगळे एका माळेचे मणी. वास्तव फार, उघड-नागडं, त्यापुढं समाज नम्र. व्यक्ती देखील मान तुकवणारी. उगाच गमजा करणं, बढाया मारणं अकारण नव्हे काय ?

तिसरी कथा पुन्हा एका सैनिक अधिकाऱ्याची. त्याची बायको आजारी. नित्य हंसाचं मांस हवं असतं. सैनिक पाठवतो. वर्दीत जातात; हंस दूर पळतात. शेवटी शक्कल सुचते. सैनिक साधुवेशात गेले, हंस जवळ आले.

मंडळींना बळी मिळाले. सैनिक सपशेल पराभूत. आज नेमकी ही स्थिती. तुम्ही ढोंगी बना. सोंग वठवा. यश गाठी आलेच.

मग वॉर्साची ती प्रसिद्ध कथा. सर्कशीतला नवरा आणि बायको. ती दुसऱ्याला चाहू लागली. त्यानं ठरवलं हिला खलास करायचं. पण जमलंच नाही. कारण तो कलाकार होता ! चुकीचा नेम त्याला साधलाच नाही.

बौद्धिकता आयात करता येईल, पण आपल्या मातीचा रंग, वास तर इथलाच. तो अस्सल असतो. त्याचं भान ठेवणं म्हणजे 'बोधा'(विजडम) ची कदर करणं. आम्ही सगळे गुणी, अवगुणी, मूर्ख, लायक, नालायक, दुसऱ्याच्या दुःखानं दुःखी होणंही खरं. स्वतःच्या दुःखानं कष्टी होणंही खरं. माणूस माणसासारखा असतो–बरा, वाईट, खरा, खोटा. असेल तसा. त्याला असा कथेत सांगायचा, दाखवायचा की शास्त्रीपंडितांनी केलेल्या व्याख्या कुचकामी ठराव्यात. नवी कथा ही अशी असते. तथाकथित वाङ्मयाच्या व्याख्यांना अडचणीत टाकणारी ! '

भाषण संपवता संपवता ते चारुता सागर यांची 'नागीण' कथा ही केवळ मराठी नाही असे म्हणतात. या कथेत खरा

माणूस आहे. कुठलंही लेबल नाही, प्रचार नाही. पाहिलं, दिसलं, तसं सांगितलं असं आहे काही तरी प्रस्फूर्त, जाणीव संपन्न करणारं, प्रश्न निर्माण करणारं, उत्तरं सांगणारं नव्हे.

या नंतर प्रा. डॉ. भालचंद्र फडके एक वक्तव्य देतात. ठाशीव. ते कथेचं उत्तम रसग्रहण करतात.

प्रेक्षक श्रोते मनाशी म्हणतात,

" चारुता सागर काय म्हणतात ?"

मी पाहतो ते पूर्वीपेक्षाही तटस्थ बसलेत. तो हार त्यांना दिसत नाही. ती प्रशंसा त्यांना समजत नाही. सत्कार ' नागीण ' कथेचा चाललाय, जणू ती कथा आपोआप लिहिली गेलीय.

अखेरचा गोड कार्यक्रम एरवी किती अगोड असतो ? इथे तो विलक्षण गोड झाला. पु. ल. नी ' नागीण ' वाचली कसली, जिती उभी केली. तिचं ते फूतफ्फूस्सर ऽ सगळं. अन् बापूचं बोलणं, चंद्राची घालमेल, सासूबाईचं सांगणं, खेड्यातला कायलो-वाट. अगदी सगळं. चारुता सागरनं लिहिलंय चित्रासारखे. पु. ल. नी ते चित्रच समोर धरलेले.

अखेर झाली समारंभाची तेव्हा मंडळी पुन्हा गूढ विचारात रमलेली. हा चारुता सागर कोण ? कुठला ? होता कुठे ? आला कसा ? त्यानं हे सगळं लिहिलं कसं ?

परतीच्या प्रवासात माझ्याबरोबर योगायोगाने मळण-गावाकडला माणूस, तोही माझ्यासारखाच बुचकळ्यात बुडालेला. म्हणाला, त्यांनी आजच असा शहरी वेश केलाय. आमचा गाव टीचभर. सांगलीहून खूप आत. मळणगावात सुधारणा बिधारणा काही नाही. हे तिथंच दंग राहत्यात. आपल्या गावाकडं शेतीत

मस्त असत्यात. शेती नव्हे खरं. टीचभर मळा. मिणमिणी दिवटी घेऊन वाचत्यात. वाचायची अशी जागाच न्हाई. कुठं बी. पण म्हणाल कुठं तर कोंबडयाचा खोपा हाय. ती जागा निवांत. तिथं बसत्यात. गप गप असत्यात. गावासनं शाळा साताठ मैलांवर. कधी चालत, कधी सायकलीवर. एकदा तर सायकलच डोक्यावर धरून आणले नि एकदा तडक बद्रिकेदाराला गेला. त्यांना थंडी बिडी काय नाय. वाचायचं म्हणताय ? जसं जमेल तसं. परीस विचारात बुडालेला माणून हाय. शांत शांत असतोय. आम्हांला बी गूढच हाय.

समारंभाला मळणगावकडची पंधरावीस मंडळी आली होती. त्यांच्या अंगावर शहरी कापडं होती. पण गावकडल्या माणसासारखीच अबोल, आतल्या आत बोलणारी. कधी काही सांगतील ते चारुता सागरासारखंच.

'रविवार केसरी' १ डिसेंबर १९७४

卐 卐 卐

गांधीजींचा हिंदीसेवी अनुयायी

गो. प. नेने

गांधीजींच्या जन्मशताब्दीच्या वर्षामध्ये कितीतरी कार्य-क्रमांची धमाल उडाली होती. गांधीवादी आणि विरोधक सारेच या उत्सव पर्वांत उत्साहाने सामील होऊन गेले होते. आमचे नेनेही त्यांत हरवून बसले होते. मी गांधीजींना पाहिलेलं नाही. अलीकडं केव्हा तरी थोडं कळायला लागलं, तेव्हापासून त्यांच्याविषयी विचार केलाय. त्यांचे खरे अनुयायी शोधण्याचा प्रयत्न केलाय. गांधीजींचे ज्यांना सर्वार्थाने अनुयायी म्हणावे असे नेते स्वराज्यात फार कमी दिसतात. खरं म्हणजे सत्ता आणि नेतृत्व या दोहोशी ज्यांचा संबंध येतो, त्यांना बापूजींचे शिष्यत्व प्रथम स्वीकारले तरी नंतर ते सतत टिकविणे अवघड होऊन बसते. असाच अलीकडचा अनुभव. पण विधायक सामाजिक कार्याच्या क्षेत्रात जो जो शोध घ्यावा, तो तो आपण गांधीजींचा वारसा या देशाने अगदीच त्याज्य मानलेला नाही, या सत्यापाशी येऊन पोहोचतो. मग कधी गांधीजींनी स्वीकारलेल्या अनेक समाजोपयोगी कार्यक्रमांपैकी एखादाच निष्ठापूर्वक स्वीकारून दूरवर आलेले

काही ध्येयवादी दिसतात. आमचे नेने खरं तर असे गांधीजींचे निष्ठावंत अनुयायी. तसे सर्वांना राष्ट्र भाषा सभेचे नेने म्हणून ठाऊक असलेले. पण कदाचित ठाऊक म्हणून अपरिचित राहिलेले.

श्री. गोपाळ परशुराम नेनें हे वाराणसीचे. १९१३ सालचा जन्म. सारे शिक्षणही काशीलाच घडले. तिथल्या बनारस हिंदु विद्यापीठातून अर्थशास्त्र व राज्यशास्त्र विषयांची पदवी घेतली. पुढे अहालाबादेस आले. एम. ए. व्हायचे म्हणून. पण राजकारणात उडी घ्यावयाचा अनिवार मोह झाला. एम. ए. सोडून त्यात पडले. अर्थातच परीक्षांचे शिक्षण तेव्हापासून बंद.

काही काळ नेने क्रांतिकारकांतही वावरले. पण त्यांची प्रकृती तिथं फारशी जुळली नाही. गांधीजींचा मार्ग त्यांना अधिक पसंत पडला. त्यांतही त्यांनी त्यांचा हिंदी-प्रचाराचा विचार अधिक आवडीने उचलला आणि मग आजवर तेच चाललंय.

संथ जीवनप्रवाह. सारं कसं ठरवून घडविलेलं. आधी योजलं, मग केलं. पुढचं ठरवलं तसं केलं. योजकता मोठी. यशही खूप मिळाले. तसा हिंदीचा प्रांत सदैव वादळाचा. अजून तरी हिंदी-संबंधी आमचं कुठं एकमत झालंय ! पण नेने यांनी आपल्या उमेदीची सगळी वर्षे खर्ची घालून आणि कालमान परिस्थिती-प्रमाणे ध्येयधोरणे आखून मोठ्या शिताफीने महाराष्ट्र राष्ट्र-भाषा सभेचं तारू पैलतीराला आणलं. आज राष्ट्रभाषा सभा महाराष्ट्रातली एक मातब्बर संस्था बनून गेली आहे. हजारो हिंदीचे कार्यकर्ते लोक तिच्याशी संबंध ठेवून आहेत. मोठा थोरला

प्रपंच आहे. मुद्रणालय आहे. प्रकाशने आहेत, परीक्षा आहेत, लाखांनी मुले बसली आहेत, बसणार आहेत. महाराष्ट्रात मराठीची नाहीत एवढी हिंदीची राष्ट्रभाषा-भवने आहेत. तुम्ही महाराष्ट्रातील जिल्ह्याच्या कुठल्याही गावी जा तिथं तुम्हाला सभेचा छोटामोठा संसार दिसेल. तालुक्याच्या गावी जा, कुणीतरी प्रचारक भेटेल. या साऱ्यांची संघटना शोधून एक मोठा थोरला स्नेही–समाज नेन्यांनी आणि त्यांच्या मित्रांनी बांधला आहे. मुख्यत: या भगीरथ प्रयत्नाचे श्रेय नेन्यांकडे जाते. हे त्यांचे सहकारी मान्यही करतात. आज नेने कृतार्थ होऊन वडिलधाऱ्याच्या भूमिकेने वावरतात. अगदी कधी कधी खटकावी अशी तटस्थता घेऊन वागतात.

पण नेने अत्यंत चतुर संघटक आहेत. जुन्यांशीही दोस्ती, नव्यांशीही मैत्री, असे त्यांचे वागणे आहे. मतभेद मिटविण्यात आजवर ते यशस्वी झाले. स्वत: कार्यप्रवण आणि सर्वसमावेशक स्वभावाचे, म्हणून त्यांच्यावर सज्जनांचा लोभ जडतो. त्यामुळे मतभेद असला, तरी तो त्यांच्या समोर विरून जातो.

राष्ट्रभाषा सभा यशस्वी करणारे एक कुशल संस्था-संघटक म्हणून मला ते मोठे वाटतात, पण त्याहीपेक्षा एक निष्ठावान आणि क्रियाशील गांधीवादी म्हणून थोर वाटतात. त्यांची गांधीजींवरची निष्ठा-श्रद्धा अढळ आहे. मग ती कुणाला पटो की न पटो. त्यांनी खादीचे व्रत आचरले आहे आणि सतत विधायक वृत्ती ठेवली आहे.

आज नेने राष्ट्रभाषा सभेपेक्षा हिंदी संस्था-संघात अधिक गुंतून पडले आहेत. दिल्लीला ही संघटना आहे. साऱ्या भारतातील हिंदी संस्थांचे आरंभापासून नेने कार्यवाह आहेत. कर्णधार आहेत.

हा एक मोठाच डोकेदुखीचा उद्योग. हिंदी, अहिंदी आणि नको हिंदी म्हणणारे....साऱ्यांनाच संभाळण्याचा हा उद्योग. सगळ्यांची गाऱ्हाणीच खूप. पुन्हा शासनाचा नित्य नवा पवित्रा. पण नेन्यांची सहनशक्ती आणि अनुभवही तसाच जबरदस्त. हा सारा नवा व्याप मोठ्या चिकाटीने त्यांनी सांभाळला आहे. अगदी प्रकृतीचा विचार न करता सांभाळला आहे.

वयाच्या पन्नाशीपाशीच नेन्यांना प्रकृती प्रतिकूल झाली, पण त्यांनी स्वत:च्या मनाची प्रसन्नता हटू दिली नाही.

शांत हसरी मुद्रा. शिडशिडीत ऊंच अंगकाठी. खादीचा साधा पेहेराव. बोलणं गोड, दुसऱ्याचं ऐकून घेऊन त्यावर सुरेख उत्तर. राजभाषा संमेलनात दाक्षिणात्यांची कंठाळी भाषणे आणि उत्तर भारतीयांचा भरपूर भाबडा अभिनयप्रचुर अभिनिवेश दिसतो. त्यावेळी नेने यांची विशिष्ट प्रतिमा, त्यांचा प्रभावी मराठबाणा प्रकट करून जाते.

त्यांच्या संघटना कौशल्यामुळेच अखिल भारतीय पातळीवर हिंदी प्रचार संस्थांची एक सबळ संघटना खडी झाली आहे. या अखिल भारतीय हिंदी संस्थासंघातर्फे विविध प्रांतातील राष्ट्रभाषा प्रचाराचे आणि परीक्षांचे कामाला एक सुसूत्रता आणण्यात आली आहे.

आता संस्था-संघाने राजभाषा हिंदीच्या प्रश्नावर जनमत संघटित करण्याचा कार्यक्रम आखला आहे. मध्यवर्ती शासन आणि भारतीय नेतृत्व कणखर असण्याच्या या काळात राजभाषेचा प्रश्न निर्धारपूर्वक सोडविला जावा अशी श्री. नेनेजींसारख्या निष्ठावान कार्यकर्त्यांची तळमळ आहे.

१९७२ च्या एप्रिलमध्ये मला त्यांच्यासमवेत दिल्ली येथे भरलेल्या अ. भा. राजभाषा संमेलनात सहभागी होण्याचा योग आला होता. या संमेलनाच्या वेळी श्री. नेनेजींची योजनाकुशल आणि सर्व समावेशक स्वभाव-वैशिष्टचे मला जवळून तर दिसलीच, पण अखिल भारतीय पातळीवरील राष्ट्रभाषाविषयक नेतृत्व त्यांना कसे लाभले आहे, याचाही प्रत्यय आला. अलीकडे त्यांना राजभाषा-विषयक एक प्रश्नावली मी दिली होती. ते प्रश्न आणि नेनेजींचे प्रतिपादन यांतून एका त्यागशील हिंदी सेवकाचा एका महत्त्वाच्या राष्ट्रीय समस्येसंबंधीचा दृष्टिकोन तर स्पष्ट होईलच, पण संबंधितांना नवा विचार करावयास प्रेरणाही लाभेल.

राष्ट्रभाषा संमेलने भरवण्याचे औचित्य व प्रयोजन कोणते?

दिल्ली येथे पहिले अ. भा. राजभाषा संमेलन झाले. प्रश्न असा आहे की, भारतीय घटनेनुसार केंद्र सरकारची भाषा हिंदी ठरली हे खरे. घटनेत हिंदीच्या विकासासाठी १५ वर्षांची मुदत घातलेली होती. या काळात हिंदीचा विकास व्हावा अशी घटना-तज्ञांची कल्पना. १९५० मध्ये घटना अमलात आल्यापासून प्रथम पाच वर्षांनी, त्यानंतर पुनः पाच वर्षांनी राष्ट्रपतींनी राष्ट्रभाषा आयोग नेमावयाचा. व त्याने केंद्र सरकारच्या राज्यकारभारात क्रमाक्रमाने कशा प्रकारे हिंदीचा वापर करण्यात येईल, याबाबत पाहणी करून रिपोर्ट द्यावयाचा होता. १९५५ त आयोगाची नेमणूक होऊन त्याने आपला रिपोर्ट सादर केला, पण हिंदीबाबत काहीच प्रगती न झाल्यामुळे १९६० मध्ये दुसऱ्या आयोगाची नेमणूकच झाली नाही. पुढे हिंदीला काही भागांतून विरोध सुरू झाला, त्यामुळे हा प्रश्न लोंबकळत पडला. म्हणून राजभाषा संमेलनाची गरज निर्माण झाली आहे.

काही भागांतून हिंदीला विरोध होत आहे, त्याची कारणे काय ?

हिंदीला मुख्यतः दक्षिण भारतातून, तसेच बंगालमधून विरोध आहे हे खरे आहे. याबाबतीत स्थिती अशी की, मद्रास येथे १९१८ मध्ये गांधीजींनी हिंदी प्रचाराची मुहूर्तमेढ रोवली. पण पन्नास वर्षांनी तेथूनच हिंदीला विरोध होऊ लागला. त्याचा परिणाम असा झाला की, दोन वेळा राजभाषा कायद्यात दुरुस्ती करावी लागली. फार मोठी अडचण निर्माण झाली ती अशी की, सर्व राज्यांची विधिमंडळे केंद्रसरकारात इंग्रजीचा वापर रद्द करण्यासंबंधी ठराव करीत नाहीत, तोपर्यंत इंग्रजी चालू राहणार अशी राजभाषा कायद्यात दुरुस्ती झाली आहे. सध्या देशात आणखी एक नवी परिस्थिती निर्माण झाली आहे. नागालँड या राज्याची राजभाषा इंग्रजी आहे. मिझोराज, मेघालय यांचीही राजभाषा इंग्रजी होण्याची शक्यता आहे. ही राज्ये केंद्रात केंद्र सरकारची भाषा हिंदी व्हावी असे म्हणतील का ? की इंग्रजी व हिंदी दोन्ही राहाव्या म्हणतील ? अर्थात इंग्रजीच चालू राहील. याचा व्यावहारिक अर्थ असा की, मुख्य व प्रभावी भाषा इंग्रजी होईल व ती कायमपणे राहील. इंग्रजीच्या पाठीराख्यांचा आग्रह असा आहे की, राज्य घटनेच्या आठव्या परिशिष्टात इतर भारतीय भाषांबरोबर इंग्रजीचा समावेश करावा, या सर्वांचा काय परिणाम होणार ते उघडच आहे.

म्हणजे केंद्र शासनात इंग्रजीच राहणार तर ?

हा धोका तर आहेच, पण सर्व राज्यातही इंग्रजीचा वापर फार मोठ्या प्रमाणात होणे अपरिहार्य आहे. याचा सरळ अर्थ

असा की, राज्यातून तेथील प्रादेशिक भाषा व केंद्रात हिंदी ह्या राजभाषा होण्याऐवजी सर्व देशभर सध्याप्रमाणेच इंग्रजीचे प्रस्थ चालू राहील. तसे व्हावयाचे असल्यास देशी भाषांच्या विकासासाठी एवढी धडपड व प्रचंड खर्च करण्यात औचित्य काय ?

याबाबत एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, लोकशाहीत जनतेला जागरूक व शिक्षित ठेवण्यासाठी लोकभाषांचाच वापर झाला पाहिजे, म्हणून अखिल भारतीय व्यवहारात हिंदी व राज्यातून तेथील प्रादेशिक भाषा यांचे स्थान सार्वभौम असले पाहिजे.

राशभाषा संमेलनाकरवी हे परिवर्तन कसे काय घडवून आणणार ?

देशी भाषांचा शासनात वापर व्हावा म्हणून जनमत संघटित करणे व देशातील केंद्र व राज्य सरकारांशी संपर्क साधणे, ह्या हेतूस्तव एक हिंदी फोरम (राजभाषा-मंच) आता स्थापन झाला आहे. देशी भाषांच्या विकासाचे; अनुवादाचे कार्य सर्वत्र चालू आहे. पारिभाषिक शब्दावली तयार झाली आहे. अनेक राज्य सरकारांनी शासनाची भाषा म्हणून कायद्याने प्रदेश भाषांचा स्वीकार केला आहे. बिहार व उत्तर प्रदेश सरकारांनी तर इंग्रजीचा वापर थांबवण्याबाबत तारखा ठरवल्या होत्या; पण त्यांना त्या रद्द कराव्या लागल्या.

हिंदीच्या बाबत बोलावयाचे तर अहिंदी भाषी प्रदेशात गेल्या अनेक वर्षांपासून हिंदी शिक्षणाची सोय झाली आहे. संस्थांच्या परीक्षांना लक्षावधी लोक बसले. म्हणून हिंदी त्यायोगे

आपोआप केंद्र सरकारची राजभाषा बनेल असे नाही. जनमताचे दडपण आणावे लागेल. येत्या दहा वर्षांत राजकीय क्षेत्रात जे नव्या पिढीचे लोक येतील त्यांना हा प्रश्न समजावून सांगावा लागेल. तरच सर्व विधान मंडळांमधून इंग्रजीचा वापर थांबवण्या-बद्दल पुढे मागे ठराव होऊ शकतील. राजभाषा संमेलनामुळे असे जनमत प्रभावी होत राहील.

म्हणजे जनमत अनुकूल करण्यावर तुमचा भर आहे म्हणावयाचा ?

अर्थातच, नाही तर एकीकडे प्रांतिक भाषांचा विकास होत राहील, तर दुसरीकडे जनमत अनुकूल नसल्यामुळे सरकारी व्यवहारात आवश्यक भाषा-परिवर्तन मात्र घडून यावयाचे नाही.

राजभाषा-मंचातर्फे प्रत्येक राज्यात तेथील भाषा शासनात आणण्याच्या दृष्टीने कितपत प्रगती होत आहे ह्याचे सतत निरीक्षण चालू राहील व राज्यातील राज्यकर्ते, साहित्यिक, शिक्षण-तज्ज्ञ इत्यादींशी विचार-विनिमय करून ठिकठिकाणी मेळावे भरविले जातील व त्या भागात आवश्यक त्या स्वरूपाचे ठराव केले जातील. हिंदी फोरममार्फत निरनिराळ्या ठिकाणी संमेलने भरवली जातील. केंद्र सरकारकडे भाषा-परिवर्तनासंबंधी क्रमबद्ध योजनेची मागणी केली जाईल. तशीच मागणी सर्व राज्य सर-कारांकडेही केली जाईल. काही निश्चित कालावधी ठरवून क्रमबद्ध योजना केल्यावाचून भाषा-परिवर्तनाचे उद्दिष्ट साध्य होणे कठीण होय. फोरममार्फत ह्या गोष्टीवर भर दिला जाईल. राज्य घटनेत १५ वर्षांची मुदत देऊनही योजनाबद्ध कार्यक्रम शासनाने न दिल्याने प्रगती होऊ शकली नाही हा इतिहास जुना झालेला नाही.

शासनातून इंग्रजी नको मग शिक्षणात तरी कशाला हवे, असे आपण मानता काय ?

इंग्रजीबाबत आमची भूमिका अशी की, ऐतिहासिक कारणामुळे इंग्रजी भारतात रूढ झाली. ज्ञान-विज्ञानाच्या दृष्टीने तिचा उपयोग करून घेतला पाहिजे. त्यामुळे संसेदेने ठराव करून शिक्षणाच्या क्षेत्रात त्रिभाषा-सूत्र मान्य केले, ते योग्यच आहे.

हिंदी ही सार्वदेशीय पातळीवर संपर्क भाषा राहील व राज्यांतून प्रादेशिक भाषा राज्यभाषा बनतील असेच आपणांस म्हणावयाचे आहे का ?

राष्ट्रभाषा व संपर्क भाषा यांमधील भेद लक्षात घेतला पाहिजे. या देशातील सर्वच भाषा ह्या राष्ट्रीय भाषा आहेत, तरीही भारत हे एक राष्ट्र असल्याने सर्वांना जोडणारी सार्वदेशीय अशी एक भाषा हवी. अशा व्यापक आणि व्यावहारिक संदर्भात पं. जवाहरलाल नेहरूंनी 'संपर्क भाषा' ह्या शब्दाचा वापर केला, पण अलीकडे कित्येक लोक मूळ कल्पनेचा विपर्यास करून ह्या शब्दाचा वापर करीत आहेत.

भारतीय घटनेनुसार हिंदी राजभाषेची तीन उद्दिष्टे आहेत– (१) राज्याराज्यातील व्यवहार, (२) केंद्र व राज्य यांमधील व्यवहार, (३) केंद्र शासनाचा सर्व व्यवहार. यांतील पहिल्या दोन उद्दिष्टांपुरतेच स्वरूप मर्यादित असते तर संपर्क भाषा हा शब्द उचित ठरला असता, पण केंद्रीय सरकारच्या सर्व व्यवहाराचे माध्यम म्हणूनही हिंदीचा स्वीकार केला आहे. त्या अर्थाने हिंदीला संघ-भाषा म्हणणे उचित ठरेल.

भारत हे संघराज्य आहे. पण सर्व राज्ये सर्व प्रकारच्या व्यवहारासाठी आपली भाषा वापरणार, त्यामुळे केवळ ह्या घटक राज्यांचा परस्पर व्यवहार ठेवण्यापुरती एखादी भाषा, अशी हिंदी विषयी कल्पना करणे बरोबर नव्हे. केंद्र सरकार हे सर्व भारताचे सरकार होय. केंद्र सरकारची भाषा भारतव्याप्त राहणार अशा व्यापक अर्थाने संघभाषा हिंदीकडे पाहिले पाहिजे.

हिंदी फोरमतर्फे देशभर राजभाषांचा प्रश्न हाताळला जाणार काय ?

होय, हा फोरम केवळ हिंदीपुरताच मर्यादित नाही. सर्व राज्यांतून प्रादेशिक भाषा व्यवहारतः राजभाषा झाल्या पाहिजेत, यावर भर देऊन फोरम देशातील जनमत जागृत व संघटित करील.

राज्यांमधून तेथील भाषांमध्ये राज्यकारभार चालण्याचा परिणाम केंद्रात एकमेव हिंदीचा संपूर्णतः व्यवहारतः वापर सत्वर होण्यामध्ये दिसून येईल. केंद्र सरकारात जी भाषा वापरात असेल ती भाषा काही प्रमाणात राज्यातून राजभाषा म्हणून वापरणे हे केंद्र व राज्य यांच्या परस्पर संबंधामुळे अपरिहार्य आहे.

नेनेजींची ही मुलाखत पुरेशी बोलकी आहे. येत्या पन्नास वर्षांत हिंदीसाठी म्हणजे पर्यायाने भाषिक दृष्टीने भावात्म ऐक्यासाठी आणि त्यायोगे देशाच्या ऐक्यासाठी आपण काय करायला हवे या विषयीची ती एक दूरदृष्टी आहे.

वयाच्या सत्तरीकडे निघालेले, नेने या त्यांच्या दूरदृष्टीस कुणाकुणाची साथ मिळेल याचा वेध घेत आहेत. आणि आपल्या परीने काही विधायक करीतही आहेत.

सार्वजनिक जीवनात हरवून गेलेला माणूस सहसा पुस्तकाच्या दुनियेत रमत नाही. पण नेने मोठे चोखंळ वाचक आहेत. प्रवासात पुस्तकांची चैन करतात आणि कसे ताजेतवाने राहतात; मग उत्साहाने बोलतात. बारकावे जाणतात, चर्चा करतात. ऐकणाऱ्यांना प्रभावित करतात.

लिखाणाची त्यांना हौसच म्हटली पाहिजे. कारण, शब्दकोशासारख्या कटकटीच्या उद्योगात ते रमले. राष्ट्रभाषाप्रचाराचा इतिहास लिहिला. या अशा संदर्भ-वाङ्मयापासून अगदी लहानग्यांच्या निबंध-गोष्टींपर्यंत कितीतरी गोष्टी त्यांनी लिहिल्या. राष्ट्रभाषेचा प्रचार आंदोलनाचा त्यांनी लिहिलेला इतिहास परखड आहे. पण श्रीपाद जोश्यांबरोबरचा त्यांचा हिंदी-मराठी कोश विशेष महत्त्वाचा. या कोशाची नुकतीच परिवर्द्धित आवृत्ती प्रसिद्ध झाली. हिंदी-मराठीच्या संबंधाचा हा एक लक्षणीय सेतुबंध ठरेल.

नेने फर्डे वक्ते आहेत. हिंदी आणि मराठी दोन्ही भाषांवर प्रभुत्व असणे जरा दुरापास्तच. नेन्यांनी ते साधले आहे. ते सुंदर हिंदी बोलतात. स्वच्छ मराठी बोलतात. तसा अभिनिवेश कमीच. पण गोड आवाज, आर्जवी प्रतिपादन आणि रसिक शब्दयोजना. अगदी आभाराचे बोलले, तरी सभा जिंकतात.

नेत्यांनी महाराष्ट्र आणि राष्ट्रभाषा यांसाठी खूप केले. चाळीस वर्षे प्रामुख्याने तेच केले आणि कृतार्थ झाले आहेत.... सभेच्या ‘ राष्ट्रवाणी ’ मासिकाचे तेवीस वर्षे त्यांनी संपादन केले आहे. एके काळी ‘ राष्ट्रवाणी ’ हे महाराष्ट्राचे हिंदी मुखपत्र होते. आज ते नाही. खरे तर आज महाराष्ट्रात हिंदीचे असे ‘ जिवंत ’

मासिकच नाही. नेने किंवा त्यांचे अनुयायी जर मनात आणतील, तर महाराष्ट्राची ' राष्ट्रवाणी ' पुन्हा आत्मिक सामर्थ्याने गर्जून उठेल आणि राष्ट्रघडणीच्या कार्यात ती आपल्या परीने महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करील.

त्यांच्यातील निष्ठावान हिंदी प्रचारक अधिक परिचित करावा म्हणून हा शब्दांचा प्रपंच. त्यांचे ते स्थान फार मोठे आहे. महात्माजींच्या विधायक कार्यक्रमांपैकी राष्ट्रभाषेचा कार्यक्रम महाराष्ट्रात रुजविणाऱ्या यशस्वी, ध्येयवादी अनुयायांत त्यांचे स्थान अढळ आहे. गेल्या पंचवीस वर्षांतील महाराष्ट्राचा इतिहास ज्या काही निष्ठावंत कार्यकर्त्यांनी समृद्ध केला त्यात राष्ट्रभाषा हिंदीचा एक श्रेष्ठ प्रचारक म्हणून श्री. गोपाळ परशुराम नेने यांचे नाव गौरवाने नोंदविले जाईल. त्यांच्याविषयी तुम्ही-आम्ही सर्वांनी कृतज्ञता बाळगली पाहिजे. परंतु कृतज्ञतेपोटी त्यांना प्रिय असणाऱ्या कार्याचे सातत्य राखण्याची प्रेरणा प्राप्त केली तरच ती कृतज्ञता प्रामाणिक ठरेल. एरव्ही मोठ्यांचे यश हे आपलेच यश आहे असे मानून कृतार्थता अनुभवणारे अनुयायी शेकड्यांनी भेटतात. श्री. नेने यांच्या बाबतीत तसे घडले तर आपण त्यांच्या कार्याचे अवमूलन केले असे होईल. सुदैवाने तसे न घडो हीच इच्छा.

रविवार केसरी/विशाल सह्याद्री २२ जुलै १९७३

卐 卐 卐

सद्सद्‌विवेकाला जागणारा शिक्षक

प्राचार्य ग. वि. अकोलकर

अलीकडे शिक्षणाच्या क्षेत्रात अलबत्यागलबत्याचे राज्य आहे. ज्यांनी शाळा-कॉलेजाची वाटदेखील तुडविली नाही ती मंडळी आज या क्षेत्रात उतरून चक्क शाळा-कॉलेजे काढतात. विद्यापीठे त्यांना दबून राहतात. इकडे बिचारा प्राथमिक शिक्षक अश्रूविना जगतो आहे. माध्यमिक शिक्षक वह्या, कॅटलॉग आणि मेथडमध्ये गुदमरतो आहे. दोन पदव्या घेऊन कॉलेजात आलेला प्राध्यापक सध्या वेतनश्रेणीच्या सुंदोपसुंदीत हरवून बसला आहे. एकूण साराच आनंदीआनंद आहे !

पण आम्ही खरं तर हे सारं विसरायलाच हवं. ‘ आपल्याला राष्ट्र घडवायचंय ! हा देश तुमचा–आमचा, सर्वांचा आहे. लोकशाही ही एक गतिमान कल्पना आहे, तो (एक आचार नसून) ‘ विचार आहे. आम्ही–तुम्ही एका क्रांतीला सामोरे जात आहोत. तुमचा–आमचा प्रवास खडतर आहे. त्याची आम्हालाही कल्पना आहे, त्याची तुम्हालाही कल्पना आहे.... अशी बुद्रुक भाषणे ऐकून, वाचून आम्ही सारे विसरून जायचे.

म्हणायचं मनाला, विचार केलास तर झिजून जाशील. मान डोलावलीस तर म्होरं जाशील.

.... पण हे सारं सुचलं कसं ?

परवा नाशिकच्या बी. एड्. कॉलेजच्या प्राचार्यपदावरून प्रा. ग. वि. अकोलकर खाली उतरले. 'योगायोगाने' ज्या दिवशी त्यांची निवृत्ती झाली, सत्कार-सोहळा साजरा झाला, त्याच दिवशी त्यांची साठीही उलटली. साराच सुंदर साधलेला योगायोग! अकोलकर म्हणाले, 'मला माझ्या विद्यार्थ्यांनी अपार प्रेम दिलं. तेच माझं बळ.' विद्यार्थी म्हणाले, 'आम्ही प्राचार्य अकोलकरांसाठी नाशकात आलो.' कुणी धुळ्याचा, कुणी अमळनेरचा, कुणी औरंगाबादेहून आलेला, तर कुणी थेट कऱ्हाड-साताऱ्याकडून आलेला, रोटरी क्लबातही सत्काराला उत्तर देताना अकोलकर उद्गारले, 'आता मी अधिक स्वस्थ चित्तानं ग्रंथ-लेखन करणार आहे. मला विद्यार्थ्यांनी उदंड स्नेह दिला. मी तृप्त आहे !' .... आणि कौतुकानं भरलेले मथळे देऊन वर्तमानपत्रांनी ह्या बातम्याही दिल्या.... आता खरं तर विषय इथंच संपला की नाही ?

पण तसं झालं नाही. अकोलकरांसारख्या सच्च्या माणसाची निवृत्ती अशी सहजी होत नसते. कारण लोक त्या निवृत्तीची वाट पाहत नसतात. उलट लोक त्या निवृत्तीने अधिकच अस्वस्थ होतात, जागे होतात. नाशकात आता त्यांच्या सत्काराची धमाल उडाली आहे. सारेच त्यांच्यावर स्तुति-सुमने उधळत आहेत. सत्काराला जाणारा आणि खबरा वाचणारा सामान्य माणूस कोड्यात पडतो, एकदम अकोलकर निवृत्त कसे झाले ?'

साठी भरली एवढेच कारण ? सामान्यांच्या मनात मग बऱ्याच शंकाकुशंका येतात. पण त्याबद्दल कुणीच बोलत नाही. स्वतः अकोलकर तर तृप्तीबद्दलच बोलताहेत.

आणि खरे तर अकोलकरांनी तृप्तच असले पाहिजे. विद्यार्थ्यांनी त्यांना निखळ प्रेम दिले. त्यांचा सुधाकर पवार मोठा झाला, रा. ग. जाधव चमकला, देवीदास बागूलही पुढे आला. कितीकांनी नावं कमावली आणि संस्था ? त्याही नावारूपाला पोहोचल्या. त्यांनीही अकोलकरसाहेबांकडून पुष्कळ मिळविले. ते त्या संस्थांच्या इतिहासात जमा राहील. शिक्षण-शास्त्रावरची त्यांची ग्रंथसंपदा ग्रंथालयांचे भूषण ठरली आहे. अभ्यासक, अकोलकरांना आदराने आठवतात .... अण्णांनी, होय, नाशिक-करांचे ते अण्णासाहेब, नाशिककर त्यांना याच आपुलकीच्या नावाने जाणतात, तर अण्णांनी आणखी पुस्तके लिहावीत, समाजाच्या शाळेत आता भाषणे करावीत, सुरेखसे आत्मचरित्र लिहावे. लोक ते विकत घेऊन वाचतील.

अकोलकर नाशिकचे पण शिक्षणक्षेत्रात तशी त्यांनी भटकंती खूप केली. चर्चा व्हावी इतकी. नाशिकच्या रुंगटा हायस्कुलात बरीच वर्षे होते. न्यू हायस्कुलातही होते. तिकडे नारायणगावच्या सबनीस हायस्कुलात होते. इकडे पुणे महापालिकेच्या कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयातही होते. या सर्वच ठिकाणी एक जगावेगळे हेडमास्तर म्हणून त्यांची छाप पडली. ती उमट-विल्यावर तिथेच राहणे त्यांना जमले नाही. उगाच खोटं कशाला बोला ?.... अकोलकरांचे पटले नाही, पण न पटूनही ' लोक-लज्जेस्तव ' मंडळी राहतातच की बऱ्याच ठिकाणी चिकटून !

अशी चातुर्याने कसरत करणाऱ्यांपैकी जग काय म्हणेल याची पर्वा करणाऱ्यांपैकी अकोलकर कधी नव्हतेच.

राष्ट्रीय संस्काराचा वारसा मनाशी जपून मोठ्या जिद्दीने अकोलकर शिक्षणाच्या क्षेत्रात आले. स्वतःच्या हिमतीवर एम्. ए., एल्एल्. बी. झाले. प्रथम शिक्षक, मग मुख्याध्यापक झाले. नंतर प्राध्यापक, त्यानंतर प्राचार्य, हा सारा प्रवास टाकीचे घाव सोसून देवपण यावे तसा घडलेला. चांद्याच्या एस. टी. कॉलेजाचे ते प्राचार्य झाले. पुन्हा नाशिकला येऊन बी. एड्. कॉलेजचे प्राचार्य झाले होते. खरं तर मराठा विद्या-प्रसारक समाजाच्या या महाविद्यालयाचे गेल्या चार वर्षांतील सारे यश अकोलकरांचेच आहे. त्यांच्याच प्रेरणेने आणि मार्गदर्शनाने या महाविद्यालयाने आकार घेतला. केवळ अकोलकर प्राचार्य म्हणून धुळे, जळगाव, ठाणे, सातारा, सांगली आणि मराठवाड्याकडूनही मंडळी गोदातीरी नाशकाला आली. अकोलकरांचे हे पुण्य त्यांचा शत्रूही नाकारणार नाही.

मंडळी अधूनमधून अकोलकरांच्या माणूसघाणेपणाबद्दल बोलतात. पण अकोलकर एक अफाट अभ्यासू माणूस. हाडाचा शिक्षक, विद्यार्थी घडविण्यात यशस्वी झालेला शिक्षणशास्त्रज्ञ—हेही हीच मंडळी कबूल करतात. अकोलकरांचा फटकळपणा हा राजवाड्यांच्या जातीचा असतो असा समजुतीचा विचार आवश्यक ठरतो. आज खऱ्या शिक्षकाला त्यांच्या कष्टाचे, निष्ठेचे तळमळीचे फळ आम्ही देतो काय ? की त्याने जागोजागी मानहानी पत्करायची .... विवेकाशी बेइमान व्हायचे....मूर्खांपुढे मान तुकवीत हे सारे करायचे—असाच आजचा एकूण गलबला

नाही काय ? आणि मग अशा स्थितीत एखादा चिडला, भांडला किंवा त्यानं कुणाचा गुमान राखला नाही म्हणूनच केवळ आम्ही त्यावर रुष्ट व्हायचे ?

अभ्यास-क्षेत्रात अकोलकरांबद्दल मोठी सन्मानाची भावना आहे. ते पुण्याचे की मुंबईचे असा कोता विचार होत नाही. शैक्षणिक परिसंवादातून त्यांनी वेळोवेळी भारतीय विचारवंतांना प्रभावित केले. मराठी माध्यमाची कैफियत उत्तम प्रकारे सादर करून त्यांनी भल्याभल्यांना गारद केले. मानसशास्त्र, शिक्षणशास्त्र आणि संस्कृतवाङ्मय यांचा सखोल व्यासंग करून या विषयांवर मराठीतून विपुल आणि सकस लेखन करणारा एक थोर लेखक म्हणून अकोलकर अजिंक्य राहीले आहेत.

जॉन डुईच्या शिक्षण-विचारांचा त्यांनी केलेला अनुवाद प्रसिद्ध आहे. केवळ पाश्चात्य शिक्षणविचारांचे स्वभाषेत अवतरण घडवून शिक्षणतज्ज्ञ म्हणून मान्यता मिळणारे अनेकजण आढळतील, पण अकोलकर हे असे परभूत विद्वान नाहीत. पूर्वसूरींच्या अनुभवांनी आणि विचारांनी समृद्ध बनलेला त्यांच्यातील तत्त्वचिंतक हा भूतकाळातील अनुभवाची वर्तमानाशी सांगड घालून उज्ज्वल भवितव्य घडविण्यात रंगलेला आहे. याचमुळे त्यांची या क्षेत्रातील ग्रंथ-रचना पढिकतेने जड बनलेली नाही तर जिवंतपणाने रसरसलेली आहे. नुकताच महाराष्ट्र शासनाने गौरविलेला, नव्या महाराष्ट्रातील शैक्षणिक वाटचालीचा परामर्श घेणारा त्यांचा लेख-संग्रह या विधानाची उत्तम साक्ष देऊ शकेल. ‘ व्यासकुसुमे ’ हे त्याचे भागवताचे रहस्योद्ग्राही रसग्रहण करणारे छोटेसे पुस्तक काय किंवा मराठीचे अध्यापन यासारखे अध्यापनावरचे तांत्रिक

पुस्तक काय–त्यांची रसीली वृत्ती सर्वत्र दिमाखाने संचार करताना आढळेल.

ग्रंथांचीच मोजदाद करायची झाली तर लेखक अकोलकरांनी अर्धशतक पार केले आहे पण अजून गडी कसा नाबाद आहे. शिक्षणशास्त्र-विचाराच्या 'क्षेत्रात' सलामीचे फलंदाज म्हणून अकोलकर आले. अजून ताज्या दमाने ते खेळत आहेत.

अकोलकर वेदान्ताचे अभ्यासक असूनही प्रवृत्तिपरतेला पारखे झालेले नाहीत. गांधी-विचारांचे भोक्ते असूनही विकृतमनस्क आचार्य बनले नाहीत. समाजवादाचे खंदे पुरस्कर्ते असूनही संप, हरताळाच्या केवळ नकारघंटा बडवीत बसले नाहीत. साम्यवादाविषयी नितान्त आस्था बाळगणारे असूनही प्राचीन–संस्कृतीचे शत्रू बनून उभे राहिले नाहीत. तत्त्वचिंतनाचे सातत्य राखूनही अभिजात रसिकतेपासून वंचित राहिले नाहीत. त्याचमुळे त्याची वेदान्तनिष्ठा जीवनवादी राहिली. गांधीनिष्ठा वांझोटी ठरली नाही. साम्यवाद व समाजवाद यांविषयीची 'आस्था भारतीय विचारांच्या उदार आणि उदात्त परंपरेशी बेइमानी करणारी ठरली नाही. आणि बाह्य–दर्शन फारसे आकर्षक नसूनही (माझ्यासारख्या त्यांच्या अनेक विद्यार्थ्यांना ते दिसायला दुसऱ्या हेन्रीचे जुळे भाऊ वाटतात !) विद्यार्थ्यांच्या जीवनावर सर्वंकश प्रभाव गाजवायला त्यांचे व्यक्तिमत्व उणे पडत नाही हा अनुभव माझ्या एकड्यादुकट्याचा नाही, तर हा त्यांच्या साऱ्याच विद्यार्थ्यांचा आहे.

तसा अकोलकरांनीही सार्वजनिक जीवनात भाग घेतला, पण आपले वैशिष्टच टिकवून, कर्तव्य आणि विवेक यांच्याशी

इमान राखून, मुख्याध्यापक संघाचे ते अध्यक्ष झाले. कित्येक ठिकाणी भाषणे द्यायला गेले, उद्घाटने केली. परिसंवाद केले. नाशिकचे सांस्कृतिक आणि सार्वजनिक जीवन वैभवशाली करण्यात अण्णासाहेबांचा वाटा मोठा. सर्व संस्थांनी त्यांना आपले म्हटले. लोकहितवादी मंडळाचे ते कार्याध्यक्ष. जिल्हा स्काउटचे कमिशनर. रोटरी क्लबाचे आधातस्तंभ, कांही वर्षे अध्यक्षही होते.... पण हे सारे करताना अकोलकरांनी आपल्या शिक्षकाच्या व्यवसाया-मध्ये अंगचोरपणा केला नाही. अभ्यास सोडला नाही. वाचन-व्यासंग कमी केला नाही आणि केवळ स्वत:चा गाजावाजा व्हावा म्हणून हाताखालच्यांना राबविलेही नाही. जेवढे सहज शक्य झाले तेवढेच सार्वजनिक कार्य त्यांनी केले. मुख्यत्वे केला तो शिक्षकाचा सचोटीचा उद्योग....अध्ययन आणि अध्यापन, चिंतन, मनन आणि लेखन.

'रविवार केसरी' २६ ऑक्टोबर १९६९

卐 卐 卐

पै. चंदगीरामाशी बातचीत

चंदगीराम हा भारताची शान वाढवणारा एक पहिलवान गडी. त्याच्या उमेदीत त्याने आपल्या देशातले सारे कुस्तीचे मानसन्मान सहज पटकावले. पण कसे ? हसत हसत, विनम्र वृत्तीने, व्यायामावर अन् पहिली अखेरची निष्ठा ठेवून !

या नामवर भारतीयासमवेत एकदा गप्पा करण्याचा योग आला. त्यालाही झाली आता पाच वर्षे. पण बातचीत आमची कशी अजून ताजी आहे. पाहा ना तुम्ही जरा ऐकून.

अलीकडे माझी जाडी जरा वाढल्यापासून मलाही मित्र-मंडळी पहिलवान समजू लागली आहेत. एरव्ही आमच्या श्रीशाहू मंदिर महाविद्यालयाचे क्रीडाविभागप्रमुख श्री. बाळासाहेब लांडगे यांच्याशी थोडीशी दोस्ती आहे इतकाच माझा पहिलवानीशी संबंध. गेले काही दिवस बाळासाहेब हरवले होते. भेटायचे तेव्हा त्या चंदगीरामबद्दल बोलायचे.

बाळासाहेब मला सांगायचे, ‘ तैयार गडी पण अगदी नम्र. गुरूला मानतो. इमानाने कसरत करतो. डाव शिकवला तर उत्साह कोण....

बाळासाहेब लांडगे निघाले होते चंदगीराम आणि इतर सहा मल्ल यांच्याबरोबर ऑलिंपिकसाठी म्युनिकला. मध्यंतरी प्रशिक्षक म्हणून दिल्लीला स्वारी दंग होती.

चंदगीराम आहे तरी कसा म्हणून सहज विचारले, तसे बाळासाहेब म्हणाले, ' आणू का आज संध्याकाळी तुमच्या घरी! '

मी म्हटलं, ' पण तो चहाबिहा घेतो का ? '

बाळासाहेब म्हणाले, ' तो काय प्राध्यापक आहे नुसता चहा प्यायला ? तुम्हांला जर का त्याचं स्वागतच करायचंय तर आणा दोन लिटर दूध, पाचपंचवीस सफचंदं. दुसरी ताजी फळंसुद्धा चालतील. माणूस मोठा साधा आहे. तुम्ही द्याल तेवढ्यावर भागेल. '

त्यानिमित्ताने मी चंदगीरामाच्या जवळ गेलो. सीधासाधा माणूस, गौरकाय प्रकृती. तीक्ष्ण नजर, पहिलवानी केशकलाप. उंची ताडमाड. जसा अजानबाहू अर्जुन असावा तसा. हाताचा पंजा जबरदस्त. माझी त्याची आमनेसामने झाली, तेव्हा मी त्याच्या कुठेतरी छातीपोटाशी लागलो. नमस्कार-चमत्कारानंतर हस्तांदोलनाची पाळी आली. पण भला माणूस बोलण्यातही लाघव, शब्द सगळे नम्र गंधाने भिजलेले.

चंदगीरामाला मास्टर म्हणणे अगदी आवश्यक. कारण तो होताच आधी मास्टर. इंटरमिजिएटपर्यंत शिक्षण झाल्यावर तो शिक्षक झाला. चित्रकलेची आवड. तेव्हा चित्रकलेचे धडे द्यायचे काम आले ते केले. मजेत मास्तरकी करीत राहणे मात्र त्याच्याच्याने जमेना. आजाराची सोबत. अशक्त प्रकृती चक्कर यायची.

एके दिवशी मास्टरजींनी ठरवले की हे नाही जमायचे. आता हा जबर निश्चय जर त्यांच्याच शब्दात ऐकायचा तर–

‘ हमने सोचा ऐसे चलेगा नहीं । कैसे चलेगा ? अपने देश में भीम और अर्जुन और न जाने कितने कितने बडे बडे आदमी हुए । नेता भी एक एक कैसे जबरदस्त हुए । क्या ये सब एक दिन के अंदर बने ? अपनी इंद्रा गांधी भी तो देखो । पहेले नेहरूजीकी लडकी थी । सूचना परसारण मंत्री हुई । और अब धीरे धीरे देश की सब से बडी ताकदवर स्त्री जो है । कि नहीं ? ’

हातवारे उत्साहाचे. डोळे लहानग्या मुलासारखे मिचकावून अतिशय हर्षभरात बोलण्याची त्यांची पद्धत. त्यांचे बोलणे म्हणजे मूर्तिमंत उत्साहाचे बोलणे. आधी हिंदी भाषा मधुर, त्यातून चंदगीरामांची प्रकृती श्रद्धाशील. त्यामुळे अगदी सहज त्यांचे शब्द नम्रतेच्या स्पर्शाने मृदुमधुर होत. मी अगदी थक्क झालो. कारण पहिलवान म्हणजे कुणी अगडबंब गडी, रांगड पेहराव, अचाट बोलणे अशा आमच्या अफाट कल्पना. इथे तर साक्षात आधुनिक भीम समोर उभा. पण कसा तर धर्मासामोरा उभा ठाकावा तसा. सारी भाषा त्याची ‘ ऐसा है भाई, कैसे हो भैया, हमने कहा तो बुरा तो नहीं माने आप ? ’

आमच्या भेटीस बोलणे अमाप झाले. एरव्ही आमची बडबड भरपूर. पण इथे चंदगीरामाकडूनच ऐकण्यात मौज होती. कारण तसेच. मास्टरजी बोलत होते. आपल्या जीवन कहाणीच्या समाप्तीला म्हणाले,

‘ अरे भई, हमने सोचा हम भी बडे आदमी हो जाएँ । सो तो हो गए कि नहीं ? ’

नाही म्हणायची आहे का टाप ?

मास्टरजी 'हिंदकेसरी' 'भारतभीम,' 'महाभारत केसरी' 'अर्जुनवीर' असे किती तरी आहेत. आणि असे जवळ जवळ कुस्तीचे सारे किताब त्यांच्या कपाटात सीलबंद. सहा वर्षांपूर्वी बँकॉकला आशियाई स्पर्धा झाल्या तेव्हा त्यांनी सुवर्णपदक आणले खेचून भारतासाठी. ऑलिम्पिकला बक्षिसे पटकावण्याची त्यांची जिद्द, उगाच फाजील सौजन्यबिजन्य कुछ नहीं. जाम आत्मविश्वासाने मास्टरजी बोलतात, 'लाएंगे और लाएंगे जरूर।'

जणू अखंड तपश्चर्या आणि बाहुबळावर अदम्य विश्वासच माझ्याशी बोलत होता. मनात मी म्हणालो, 'हा गडी कसा उमदा आहे. खेळाडू असावा तर असा! त्याच्या मनात जोश आहे. देवाधर्माविषयी, देशाविषयी. नेत्यांविषयी भक्तिभाव आहे. काहीतरी नवेच करीन आणि आपल्या देशाचा डौल मिरवीन अशी उर्मी आहे. मग त्याला जागतिक यश न का मिळो. पण जेव्हा हा जगाच्या मैदानात उतरेल तेव्हा लोक म्हणतील, हा खरा भारतीय आहे ! नम्र, सश्रद्ध, भव्य, चंदगीरामाला महाराष्ट्राच्या वीरांचा आणि पराक्रमी इतिहासाचा अभिमान आहे. कुस्तीचा षोक इथे मोठा म्हणून त्याला संतोष आहे.

आपल्या आरोग्याचे रहस्य सांगताना तो म्हणाला,

'सोला साल की उग्र तपस्या है !' पहाटे तीनाला उठायचे. खेड्यातला आखाडा आणि रात्री सहापर्यंत नियमित व्यायाम. दुपारी दोन तास तास मात्र सक्तीची विश्रांती. आजही व्यायाम असा की घाम गळत राहिला पाहिजे. हे सगळे इतक्या मजेत

सांगणे चाललेले की, ऐकणाऱ्याला वाटावे आपणही उद्यापासून हे सुरू करावे.

सकाळी बदामाचा खुराक. लस्सी, नाही तर गरम दूध. कच्चे दूध मंजूर नाही.

त्याबाबतीत मास्टरजी म्हणाले,

' कच्चे दूध में सत्रू जरमस् हो सकते हैं । ' .... खाण्यापिण्यावर भारी संयम ठेवणे आवश्यक. उगाच खूप खाऊन तट्ट छाती फुगविणे म्हणजे पहिलवानी नव्हे. भरपूर खायचे पण शुद्ध, सात्त्विक, मग एक तर एक. केळी तर केळी, दूध तर दूध, इलाज नाही. कसरत झाली की अंग रगडून घेणे आलेच. त्यात नियम म्हणजे नियम. दुपारी विश्रांतीत कसूर करणे नाही. उगाच जागरणे नाहीत. सगळे कसे नियमानुसार.

मास्टर चंदगीरामांचे नेमके वैशिष्टय आहे ते हेच. हा माणूस अखंड साधनेवर जगणारा. मेहनत हा त्याचा स्वभाव बनलेला. गुरुभक्ती त्याच्या मनाच्या गाभ्यातच असलेली. नम्रता आणि श्रद्धा ही अगदी उपजत. व्यायाम हे एकच एक क्षितिज. रोज त्या क्षितिजावर नजर. ते पादाक्रांत करण्याचा ध्यास. त्यासाठी आरोग्य हा एकच विषय मास्टरजींनी आपला म्हटला आहे. मनापासून त्यांचा सिद्धांत असा—

' सरीर के अंदर दो किसमके जरमस् होते हैं । दोस्त और सत्रू । दोस्तों को बढाना होगा । कसरत का राज यही है । '

हे रहस्य त्यांनी ' लेडीज् और जंटलसेन ' दोनो के लिए जिंदगीभर आवश्यक म्हणून सांगितले. दोरीच्या उड्या केवळ मुलींनीच माराव्या का म्हणून ? आणि प्रत्येक वेळी चमकत्या

चेहऱ्याने मास्टरजी संथा देत होते, ' कसरत ऐसी करे शीशे जैसा चेहरा चमके । आणि खरोखरीच चंदगीराम चकचकीत आहे. त्यांचा रंग गोरा तसा म्हणता यायचा नाही. पंजाबी गव्हासारखा म्हणाना ! पण त्यात एक तकतकी आहे. सहज पाहिले तरी ती जाणवावी. ही तकतकी त्यांच्या नियोगी ताकतीचा आरसाच आहे.

चंदगीरामाचा इंदूरवर खास लोभ. तिथल्या मंडळींनी त्यांचे मनापासून कौतुक केलंय. त्यांचे हरयानावर-आपल्या परगण्यावर-प्रेम आहे. भाषेवर आहे. देशावर आहे. पण त्यांच्या बोलण्यात ते कुठे आडवे आले नाही. हिंदी-उर्दू-इंग्रजीचे जाम मिश्रण म्हणजे त्यांची भाषा. उदण्ड उत्साहाला तीही अपुरी पडणारी परदेशांतून आठ–दहा मस्त शब्द घेऊन नक्कीच येईल असा हा सरळ माणूस. भाषा हे त्याच्या लेखी माणसाने माणसाजवळ येण्याचे एक दिलखुलास साधन. म्हणूनच त्यांचे बोलणे सहज मजेचे, उत्साहाचे, आनंदाचे.

एरव्ही नाव कमावलेला माणूस कसा डाफरून बोलतो. मास्टर तर मल्ल. पण सीधासाधा. चेहरा-मोहरा तर बालगोपाळासारखा. टेरिलीनची पतलून-कमीज पेहनतात, पण अंतरंगात भारतीयता. शुद्ध शाकाहारी जेवण. मला म्हणाले–

' जैसे खाओ अन्न-जल वैसा ही जाय सरीरबल. '

मोसमात मिळेल ती फळफळावर. शुद्ध दूध-तूप आणि ताजी भाजी खावी. ' टाईमटेबल् ' बनवून मेहनत करावी पहाटेपासून रात्रीपर्यंत.

तामसी खाणेपिणे साफ नामंजूर. ' वह सोभा नहीं देता । पुन्हा मास्टरजींनी शरीरारोग्याचे आपले स्वतःचे असे खास विज्ञान सांगितले.

' सृष्टीत नाना प्राणी– कुणी कसा, पक्षी, चिमण्या तर दगडखडे खाऊ शकतात, गिळतात. पण शाकाहार सर्वोत्तम. '

–असा हा सीधा सरळ मल्लगडी, त्याला विद्येची जडता नाही. नावलौकिकाचा बडिवार नाही. शेतीवाडी, श्रीसंपत्तीचा बडेजाव नाही. शक्ती–उंचीचा अभिमान आहे–पण तो आखाड्यात ठेवतो. एरव्ही मस्त मजेत गप्पा. शुद्ध सात्त्विक आहाराच्या. घाम गाळण्याच्या. कुस्तीतले सारे मानमरातब मिळविण्याच्या. या क्षेत्रात देशाची शान वाढविण्याच्या चंदगीरामच्या मजेदारा बोलण्यानं ऐकणार सहज म्हणतो " पहलवान हो तो ऐसा । "

' रविवार केसरी ' २३ जुलै १९७२ / कुस्तिगीर मे १९७६

卐 卐 卐

कृत्रिम वाटणारा एक अकृत्रिम माणूस

भगवानराव पंडित

तशीच बरीच माणसं तऱ्हेवाईक वागतात. चार लोकांसारखं बोलत नाहीत. चार लोकांसारखं जगत नाहीत. मस्तपणानं किंवा मठ्ठपणानं शिकायचं. मग नोकरीस चिकटायचं. छोकरी बघायची. अधिकांत अधिक मौज म्हणजे आपणच छोकरीची शिकार केल्याचा पुरुषार्थ मानायचा. पुढचा सारा प्रकार चारचौघांसारखा. अन् मग एकेदिवशी बेलबाग किंवा तुळशीबाग. शेवटी शंभुमहादेवासमोर संपून जायचं. ही एवढीच सारी पराक्रमी वाटचाल.

पण तऱ्हेवाईक माणसं हे सारं करीत नाहीत. जे शहाणे समजतात स्वत:ला, त्याच्याकडून वेडावून घेतात. कधी त्याची दिक्कत मानीत नाहीत. खुशाल स्वत:चे स्वत: काहीतरी करीत राहतात.... कुणी मुद्दाम करतात. कुणी न कळत करतात. अशा व्यक्तीचा वल्ली म्हणून लौकिक होतो. बहुजन हिताय बहुजन सुखाय व्रत घेतलेल्या आकाशवाणीच्या पुणे केंद्रावर मला अशी वल्ली भेटली होती.

भगवानराव पण्डित ! नाव मोठं, आडनाव छोटे. नावात भगवंत. परंपरेत पांडित्य. पण या वल्लीचा भगवंताशी किंवा पांडित्याशी कसलाच संबंध नसावा. हा मामला काही और आहे हे पहिल्या दर्शनात मान्य होऊन जावं.

तांबूस गौर वर्ण. साठीतही रुबाबदार चेहरा. त्यावर इंग्रज रंगभूमीवरच्या नटाची ऐट. इंग्रजी इतिहासात छापाची चित्रं असतात तशातल्यापैकी केस. शीख नाही. हिंदू नाही. मुसलमान तर मुळीच नाही. (न मी एक पंथाचा !) मला ते आमच्या कविवर्य सुमित्रानंदन पंतांसारखे वाटतात. ध्यानी ठेवण्याची सोय. तसाच रूपडा, बालकासारखे बाल, हंसरे गोबरे गाल. डोळे बोलके, पंत शाल पांघरून अगदीच बाई होतात. पंडित कपडे घालायचे म्हणून घालतात. हे वाटण्याचं कारण आहेच. कपड्यात फारसा रसीलेपणा सध्या तरी नाही. पण उंच्यापुऱ्या देहाने ठाकठीकपुरुषार्थ व्यक्त करावा, असा नाही म्हटलं तरी नजरेत भरणारा रुबाब, तोंडातल्या पानतंबाखूमुळे त्या रुबाबत नबाबी रंगत आली आहे सहज.

पंडित गेल्या आठवड्यात रेडिओच्या चाकरीतून सर-कारीरीत्या निवृत्त झाले इतकंच मला त्यांचं चरित्र ठाऊक आहे. केव्हातरी ते नू. म. वि. त होते हे ऐकलेलं. हिंदीचे एम्. ए. झालेत. त्यांनीच केव्हातरी सांगितले म्हणून खरं म्हणायचे. कारण ते कविता करीत नाहीत. केल्यास ऐकवायचे नाहीत आणि मुख्य म्हणजे पीएच्. डी. ला नाव नोंदविण्याच्या भानगडीतदेखील पडले नाहीत. अघळपघळपणावर त्यांचा भलताच राग आणि खादी काँग्रेसवर तर भयंकर संताप. पण भगवानराव डिग्रीचे

भोग घेण्यापेक्षा रंगमंचावर रंगले, पुढे केव्हा तरी रेडिओवर आले. तिथे राबराब राबले. आता तिथून निघाल्यावर कुठे रोज जायचं हा त्यांच्यापुढे प्रश्न असेल. तसे लहरीराम आहेत, कुठेच जायचे नाहीत. आणखीन हौस करतील. कलोपासक जमवीत बसतील. त्यांना रंगवून पुढे करतील. आपण आपले पडद्याआडच्या प्रपंचात समाधान मानतील आजवर असंच केलंय म्हणे. सुख नाही, दुःख नाही, दिसत काही नाही. सारा ब्रह्मानंद.

ब्रह्माच्या आनंदावरून आठवलं. पंडितांना नटराजाचं वेड आहे. त्याच्यावर काहीतरी केव्हातरी लिहिण्याचा ध्यास आहे. हरप्रकारे नटराजाच्या चीजवस्तूंची जमवाजमव करीत बसतात. मला चार दोनदा 'धर्मयुग' पाहता काय विचारलं होतं. मी समजा विकत घेऊन पाहात असेन तर त्यांना आलेल्या चित्रांची माहिती पुरवावी. या कामात सर्व बाजूंनी सवलत, घाईसुद्धा नाही. सावकाश केव्हातरी करायचंय. ('वेळ नाही हो !' आणि मग हसत हसवत 'तुमच्यासारखे आमचा वेळ खातात' इ. इ.) पंडितांना तशी कधीच कुठली घाई नसते. सारा आपला अफलातून प्रकार. केव्हाही यावं-जावं. केव्हाही झोपावं. सूर्याची भीती किंवा क्षिती न बाळगता उठावं. कधी तर गप्पा रंगल्या म्हणजे सूर्याला लाजवावं.

पंडितांनी रेडिओच्या वेळ मात्र चुकवल्या नाहीत. वार्ताचित्रांसाठी वेळेवर साऱ्या जामानिम्यानिशी भटक भटकायचे. भरपूर रेकॉर्ड करायचे, मग संथपणानं तो सारा प्रकार निस्तरायचा. कुणी निंदो, कुणी वंदो, पंडितांचा खाक्याच तसा.

कोयनानगरच्या भूकंपावेळी आपला रेडिओ घेऊन पंडित

तिथं धावले. त्या साऱ्या भयाण रंगमंचावर स्थितप्रज्ञासारखे वावरले. बायाबापड्यांच्या किंकाळ्या टेप केल्या. मुलाबाळांचे अश्रू टेप केले. तेथून परतल्यावर तासन् तास खपून साऱ्या उत्साहानं जिद्दीनं आकाशवाणी केली, गाजाबाजा नाही. शिवाय 'ऐकतो कोण ?' ही प्रामाणिक जाणीवही. भूकंपावेळचाच उत्साह गांधीजींच्या शताब्दीवेळी पुण्याच्या परिसरातलं शोधण्यात. केशवसुतांच्या वेळी तसंच. याबाबतीत त्यांचे नेहमीचे सांगाती कामात दंग. कुठेही ते जातील आणि काहीही टेप करायला मागेपुढे पाहायचे नाहीत.

अधून मधून भगवानरावांनी मला निमंत्रण-पत्रं दिली—कलोपासकांच्या व्याख्यानांची, वैशिष्टयपूर्ण कार्यक्रमांची. मी फारसा जाऊ शकलो नाही. पण केव्हा केव्हा जातो तेव्हा तो कार्यक्रम पंडितांनी घडविलेला म्हणून.

अलीकडे त्यांची भेट झाली नाही म्हणणे जरा संभावितपणाचं होईल. भेटी किती घडल्या ? चार सहाच. पण पंडित कसे बोलले, काय बोलले, कशी आपली फजिती केली, मोठा मजा आला. सारं टेप केल्यासारखं ऐकायची सोय मनानं करून ठेवलीय. पंडित भेटले की त्यांचा दरबारच भरतो. सुरुवातीला पान देणेघेणे. देणेच त्यांच्या स्वभावानुकूल ! तंबाखू विचारणे, सुपारी कातरून पुढे करणे. आम्ही या बाबतीत अजून सोवळेच पाळतो. पण पंडितांना पर्वा नाही. त्यांचे ते मस्त खातात. कुठून तरी आमचे शब्द सुटून जातात.... 'बरंय भगवानराव, गेलं पाहिजे. घरी वाट पाहतील.' पंडित त्यावर मग समोरच्या आमच्या मित्राला साळसूदपणे सांगतील, 'जाऊ द्या हो त्यांना, घरची

'ओढ ' आहे.' या ओढून उच्चारलेल्या ओढीवरून आम्ही ओशाळतो. अशी शिकार साधली की पंडित भोळा भाव आणून म्हणतील, 'त्याचं काय आहे....यांना नाहीत उद्योग, आम्ही त काय.... जाऊ द्या. स्वत:च स्वत:बद्दल बोलू नये. नाही म्हणजे लोक बोलतात हे, पण आम्ही आपलं पाळतो. तर.... तुम्ही आपले जा हो. उगाच समज आणखी.... नाही म्हणजे गैरसमज घरी नसावा हं....' समोरचा साफ होऊन जायचा. मुकाट मग तो त्यांच्या दरबारचा पाहुणचार घेण्यासाठी हॉटेलात पोहोचणार. पंडित काय काय आहे याची वेटरला रामरक्षा म्हणायला लावणार. ज्याला जें हवं ते देणार. स्वत: आधी भजी गरम असल्यास मग तीच. नाहीतर श्रीखंड, शेव, चिवडा, दहीवडा काहीही. आणि खाताना आपला समोरचा माणूस पंडितांच्या अस्सल विनोदावर पोटदुखेपर्यंत हंसतोय. पंडितही अधून मधून हसतात. पण त्यांचं मन सदैव हसरे. म्हणून साठीपर्यन्त एकाकी प्रवासातहि मौज लुटली. भल्याबुऱ्या कितीतरी भूमिका केल्या. प्रत्येक बैठक गाजविली. सूर हृदयी साठवतो. त्याहूनही इतरांवर त्यांची अमूप बरसात केली. रसभीना आनंद.

पंडितांचं बोलणंच चंटपणाचं, फटकेबाज वाटेल. पण घाव त्यात असायचा नाही. त्यांतूनही एखादा उगाच शिष्टाचाराचं ओझं वाहणारा भेटला तर त्याला ते सरळ रस्ता दाखवतील. देणे नाही, घेणे नाही. या बसा, बोला, खा, प्या, आलात तसे जा, शहाणपणा शिकवू नका. आमच्याकडे काही आलं आहे असाही दावा नाही.

...७

पंडितांना धूर्त मंडळी नाटकी म्हणून हिणवण्याला मागे-पुढे पाहणार नाहीत. त्यांची चंट बोली, केशकलाप आणि हास्याचे आलाप यांकडे बोट दाखवून हा गैरसमज कुणी करूनही घ्यावा. पण पंडित कृत्रिम वाटणारा एक अकृत्रिम माणूस ! त्यांच्या तऱ्हेवाईकपणात कृत्रिमता नाही. स्वतःचे अवघडलेपण नाही. दुसऱ्याला मुळीच वाटू नये हा सुजन-भाव, उगाच नसत्याच्या नादी नाहीत. पण कुणाची पर्वाही नाही.

पंडित आमच्या सुमित्रानंदन पंतांसारखे भाग्यवान कवी नाहीत. पण साम्य केवळ दिसण्यातील नाही. पंत जीवनभर मुक्त राहिले. अनेक ठिकाणी मनसोक्तपणे वागत गेले. कविता केली. प्रसिद्ध झाले. पंडित कविता जगतात. चुकलं, नाट्य जगतात. साथीसवंगड्यांना नाट्यात भिजवत बसले. खरा कलोपासक, कृत्रिम वाटणारा, पण अस्सल, अकृत्रिम वल्लीच खरी, पण राजमार्गावरली. नबाबी खाक्या. दरबारी औदार्य, चांगल्याचा दोस्त, खोट्याचा काळ. पण संबंध आला तर, नाहीतर सदासर्वकाळ ब्रह्मानंदी रंगलेला–एक अफलातून वाटणारा स्वच्छ माणूस !

'रविवार केसरी' २८ डिसेंबर १९६९

卐 卐 卐

तुलसीरामाचा निष्ठावंत उपासक

फादर डॉ. कामिल बुल्के

'रामचरितमानस' हा गोस्वामी तुलसीदासांचा अमर ग्रंथ. अवघ्या उत्तर भारतावर या महाकाव्याची मोहिनी गेली चार शतके टिकून आहे. सहज-मधुर शब्दकळा, उदात्तमंगल विचारसरणी आणि भारतीय परंपरेचे सारसंचित सांगावं अशी या ग्रंथाची धाटणी आहे. या ग्रंथाचा आणि त्या निमित्ताने राम-कथेचा व्यासंग हेच ज्यांचे जीवित–ध्येय आहे, त्या फादर कामिल बुल्ले यांची ओळख व्हावी म्हणून उत्तर यात्रेच्या वेळी एकदा वाट वाकडी करून मुद्दाम रांचीला गेलो, पण भेट घडली नाही. ती व्हायची होती पुण्यातच....

सुदूर युरोपातल्या एका देशामध्ये येशूच्या प्रार्थना-संप्रदायात वाढलेला एक मेधावी मुलगा विज्ञानाची पदवी संपादन करतो, जीवनात सुखस्वास्थ्याचे सगळं गणित सहज सुटावं असं अवतीभोवती सारं असताना नोकरी आणि छोकरीची वाट नको म्हणतो, ध्येयधुंद होऊन मिशनरी बनतो. धर्मसंघाची आज्ञा मानून

स्वदेशात धर्मजागरणाचे कार्य करतो. नंतर परदशात येतो आणि हा परदेश त्याला तिथल्या स्वदेशीय मंडळींपेक्षा आपला वाटतो. मग तो त्या देशाच्या जनभाषेचा अंगीकार करतो, अगदी बाल-वर्गापासून प्रारंभ करून त्या भाषेतील विश्वविद्यालयीन स्तरा-पर्यंतचे सगळे मानसमान्मान संपादन करतो, आणि त्याच्या जीवनाचा दिशादर्शक जसा कुणी ख्रिती धर्मोपदेशक तसाच तुलसीदासही असतो. त्याच्या मनीमानसी येशूबरोबर प्रभू रामही राहतो. अगदी अलगून–बिलगून राहतो.

त्याच्या जीवनाचा ध्यास कोणता तर रामभक्त तुलसी-दासांचे रामचरितमानस अभ्यासावे, रामभक्ति-संप्रदाय तपासावा. त्याचे आयुष्य सारे याच उद्योगात सरत आलंय. या अजब मिशनऱ्याचं नाव आहे फादर डॉक्टर कामिल बुल्के. सांप्रत मुक्काम रांची.

डॉ. कामिल बुल्के हे जन्माने बेल्जियन. लेसवेगजवळच्या रॅम्स्टचॅपल गावी १९०९ मध्ये त्यांचा जन्म झाला. त्याचं प्राथमिक शिक्षण तिथेच झालं. पुढे विज्ञानाचा अभ्यासक्रम घेऊन त्यांनी १९३० मध्ये बी. एस्सी.ची पदवी मिळविली. पण नोकरदारीत आपलं नैष्ठिक मन रमायचं नाही असं त्यांना वाटू लागलं. इतर भावंडांनी केव्हाच तो रस्ता आपला म्हटलेला. कामिल बुल्के यांना सारखं वाटायचं की, ‘ संन्यास घ्यावा. एखाद्या उदात्त ध्येयासाठी धुंद आयुष्य वेचावं. ’ ऐन तारुण्यात कामिल बुल्के स्वेच्छेने जेसुएट धर्मासंघाच्या दारी आले. ख्रिस्तभक्त आई-वडिलांना त्यांच्या या प्रवासाचा मनापासून अभिमान वाटला आणि एक एकवीस वर्षांचा तरुण वैज्ञानिक उदंड ध्येयवादानं

उजळलेल्या जीवनाची दिशा निश्चयानं माझी म्हणाला. समाजाला एक श्रमसेवाशील सर्मपित जीवन लाभले.

जेसुएट धर्मसंघाच्या नियमांना अनुसरून फादर बुल्के पाच वर्षे स्वदेशामध्ये धर्मजागरण करीत राहिले. त्यानंतर त्यांना भारतात पाठविण्याचा निर्णय झाला. मग रांची मिशनचे एक सेवक म्हणून १९३५ साली फादर बुल्के भारतात आले ते कायमचेच.

प्रथमपासून बुल्के यांच्या मनात भारताविषयी कुतूहल असायचे. धार्मिक आवडीमुळे भारतीय संतवाङ्‌मयाविषयी इंग्रजीतून त्यांनी विपुल वाचलेलं. मी यासंबंधी जेव्हा त्यांना विचारले त्यावेळी ते क्षणभर डोळे मिटून स्तब्ध झाले. स्मृती जागवून प्रसन्न बनले आणि म्हणाले, ' भारत हा संतसज्जनांचा देश, समाजपुरुषाचा देश असा ठसा माझ्या मनावर उमटला. मला हा देश हवाहवासा वाटला. माझ्या धर्मसंघानं जेव्हा भारतात जाण्याची मला विनंती केली, तेव्हा वाटलं, आपल्या मनातलंच येशूनं घडवून आणलं वाणि मग वाचनविश्वातून माझ्या कल्पनेत साकारलेला भारत प्रत्यक्ष अनुभवावा, जवळून वाचावा म्हणून मी उत्साहाने इथं आलो. मला माझ्या मनासारख्या घरी आल्याचा संतोष गवसला. '

फादर माझ्याशो अस्खलित हिंदीतून बोलत होते. त्यातलं मार्दव विलक्षण होतं. प्रत्येक शब्दाला हृदयाचा गंध होता.

रांचीला आल्यावरच त्यांनी उत्तर भारतीयांची भाषा आत्मसात करायचा निश्चय केला. आधी मिळाली ती सगळी शाळेची पाठ्य-पुस्तकं. यासाठी फादरनं दोस्ती केली बच्चे

लोकांशी. मुले जे जे बोलतात ते ते आपल्याला समजावं असा त्यांनी आपल्या मनाशी हट्ट धरला. ऐकला शब्द की ठेवायचा पक्का मनात. हा प्रकार तीन वर्षे केला. १९३८ हे साल केवळ हिंदी आणि संस्कृत वाचण्यात घालवले. फादरना आपल्या जीवनातलं हे सर्वांत भाग्याचं वर्ष वाटतं. कारण यावर्षी त्यांनी अखंड वाचलं. संस्कृत आणि हिंदी अक्षर वाङ्मय.

गंमत म्हणजे ही सगळी अजब जिद्दीची वाटचाल करीत असताना फादर कामिल बुल्के मिशन शाळेत प्रौढांना इंग्रजीतून गणित शिकवायचे. फावल्या वेळात हिंदीचं वेड. मिळेल ते वाचायचं. बोलायला कुणी मिळाला की मनसोक्त हिंदी बोलायचं आणि हिकमतीनं हिंदी साहित्य संमेलनाची एक एक प्रचार परीक्षा पार करायची. साहित्य विशारद झाल्यावर स्वारी कलकत्त्याला काली. संस्कृत घेऊन बी ए. झाली. ही १९४५ सालातली गोष्ट. लगेच अलाहाबादेला येऊन त्यांनी एम्. ए. चा अभ्यास सुरू केला. झोळ-घोळ कपड्यातील हा पाद्री माणूस गंगाजमनी वातावरणात रमून गेला. त्याची तुलसीभक्ती इथं अधिकच उजळली. एम्. ए. होऊन त्यांनी प्रबंधासाठी विषय निवडला ' रामकथा उद्भव और विकास. '

फादर बुल्के यांच्या प्रबंधाला मान्यता मिळाली. १९४९ साली अलाहाबाद विद्यापीठाने त्यांना डी. फिल्. ही पदवी दिली. पुढल्याच वर्षी हा ग्रंथ विद्यापीठाने प्रकाशित केला.

वैदिक साहित्यातील रामकथा, वाल्मीकि रामायणाची पाठचिकित्सा आणि कालनिर्णय, आदिकवीचे जीवनचरित्र आणि त्यांच्यानंतरच्या महाभारत आणि पुढील बौद्ध जातक व जैन

वाङ्मयांतील रामकथेचा साद्यंत विचार करून डॉ. बुल्के यांनी देशीविदेशी विद्वानांच्या मतमतांतरांचाही ऊहापोह केला आहे.

रामकथेचा असा क्रमबद्ध विकास सादर केल्यानंतर फादरनी या कथेशी संबंधित अन्य धार्मिक कथांचा आणि ललित साहित्याचाही आढावा घेतला. पुढे तिबेट, खातून, हिंदेशिया इत्यादि आशियाई मुलखांतील रामायण-प्रचाराचा आणि प्रभावाचा विस्तृत परामर्शही त्यांनी घेतला आहे. रामकथेविषयी चिकित्सक असे सर्व काही असणारा हा ग्रंथ रामसाहित्याचा विश्वकोश म्हणून हिंदी अभ्यासक गौरवितात. त्यात अतिशयोक्ती नाही.

प्रबंध-प्रकाशनानंतर फादरनी रामकथेचा निरोप घेतला नाही किंवा पदवीचाही बडिवार मानला नाही. रांचीच्या सेंट झेवियर कॉलेजमध्ये हिंदीचे अध्यापन सुरू करून त्यांनी पुनश्च आपल्याच प्रबंधाचा सखोल अभ्यास सुरू ठेवला. १९६२ साली म्हणजे तब्बल बारा वर्षांनी त्यांनी आपल्या ग्रंथाची दुसरी आवृत्ती प्रकाशित केली. त्यांचा राम-कथेचा व्यासंग पुढेही चालूच राहिला आहे. आपल्या ग्रंथाची तिसरी आवृत्ती हा नवा प्रबंध ठरावा अशी त्यांची जिद्द आहे.

फादरनी एक ‘ अंग्रेजी-हिंदी कोश ’ प्रकाशित केला आहे. इंग्रजी शब्दांना अत्यंत काटेकोरपणे सादर केलेले संस्कृतनिष्ठ पण अकृत्रिम हिंदी पर्याय आणि मूळ इंग्रजीचे विशुद्ध उच्चार त्यांनी दिले आहेत. हा महाकोश एखाद्या नामवंत संस्थेच्या वर्षानुवर्षे मेहनतीचे फलित ठरावा असा आहे. प्रत्यक्ष अध्ययनातून एक एक शब्द वेचल्यामुळे या ग्रंथाचे मोल फार वाढले आहे. फादरनी

हिंदीचे एक अलक्षित दालन आपल्या अखंड व्यासंगाने समृद्ध केले आहे.

एकदा मजेत त्यांनी मॅटरलिंकच्या ब्लूबर्ड नाटकाचे हिंदी रूपांतर केले होते होते. बायबलच्या हिंदी भाषान्तराचा फक्त पहिलाच खंड प्रकाशित केला. तसे त्यांचे ग्रंथभांडार इतकेच. रामकथा हाच खरा त्यांच्या ध्यासाचा विषय.

मी त्यांना सहज म्हटलं, "यापुढे काही करणार आहात?"

पांढरीशुभ्र दाढी कुरवाळीत निळ्याभोर डोळ्यांत मला सामावित फादर म्हणाले,

'जेव्हा रामकथा लिहिली तेव्हा मी अथवा ४५ वर्षांचा तरुण होतो. आजही तसाच साठीत तरुण आहे. ईश्वर मला तुलसीदासांवर लिहायला आयुष्य देईल, असा मला भरवसा आहे.'

तुलसीदासाच्या अभ्यासाकडे कसे आलात असा जेव्हा मी प्रश्न केला, तेव्हा फादर पुन्हा स्मृतीच्या शाळेत हरवले आणि म्हणाले,

'खूप वर्षं लोटली. ३२-३३ साल असेल. विश्वसाहित्याचं एक संकलन वाचीत पहुडलो होतो, त्यातल्या चार ओळींवर मी थबकलो.

"धन्य धन्य जनम जगतीतल तासु ।
पितहि प्रेमादुचरित सुनि जासु ।
चारि पदारथ करतल ताके ।
प्रिय पितु मीत प्राणसम जाके ॥

मातापितरांच्या अपार ऋणाची महती सांगणाऱ्या या मृदुमधुर पंक्ति माझ्या हृदयात अगदी कायमच्या उतरल्या. किती निर्मळ विमल शब्द आणि किती मुलायम भावनाबळ आहे हे, असे म्हणून मी त्या उदात्त शब्दकाराला मनोमन हात जोडले आणि निश्चय केला की, या ओळींचा पाठलाग करायचा. त्यांचा लेखक हा माझ्या मननचिंतनाचा विषय व्हायला हवा. "

रांचीला आल्यावर फादरना रामचरित-मानसाचा हिंदी जनसागरावरील अद्‌भुत प्रभाव प्रत्यक्षच पाहायला मिळाला आणि मग तुलसीरामायण त्यांच्याही नित्य पठणात आले.

मी पाहत होतो, तो ऋषितुल्य परदेशी पुरुष अधूनमधून डोळे मिटायचा. अलगद हातवाऱ्यांनी रामायणातला एखादा छंद आळवायचा, म्हणायचा की याला जोड असेल का ? अश्रुसिक्त डोळ्यांना वाट करून देत ते सांगत होते–

' रामायण ही एक विलक्षण जादू आहे. आज आपल्या देशाची कशी परिस्थिती आहे ? कुठं गेलंय स्वातंत्र्यापूर्वीचं तेज ? आम्ही इतक्या लवकर प्रांतीय बनून जावं ? रामायण आजही आम्हांला आदर्श सांगू शकेल. ऐक्याचा आणि सामर्थ्याचा संदेश सांगणारं दुसरं काव्य कोणतं असेल ?

फादर क्षणभर थांबले. नंतर पुन्हा हरवल्यासारखे वाटले.

' एक भरोसो एक बल. एक आस बिस्वास ।
स्वातिसलिल रघुनाथवर चातक तुलसीदास ।।

आणि मला वाटतं, तुलसीचा हात धरून मी येशूच्या मंदिराकडे निघालो आहे. तुलसीचा राम आणि माझा येशू यांत

मला फरक शोधून आढळत नाही. खरं सांगतो, तो फरक मला कधी दिसलेला नाही. ''

हिमालयापारचे डॉक्टर बुल्के हे सगळं बोलताहेत. एक ख्रिस्ती फादर हे सांगतो आहे. त्याचा पांढराशुभ्र वस्त्रसंभार मला ही जाणीव सारखी करून देत होता. पण ते खरं होतं. ते बोलणं मनाच्या–एका पाक मनाच्या–गाभाऱ्यातून प्रकटलेलं होतं. एक भारतीय विचाराच्या ख्रिस्ती मिशनऱ्याचं ते म्हणणं होतं.

मी भाषेच्या भांडणाबद्दल विचारून घेतले. फादर उमाळ्याने म्हणाले,

'आम्ही भाषेच्या प्रश्नावर रणं का माजवावीत हेच मला उमगत नाही. आज चाळीस वर्षे मी हिंदी भाषी प्रांतात रमून गेलोय. मी हिंदी भाषीच नव्हे का ? लोक माझी ओळख करून देतात, हे विदेशी असूनही तुलसीचे आणि रामाचे चांगले अभ्यासक आहेत. मला हे टोचतं.'

फादर बुल्के यांच्या विचारांतील राष्ट्रीयत्व ओजस्वी आहे, म्हणून परक्या मिशनच्या या देशातल्या उद्योगासंबंधी मी त्यांचे विचार जाणून घेतले.

'भारतीय ख्रिस्ती हा माझा आदर्श आहे. हा देश तसा फार उदार आहे. इथं नाना धर्मपंथांना खरेखुरे स्वातंत्र्य आहे. आज शतकं लोटून गेली, तरी इथली सहिष्णुता तिळमात्र कमी झालेली नाही.

'ख्रिस्ती हा तर एक आशियाई धर्म. भारतात मुद्दाम असा याचा प्रचार तो काय करायचा ? आणि परदेशी आचार-

विचारामध्ये राहून धर्माचा प्रचार करता येईल का ? इथं यावं, इथलं व्हावं, इथल्या जनभाषेशी, जनमनाशी, समस्यांशी, संस्कृतीशी एकरूप व्हावं, असा भारतीय ख्रिस्ती माझा आदर्श आहे. त्याची भाषा भारतीय असेल, त्याचा धर्मविचार ख्रिस्ताचा असेल पण तो त्याचा व्यक्तिगत दृष्टिकोन. जुलूम-जबरदस्तीचा उद्योग नव्हे.'

मी थक्क होऊन ऐकत होतो. मला कामिल बुल्के क्षणभर रेव्हरंड टिळकांसारखे दिसायला लागले. 'मी भारतभूमीचा आधी. माझा इतिहास, भूगोल, संस्कृती भारताची. माझी पहिली निष्ठा भारत. मी इथल्या परंपरांचा अभिमानी. जसा विष्णूचा उपासक, शिवाचा साधक, तसाच येशूचा भक्त', असे म्हणणारे रेव्हरंड टिळक मला फादरच्या ठिकाणी दिसत होते.

'जर्मनीतला मिशनरी आधी जर्मन असतो. आयर्लंडमधील धर्मप्रचारक आधी आयरिश देशभक्त असावा लागतो. कुणी भारतीय मित्र जेव्हा आमच्या मिशन स्कूलकडे इंग्रजी शाळेसाठी अर्ज करतो, तेव्हा मी व्यथित होतो. अरे आम्ही आमचं ज्ञान द्यायचं तर ते इथल्याच भाषेत नको द्यायला ?

फादर यांच्या शब्दाशब्दात त्यांचे भारतीयत्व प्रकटले होते. त्यांचे जीवन एखाद्या तपस्वी ऋषीला शोभावे असे आहे. त्यांचा धर्म वेगळा असेल, पण त्यांचे मन आणि विचार राष्ट्रीय आहेत.

फादर बुल्के यांचा निरोप घेताना उगाच अस्वस्थ वाटलं. आम्ही काही वेळ अबोल पाहिलं एकमेकांकडे. फादर जाता जाता म्हणाले, 'गंमत सांगू ? चौदा वर्षांनी एकदा मी गेलो होतो

माझ्या घरी. वडील एकदा मला अखेरचं पाहायचं म्हणत होते. गेलो. बरंही वाटलं. नात्यागोत्याच्या लोकांना भेटलो. पण मला तिथं करमेना. लवकर आलो परत.'

ही गंमतच म्हणायची. एरव्ही तुम्ही-आम्ही या प्रकाराचा अधिक काय विचार करावा ? मी मनात म्हणालो हा या देशाचा अजब नागरिक आहे. आपल्याला थोडेफार असं व्हायला हवं नाही ?

'रविवार केसरी' २२ एप्रिल १९७३

卐 卐 卐

निर्मळ कार्यकर्तृत्व आणि अपार स्नेह

शेटे वकील

कार्यकर्ता म्हटलं की त्याच्या अंगोपागांतून त्याचा पक्ष स्पष्ट व्हायचा. त्याचे ते कपडे, बोलण्याचे विषय, विशिष्ट पद्धती, हावभाव, मित्रमंडळ आणि शत्रूपक्षसुद्धा अगदी ठराविक असायचे. त्याने सदैव घाईगडबडीत दिसायचे. कुठेच नेमक्या वेळी म्हणून नसायचे....सामान्यतः वकील वर्गातील उत्साही-मंडळी कार्यकर्तेपणाकडे स्वाभाविक ओढीने येतात. वकिली आणि सामाजिक कार्याचा मेळ बहुधा स्वांतःसुखाय साधला जातो. अशी नमुनेदार 'माणसं' किती म्हणून दाखवावीत ?

....पण आमचे सत्तरीपलीकडे आलेले शेटे वकील अशा छापाच्या कार्यकर्त्यांहून अगदी वेगळे, हे त्यांना पाहाताच जाणवेल.

तशी आकृती-प्रकृती, वळणाची. डोक्यावर टोपी. साधे धोतर. सदराही तसाच. मळखाऊ रंगाचा कोट. या रूपात फारसा बदल होणे नाही. चेहरा सदैव प्रसन्न. हसणेही मन-मोकळे. त्यावेळी डोळे जरा बारीक करतात. मग आपल्याशीच

डोलतात. नंतर गोडसा अभिप्रायाचा शब्द. त्यातून स्वच्छ मन सरळ बाहेर झेपावते.

वकिलीची पन्नाशी सरत आलीय. वकील म्हणून त्यांचा मान काही कमी नाही. धंदा अगदी काटेकोर व्यवहाराने केला नाही तरी त्यांची ती पहिली निष्ठा. तिथे उगाच इतरोद्योगाचा मोहपाश नाही, पण वकिलीपण अकरा ते पाच. त्यापलीकडे आम्हांला माहिती आहेत ते कार्यकर्ते शेटे. साहित्यप्रेमी शेटे. जिज्ञासू शेटे ! सुखवस्तू माणसं एरव्ही क्लबात पत्ते कुटतात. त्यातल्यात्यात सात्त्विक आचरण म्हणजे काठी फिरवीत फिरावयास जाणे. उगाच आपल्याला कुणाचा काही आणि आपलाही दुसऱ्याला उपद्रव नको. पण शेटे क्लबाऐवजी सभांत येऊन बसतात. ‘ स्थानिक ’ वाचणं हा बहुधा त्यांचा दिवसाचा पहिला कार्यक्रम. आणि वाचणं हा बाकी साऱ्या रिकाम्या वेळचा उद्योग. बरं त्यातही काही सोवळेओवळे नाही. जे जे चांगले ते ते ऐकायला ते जातील. कुठेच काही नसेल तर ग्रंथालयात दिसतील. जे दर्जेदार मिळेल ते वाचतील.

तुम्हांलाही चांगल्या पुस्तकाची शिफारस करतील. अलीकडची गोष्ट. महाराष्ट्र सरकारची पारितोषिके जाहीर झालेली. शेटे दादांनी तमाम पुरस्कृत पुस्तके पाहिली. ‘ अग जे कल्पिले नाही ’ ही त्यांची खास शिफारस. एका ख्रिस्ती बांधवाने आपल्या पूर्वजीवनाच्या आधारे हिंदू समाजावर केलेली टीका त्यात आहे. पण दुर्मिळ अनुभव कथन म्हणून दादा त्या पुस्तकाबद्दल बोलत होते. हे शेटे वकील आंबगाव जवळच्या धामणीचे. जन्म ९ मे १९०८. वडिलांची सावकारी. कुटुंब एकत्र.

संगमनेरला शिकून पुढे मॅट्रिक पुण्याच्या नू. म. वि. मधून झाले. फर्ग्युसनमधून बी. .ए. आणि नंतर एल्एल्. बी. मिळविली. ही गोष्ट ३२ सालची. व्यवसायात पडण्यापूर्वी विद्यार्थी शेटे कार्यकर्ते झाले. याज्ञवल्क्य आश्रमात गेली बेचाळीस वर्षे आहेत. चाळीस साली शेटे कुलवृत्तांत आणि गोत्रावलीच्या गडबडीत होते. ४५ मध्ये अ. भा. विद्वद् परिषदेचे एक चिटणीस बनले. ४६ पासून ५३ पर्यंत पुणे नगरवाचन मंदिराचे मंत्री. पुढे अध्यक्ष. मंदिराची देखणी इमारत झालीय. तिला काही चिरे शेटयांच्या कष्टाचे. महाराष्ट्र ग्रंथालय संघ स्थापण्यात शेटयांचा पुढाकार होता. थेऊरला रमामाधवांची स्मृती साजरी करण्याची कल्पना निघाल्यापासून शेटे त्यात पुढे आहेत. ही गोष्ट आता तीस वर्षांची झालीय. महाराष्ट्र ब्राह्मण सभा, सिद्धिविनायक संस्था आणि धर्मनिर्णय मंडळही त्यांनी आपले म्हटले. तिकडे वकील लोकांच्या बार क्लबची धुरादेखील शिताफीने सांभाळून शेटयांनी तिथे मराठी ग्रंथालय कलामण्डल सजवलंय.

शेटे वकिलांनी म. सा. परिषदेसाठी अगदी मनापासून काम केलं. वा. दा. गोखले आणि जोश्यांच्यानंतर इतकी मेहनत घेणारा दुसरा कार्यकर्ता दाखवता येणार नाही. ६१ ते ६७ ते चिटणीस होते. सातारा, मडगाव, हैद्राबाद इथं भरलेल्या संमेलनात त्यांनी भरपूर कामं केली. साहित्य चर्चा मंडळ सुरू करणारे तेच. हीरक-महोत्सवाची प्राथमिक तयारी करण्यात मोठा वाटा त्यांचा.

परिषद सांभाळीत असतानाच शेटे भारत इतिहास संशोधक मंडळाची चिटणीशी करीत. निवृत्त झाल्या झाल्या आयडियल एज्यु. सोसायटीच्या कामाला लागले....या सर्व निधी गोळा करण्या-

पासून भांडणं मिटविण्यापर्यंत सर्व कटुकर्तव्ये पाळण्यात शेटे आघाडीवर.

असेच कितीतरी संस्थांत ते गेले. मिळाले ते काम केले. झाले तेव्हा बाहेर आले. उगाच रेंगाळले नाहीत किंवा जमले नाही तरी चिकटून बसले नाहीत. कुठून भांडाभांडी अनावर झाल्याने त्यांच्यावर प्रवेश बंदीची पाळी आल्याचे ऐकिवात नाही. उलट एक सरळ माणूस असा त्यांचा दरारा. आता केवळ याच एका अवगुणामुळे त्यांचे अवमूलन करून मंडळी त्यांना बाजूला सारण्यास पुढे आली तर नवल नाही. त्याचे काही शेटचांनाही वाटले नाही.

संस्थेच्या डबघाईच्या प्रचंचात आपले सारे कौशल्यपणाला लावून अडीअडचणी दूर करण्यात समाधान मिळणारा हा माणूस तसा फार मोठा धनवंत किंवा ज्ञानवंत नव्हे. पण स्वतःच्या चरित्र-चारित्र्याने धनवंताची आणि राजमान्य बहुजनांचीही मैत्री संपादन केलीय. ज्ञानियांच्या सभेत वावरून त्याच्या उघड्या दर्शनात जो भंपकपणा दिसतो तो चक्क डोळ्यांआड करून ते तिथं काही घेण्यासारखे आहे, त्यावरच लुब्ध झाले. आपल्या वकिलीचा ११ ते ५ आणि संस्था संसाराचा फावल्या घटकांचा उद्योग सावरीत शेटे कितीतरी वाचीत राहिले. खास वक्ते नव्हेत. आभार उत्तम मानतात. कुणाला विसरत नाहीत की कुणावर घसरत नाहीत. व्यवसायी लेखक नाहीत, पण जेवढे जमले जाणवले तेवढे लिहीत गेले. त्या लेखनाचा आपल्या लेखी हिशेब राहावा हा आग्रह नाही, पण तब्बल पंचाहत्तरावर लेख झालेत, त्यांत पाक-चीन काश्मीरच्या प्रश्नापासून ऋग्वेद रचनेच्या काळापर्यंतची

मुशाफिरी आहे. रामायण, गीता, विष्णुपुराणावर वाचून टिपणे काढली, तर कधी आधुनिक वाङ्मयाचे आपले आकलन निर्भीड-पणे मांडले. आगरकरांचा सामाजिक सुधारणावाद त्यांनी स्पष्ट करून सांगितला, पण महात्मा फुल्यांकडे द्रष्टेपण देण्यासही विसरले नाहीत. शिवाजी महाराजांची अलौकिक कामगिरी दाखवून ते आधुनिक काळातील हिंदुधर्माचे स्वरूपही आपल्या चिंतनाचा विषय बनवतात. डॉ.आंबेडकरांच्या राजकीय कर्तृत्वाचा, तर कधी युगपुरुष गांधींचा गौरव गाऊन आजच्या परराष्ट्रीय धोरणावर आणि विशेषत: आमच्या बगलेतल्या शेजाऱ्यावर ते लेखणी चालवितात. नेहरूंचे पराभव त्यांनी टिपले आणि आगामी तिसऱ्या युद्धाची मृत्युघंटाही ऐकवली.

अगदी हल्ली त्यांनी ज्ञानदेवांच्या जन्म सप्तशतीच्या निमित्ताने शासनाच्या ज्ञानेश्वर समितीवर मनापासून काम केले. शासनाची प्रकाशने त्यांच्यामुळेच सिद्ध होण्यात महत्त्वाचा हातभार लागला. इकडे त्यांनी स्वत: आपल्या घरी (देवी देवी हे ज्ञानदेवी-चंच नाव दिलंय घराला !) त्यांनी ज्ञानदेव जन्मसप्तशती साजरी केली ती सुरेख ज्ञानेश्वर चरित्र लिहून. त्या लेखनात विलक्षण साक्षेप आहे. सकलजनांना सहज समजेल रुचेलपचेल अशी भाषा आणि उत्तम तर्क आहे. कविस्वभावी न्यायाधिशानं ज्ञानदेवाचा निष्पक्ष परिचय करून द्यावा तसे लिहिणे आहे. आता ते महाराष्ट्रातील अलीकडच्या स्थित्यंतरापर्यंतचा विवेचक इतिहास लिहिण्याचा संकल्प सोडून बसले आहेत. हा इतिहास अमराठी भाषिकाची कुतुहलपूर्ती आणि समस्या समाधान करू शकणारा असावा अशी त्यांची धडपड राहणार आहे.

...८

या सर्व लेखनांत त्यांची श्रमशीलता आणि बहुढंगी आवड नजरेत भरते. सकळांना शहाणे करण्याची, आपणासी जे जे ठावे ते ते दुसऱ्याशी सांगण्याची अनिवार इच्छा प्रबळ दिसते. त्यांच्या लेखांची भलीमोठी जंत्री वाचली तेव्हा आपण एखाद्या सांस्कृतिक नवनीताच्या विशेषांकांची सूचीच पाहतो आहो, असे वाटते.

पण माझ्या मनी सदैव राहतात ते शेटे वकील असे बहुढंगी लेखक संपादक नव्हेत. मनावर बिंबले ते त्यांचे निखळ हास्य. शुद्ध विचारसरणी आणि निर्मळ कार्यकर्तृत्व. घरी जसे आपुलकीने वागावे तसेच संस्थेत. हे लोकांना फारसे जाणवत नसते. मंडळींना शोभेची नावं दिसतात. शोभाशील माणसेही अशा सच्छील कार्यकर्त्यांना चांगले ताबडवतात. वर संधी दिल्याचा नागोबा करतात. शेट्यांच्या लेखी असे आयते नागोबाही रागाचा विषय होत नाहीत. कारण कुठेही हा माणूस आंतरिक ओढीखेरीज गेलेला नाही. ज्ञानकलांच्या ओढीनं ओढाळ बनलेल्या मनानेच ते जगले आहेत. सुखदु:खांचा पाढा न म्हणता, आलेली अपयशे न रडता, आणि मिळालेले सुखसोहळेसुद्धा त्याच मनमोकळ्या ओढीनं त्यांनी उपभोगले आहेत. त्यांत कुठेही नखरेपणा नाही, की दांभिक विनय नाही. आहे तो सारा एका साध्यासुध्या माणसाचा स्वच्छ स्वभाव, विमल मन आणि लोकमंगल वृत्ती !

'रविवार तरुणभारत' ९ मे १९६८

卐 卐 卐

विद्यार्थी आणि पालकांचे स्नेहीसोबती

मोडक मास्तर

हजेरीपत्रक, फीचे हिशेब-ठिशेब, प्रगतिपुस्तकांचे नि वह्यांचे गठ्ठे, शाळेत येण्याची, असण्या-जाण्याची ठराविक वेळ, आपापला विषय आणि नाकासमोर चालणे. विद्यार्थ्याने केला नमस्कार आणि लक्ष गेले आपले तर बोलणे. थोडीशी विचारपूस. बहुधा 'तुला ओळखलं नाही' म्हणूनच सुरुवात. आणि मग पुढल्या बोलण्यात विद्यार्थ्याच्या खबरखुशालीपेक्षा स्वतःच्या अडीअडचणींचा पाढा किंवा मानमहात्मतेचेच बोलणे.

.... अशा अध्यापकांना आपण केव्हाच विसरतो. मग असे जे नसतात ते विशेष ध्यानी राहतात. नू. म. वि. तून निवृत्त झालेले श्री. कृष्ण वामन मोडक–'हिंदीचे मोडक मास्तर'– अशांपैकी एक. त्यांना आम्ही 'मास्तर' म्हणतो ते उगाच काहीतरी संबोधायचे म्हणून. ते आहेत आमचे दत्तक वडील. अज्ञान पालक. स्नेहशील साथी. अगत्यशील सोबती. आणि अशी ही कितीतरी नाती. सारी एकाच वेळी अनुभवाला आलेली. त्यातला जिव्हाळा, ओलावा, खास कोकणी आहे.

मास्तर आधी मालवण–रत्नागिरीकडे अध्यापक होते १९४८ ला नू. म. वि. त आले. सव्वीस वर्षे एकच एक संस्था. ध्येयवादी शिक्षकत्व. सर्वांच्या बरोबर सहकार्याचा प्रयत्न. मोठ्या थोरल्या संस्थेत हे मुळातच कठीण असते. याला सांभाळावे तर त्याला कसे वाटते. त्याला सहकार्य द्यावे तर याला ते आवडत नसते. अशा वेळी सर्वांबरोबर असावे, पण त्यांच्यातीलच एक नसावे, ही दृष्टी उपयोगी ठरते. मास्तरांपाशी ती भरपूर आहे. ते सर्वांच्यात उठतील-बसतील, पण कुठल्याच गटात, वादात वा संप्रदायात स्वत:चे स्वत्व हरवून बसणार नाहीत. अशा वागण्या-तून काही मंडळी रागावतात–कारण त्यांना मास्तरांसारख्यांचा ‘ उपयोग ’ करून घेता येत नसतो. पण मास्तरांसारखी माणसं या राग–रुसव्याची पर्वा न करता आपलं नेहमीचं वागणं सुरू ठेवतात.

हिंदी, गणित हे त्यांचे खेळकरपणे शिकवण्याचे विषय. मुलांच्यात रमण्याशी वृत्ती. कोकणातून नुकतेच यावेत असा आत्मीय आवाज. प्रसन्न हास्य, आनंदी वागणे. खादी पेहराव. शुभ्र खादी टोपी. साधेपणामुळे आलेला सहज भारदस्त प्रभाव.

मास्तरांना शिक्षक पेशाचा अभिमान. संस्थेचाही. सतत सहकारी आणि विद्यार्थी यांच्याविषयी आपुलकीने बोलताना त्यांना ऐकावे. पण त्याहीपेक्षा त्यांचे दुसऱ्यासाठी धडपडणे हे लक्षात राहण्यासारखे आहे.

भाषाशिक्षक सहसा खेळाच्या मैदानावर दिसत नाहीत. दिसले तर खेळगडी होणे त्यांना अवघड. पण मास्तर उत्तम क्रीडाशिक्षक. लंगडी, खोखो, आट्यापाट्या, हुतुतू अशा देशी

खेळांत त्यांना मनापासून रस. मुलांना गोळा करून संघ करायचे, सराव घ्यायचा. मास्तरांचा हा छंद आजही आहे. त्यांचे कितीतरी खेळाडू विद्यार्थी डॉक्टर, इंजिनियर, वकील, प्राध्यापक आहेत.

मास्तर पंचाहत्तर साली शाळेच्या सेवेतून मुक्त झाले, पण निवृत्ती हा त्यांचा स्वभाव नाही. अजूनही ते नेहमीप्रमाणे खेळाडूंच्या, हुषार विद्यार्थ्यांच्या, अध्यापक सहकाऱ्यांच्या सहवासात आहेत. अडीअडचणी सोडवण्यासाठी आहेत. आनंदाने आनंद वाढवण्यासाठी आहेत. शाळेचे खेळाचे संघ घेऊन दूर सफरी करतात. नुकतेच हिमाचल प्रदेशात जाऊन आले. मध्ये एकदा पाटण्याला गेले होते. जेथे जातात तिथे चांगले स्नेह जोडतात. येताना काही आणले तर स्नेह्यांना देऊन टाकतात. उत्साह तरुणाचा. दातृत्व सहसा चार-चौघात आढळणार नाही असे ! मध्यंतरी स्कूटर्सच्या किंमती भडकल्या, तेव्हा आपल्या नावावर आलेली स्कूटर त्यांनी चक्क पै-पैसा न कमावता एका विद्यार्थ्याला देऊन टाकली. विद्यार्थ्यांना जागा घेण्यासाठी पैसे उभे करून देणे, त्यांच्या जामिनक्या सांभाळणे, कुणाच्या कार्यात पुढाकार घेणे या गोष्टी करणारे मास्तर विलक्षण वाटावेत असे स्वयंसेवक ! देण्याघेण्याची बात नसे. सारा मामला प्रेमाचा, उदार आपलेपणाचा. निर्मळ सात्त्विक समाधानाचा. प्रसंगी पदरमोड करूनही अडचणीत आधार देणारे मोडक मास्तर म्हणजे सचोटीबरोबर स्नेह आणि नम्रतेबरोबर प्रसन्नता.

याच विमल भावनाशीलतेमुळे अलीकडे मास्तरांनी नवीनच उद्योग सुरू केला आहे. अफाट आहे तो !

ते जातात वरचेवर कोकणात–रत्नागिरीतल्या मालवणाकडे. इथे आडवाटेला लहानगा कांदळगाव आहे. तिथे एक डोंगर माळ आहे. उघडा बोडका. वर्षानुवर्षे कष्टकऱ्याच्या वाटेकडे डोळा भरू पाहणारा. मास्तर या वाडवडलांच्या माळावर एकसष्टीत माडापोफळीची बाग फुलवताहेत. होतील दहा-वीस वर्षांनी झाडं तयार. खातील कुणीही. स्वतःचीच मुलंबाळं खायला असावीत हा भावच नाही. जुन्या पडक्या घराला त्यांनी नवी शाकारणी केली आहे. तिथे कोण कायम राहणार, हा प्रश्न. पण मास्तरांच्या मनात तो येत नाही. कुणी आणला तर ते त्याची कीव करतात. अजब हिशेब आहे. गाव जगायला हवा. गावकी नको. गावी शाळा छान असावी, ग्रंथालय मोठे व्हावे. कितीतरी योजना आहेत. गोरगरिबांसमोर, पुढल्या पिढ्यांसमोर चांगला आदर्श राहावा ही धडपड. मग भलेही त्यात स्वतःचा वेळ जावो. पैसा संपो. दगदग होवो. सारे वडिलांच्या नि येणाऱ्या पिढ्यांतील गावकरी भाऊबांधवांसाठी सार्थकी लागेल ही भावना. शहरात दंग असलेल्यांना मास्तरांचा हा नवा प्रपंच अपरूक वाटल्याशिवाय राहणार नाही.

मास्तर महात्माजींच्या विधायक राष्ट्रवादी विचारपरंपरेत वाढले. वयाच्या विशी–पंचविशीत मालवणात असताना त्यांनी हिंदी आणि खादीचे व्रत घेतले. त्यांच्या खादीचा आणि कुठल्याही पक्षाचा संबंध नाही. खादी आणि गादी किंवा खुर्ची यांचा संबंध दृढ झाला आणि अनर्थ ओढवला असं ते मानतात. खादी म्हणजे सत्यशील वृत्ती. स्वावलंबनाचा आणि साधेपणाचा पुरस्कार. हिंदी ही बहुजनांची भाषा. जनताजनार्दनाची वाणी. तिचा प्रचार

म्हणजे राष्ट्रीयतेचा प्रसार अशी.... त्यांच्या निष्ठा आजही कायम आहेत.

महाराष्ट्रात चाळीस वर्षांपूर्वी हिंदीच्या प्रचार संस्था उभ्या राहिल्या. त्या मागच्या सत्त्वशील त्यागी प्रचारक शिक्षकांच्या पहिल्या-वहिल्या मंडळीत मास्तर होते. आपल्या पस्तीस वर्षांच्या शालेय अध्यापनातही मास्तर मुख्यत: हिंदी भाषाच शिकवीत राहिले. राष्ट्रभाषा सभेच्या परीक्षांचे वर्ग घेणारी त्यांची 'भारतवाणी हिंदी' संस्था चांगली चालली. विशेषकरून सरकारी नोकरांना हिंदी शिकविण्यात मास्तरांनी यश मिळविले. आज त्यांचे असंख्य विद्यार्थी कुठे कुठे अधिकारपदावर आहेत. मास्तर त्यांच्याकडे जातात-येतात ते नव्या विद्यार्थ्यांचे प्रश्न घेऊन !

मास्तरांनी जातपात कधीच मानली नाही. सोवळेओवळेही त्यांना शिवले नाही. त्यांची खादी, गांधी टोपी, बहुजनांविषयीचे प्रेम पाहिले की, ते कोणत्या पक्षाचे, असे कुतूहल जागे होते. पण आजचे सोडा. मास्तर केव्हाच कुठल्या वादात वा पक्षात ओढले गेले नाहीत. त्यांचा पक्ष एकट्याचाच-' प्रसन्न पालक ' हा पक्ष. अडल्या-नडल्या विद्यार्थ्यांचे करणे-सवरणे, हा कार्यक्रम. अपेक्षा नाही, हा संकल्प. त्यामुळे त्यांचे कुणाशीही जमते. उद्योग विधायक असेल तर त्यांचा सहभाग. जर विघातक असेल तर मास्तर दूर.

मला स्वत:ला तर मास्तरांनी अक्षरश: वडिलांची माया-ममता दिली. वीस वर्षांत माझ्या सर्व अडचणींशी सामना दिला. त्यासाठी आर्थिक झळ सोसली. विद्यार्थ्यांवर मुलासारखी माया करण्याचा मोडक पति-पत्नींचा छंदच आहे. विद्यार्थी त्यांच्याकडे

केव्हाही जावो. मास्तर स्वागत करतील. हवे ते देतील. नाहीची भाषा नाही. पालक त्यांच्याकडे गेले तर मास्तरांचे मित्र होतील. ज्यांना मास्तरांनी जीवनात यशस्वी केले असे त्यांचे विद्यार्थी-मित्र गुरुबंधूसारखे मला मिळाले. त्यांचीच संख्या कितीतरी आहे. मास्तरांची भूतदयाही विलक्षण आहे. त्यांच्या राहत्या घरी जाल तर मास्तर घरी नाहीत हे मांजरांच्या अस्वस्थेतून जाणवेल. शेजारचा कुत्रा स्वागतासाठी सिद्ध असेल, या साऱ्या घरच्या-दारच्या मुक्या प्राण्यांवरही त्यांची प्रेमाची पाखर आहे.

नू. म. वि. च्या सेवेतून निवृत्त होताना ते कृतार्थ होते. मुदतवाढ हा त्यांचा ध्यास नव्हता. केव्हा एकदा मुक्त होतो हा तर त्यांचा पिंडच नव्हे. म्हणजे साठीतही ते अखंड उत्साहमूर्ती आहेत. योगासने शिकवण्याप्रमाणे करण्याचाही त्यांचा दंडक आहे. देशी खेळांना राष्ट्रीय मानमान्यता मिळाव्यात म्हणून त्यांचा प्रयत्न आहे. आंदोलन, संघर्ष हा त्यांचा मार्ग नाही. निवृत्तीनंतरचा त्यांचा उद्योग हा राष्ट्रीय वृत्ती आणि निखळ त्याग यांचा मेळ दाखवितो. तर ध्येयवादावर प्रीती म्हणून वापरावयाची गांधी टोपी आणि खादी कपडे त्यांची निराळी प्रकृती प्रकट करतात.

केवळ स्वतःसाठी, नावलौकिकासाठी, किंबहुना सुखोप-भोगासाठीही खरा शिक्षक धडपडत नाही. विद्यार्थ्यांचा उत्कर्ष तोच त्यांचा सात्त्विक संतोष असतो. मास्तरांनी तो सतत मिळविला आहे. त्यामुळे त्याच सुशील सुकृतावर त्यांचा पुढला प्रवास सुखसमाधानाचा होणार आहे.

'रविवार तरुण भारत' ६ मार्च १९७७

卐 卐 卐

अद्भुत उद्योगात रमलेला लखनवी

नंदकुमार अवस्थी

लखनऊला आल्यावर या नवाबी नगरीची रंगत अनुभवण्या-आधी आम्ही निघालो, ते अवस्थीजींच्या मठीच्या शोधाला चऊ-पटियाकडे. लखनऊच्या जुन्यापुराण्या माड्या. त्या दोहो बाजूंनी असत तर रस्ता कसा संकोचलेला, त्यावर बेसुमार गर्दी. त्या गर्दीला धावधाव करायला लावीत इक्के टांगे सरपट दौडत चाललेले. रानी कटरा आला. अगदी जुन्यात जुनी वस्ती. तंग गल्लीबोळ. रस्ते गोमतीकडे उताराचे. तिथे गेल्यावर देखील 'भुवन वाणी ट्रस्ट' विचारला तशी अळम्टळम् झाले. जेव्हा अवस्थीजींच्या मठीत प्रवेश केला तेव्हाही तो पासष्टीपलीकडला प्रसिद्धिविन्मुख माणूस सहजी दिसलाच नाही.

सगळीकडे नाना अक्षरांचे खिळे. चारसहा माणसं अक्षरं जुळविण्यात बुडालेली. सगळ्या शाईने सजलेल्या त्या परिसरात बसायला एक कॉट आणि समोर छोटी बैठक. तिच्यावर मी विसावलो. नमस्कार-चमत्काराआधी लखनवी अदेनं पाहुणचार सुरू झाला. ओळखपाळख होण्यापूर्वीच भोजनाचा प्रबंध. माझ्या-

समोर बसलेला माणूस आपलं सरदारी वळण लपविणारा नव्हताच.

सत्तरीकडे वाटचाल सुरू झालेली. पण केस काळे. मन हिरवे. मिशा छपरी. नजर भेदक. पाणीदार बघणं. मोजकं पण मुद्देसूद बोलणं. हसणं मिशीतल्या मिशीत. सांगणं स्वतःविषयी फारसं नाहीच, पण जे चाललंय त्याबद्दल जबरदस्त आत्मविश्वास. समोरच्या ऐकणाऱ्याला सुसह्य होईल असा आत्माभिमानसुद्धा.

यांचं नाव नन्दकुमार अवस्थी. हे लखनऊचेच. त्यांच्या सात पिढ्या इथं गेल्या. १९०६ सालचा यांचा जन्म. पंधराव्या वर्षीच लग्न झालं. सतराव्या वर्षी नोकरी लागली. तीन वर्षात तिला रामराम ठोकला. शिक्षण असं शाळेत जाऊन झालं नव्हतंच. मोठं घर. माणसं बरीच. धाकटा भाऊ स्वातंत्र्यचळवळीत. त्याची झळ घराला लागत राहिली. ती सगळे जण सहर्ष सहन करायचे. बेचाळीसच्या आंदोलनात तर सगळं घर सहभागी झालेलं. हे असंच आयुष्य गेलं कष्ट करण्यात. मिळाली ती नोकरी करण्यात. फावल्या वेळी स्वाध्याय करण्यात आणि एका मोठ्या घराच्या परोपरीच्या जबाबदाऱ्या पार पाडण्यात.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर राजकारणाला रामराम केला आणि मग कुराणाचा अभ्यास मांडून बसले. अलीकडे पंचवीस-तीस वर्षे हेच चाललंय.

तसा अवस्थीजींच्या उद्योगाचा पाया भावुकच म्हणायचा. त्यांचा बंगालीचा थोडा अभ्यास. हिंदीला राष्ट्रभाषेचे पद लाभले तेव्हा ‘ ही भाषा आम्हावर लादली जाते ’ अशी कुरकुर जिथे होऊ शकते अशा भाषेचा हा अभ्यास त्यांना म्हणायला

लागला, ' आपली भाषा समर्थ अन् समृद्ध व्हायला हवी. खरं तर ती आपण होऊन इतर प्रांतांत पोहोचायला हवी. प्रांतिक भाषेबरोबर हिंदीही हवी असा आग्रह तिथली मंडळी करू लागावीत.' मग अवस्थीजींच्या मनानं घेतलं, बंगाली ' कृत्तिवासकृत रामायणा'चा हिंदी तर्जुमा करावा. मुसलमानांच्या उर्दू-प्रेमाला हिंदीची जोड मिळावी म्हणून अवस्थीजींच्या मनाने घेतले, अरबी कुराणाचे नागरी लिप्यंतर करावे. दोहाचौपाईत अनुवाद करावा.

अवस्थीजींचे अंदाज सरळ. भारतीय भाषांतील काव्ये, महाकाव्ये, अमर ग्रंथ हिंदीच्या माध्यमातून सर्वत्र पोहोचू शकतात या आनंदाने अहिंदी भाषिक हिंदीशी जवळीक साधतील. सभा, संस्था वगैरे वगैरेंच्या मागे न लागता अवस्थी स्वतःच एक संस्था झाले. वाडवडिलांची जायदाद ही या सत्कार्यास लावीत राहिले. राहिले. ' कृत्तिवास रामायणा'च्या पाच कांडांचा अनुवाद तुलसीदासाच्या धर्तीवर दोहोपाई शैलीत केला. छापला. विकला. मग पुन्हा कुराण काढून बसले. मुसलमान नागरीत वाचू शकले पाहिजेत. त्यांचा धर्मग्रंथ आणि भारतीय मुसलमान फारसी, अरबी आणि उर्दूपेक्षाही इथल्या प्रादेशिक भाषांजवळ आहेत हे उघडे गुपित त्यांना उत्साहित करणारे.

कुराणाचा अनुवाद आणि नागरी लिप्यंतर ही गोष्ट काही साधी नव्हती. जे जे त्यांना या कामी साहाय्यक भेटले त्यांनी अशुद्ध लेखनाची स्पर्धाच मांडली. शुद्धलेखनाचा घोळ. समजुतीचा गोंधळ. नुक्त्यांची मारामारी. अरबी अक्षरांची गुंतागुंत. उच्चारणासंबंधी गदारोळ. यांत आठ वर्षं काम मनासारखे होईना. यथेच्छ

पैसा गेला, उत्साहाला जबर सजा झाली. अखेर मरायला हवे आपण म्हणजे स्वर्ग दिसेल म्हणून अवस्थीजी स्वत: अरबीचा व्यासंग करू लागले. अरबी-फारसी शिकले. मग सोळा वर्षे कुराण हा एकच ध्यास. लखनऊच्या मौलवींची त्यांनी मैत्री मिळविली. पण नैष्ठिक मुल्ला-मौलवी त्यांना शंकाकुशंकांनी सारखे सुधारित राहायचे. कामाची प्रगती कूर्मगतीनं होत होती. अखेर शिया आणि सुन्नी पंथांच्या पंडितांनी आणि ' नद् वतुल उलेमा'च्या प्रमुख मौलानासाहेबांनी हिरवा कंदील दाखवला. पण हजार पानं छापायची कशी ?

सरकारी मदतीसाठी खेटचा घातल्या तेव्हा तर नको ती मदत, पण अर्ज आवरा अशी स्थिती होऊन गेली. अखेर त्या वेळचे केंद्रीय मंत्री श्री. फक्रुद्दिन अलि अहमद आणि महाराष्ट्राचे राज्यपाल अलियावर जंग यांनी वैयक्तिक मदत केली. अलाहाबादचे उद्योगपती मुस्तफा रशीद शेरवानी यांनी कृपेचे छत्र केले. दहा दिवसांचे चरणसिंग सरकार आले उत्तरेप्रदेशात, तेव्हा वीस हजारांची कृपा झाली. वीस वर्षांची अखंड मेहनत आणि पंचाहत्तर हजारांचा खर्च मार्गस्थ झाला.

अवस्थींचे कुराण मुसलमानांच्या सर्व गटांना मान्य झालेले आहे. त्यात शब्दश: हिंदी अनुवाद आहे, नागरी लिप्यंतर आहे. शिवाय मूळ कुराणाच्या प्रत्येक पानाचा ठसा आहे त्या त्या रूपांतरासमोर.

आता अवस्थीजी मनात आणतील तर मजेत प्रवास करून वर्षभरात कुराण खपवून दोन लाख रुपये मिळवितील. पण त्यांनी

केलाय ट्रस्ट. हळूहळू ‘ कुराण ’ आणि ‘बंगाली रामायण ’ खपते आहे. इकडे आता अवस्थीजींनी चौदा भाषांतली रामायणं लिप्यंतरासाठी समोर ठेवलीत. महाभारताचे देशी अवतारही त्यांच्या दृष्टीसमोर आहेत.

अवस्थीजींच्या ‘ भुवनवाणी ट्रस्ट’चे बहुभाषी मुखपत्र आहे. ‘ वाणी सरोवर.’ हिंदीबरोबर या सरोवरात मराठी, गुजराती, तमिळ, तेलगू, कन्नड, मल्याळी आहे. पंजाबी, उर्दू, काश्मिरी, आसामी आहे. उडिया, बंगाली, नेपाळीही आहे. फारसी, संस्कृतही आहे. या साऱ्या भाषांतले ग्रंथ क्रमशः आणि अंशतः नागरी लिपीतून, हिंदी अनुवादासह, राष्ट्रभाषेच्या सारस्वतात रुजू होत आहेत.

तामिळमधला ‘ वेद ’ म्हणून मान्य असलेला ‘ तिरक्कुरळ’ गोमती अय्यर गद्यात करीत आहेत. पद्य स्वतः अवस्थीच करीत आहेत. ‘ तुग्चत्त एळुत्तच्छन्’चे मल्याळी महाभारतही ‘ भुवन-वाणी’ तून अनुवादित आणि लिप्यंतरित होत आहे. कम्बनाचे तामिळ रामायण, आसामी माधवकंदलरी रामायण, काश्मिरी रामावतार चरित, पम्पकविकृत कन्नड जैन रामायण, रंगनाथाचे तेलगू रामायण, गिरिधरलिखित गुजराती रामायण, भानु-भक्ताचे नेपाळी रामायण आणि आपल्या श्रीधराचा रामविजय ही सारी रामायणभारती अवस्थीजींनी हिकमतीनं सिद्ध केली—हिंदीत भाषांतरून आणि नागरीत छापून.

“ जपुजी ” आणि ‘ सुखमनीसाहब ’ या शिखांच्या पवित्र ग्रंथांचा गुरुमुखीतील मूळ पाठ आणि ख्वाजा दिलमहंमद यांनी केलेला उर्दू पद्यानुवाद देवनागरीतून मुद्रित करण्याचा अवस्थी-

जींचा उद्योग नुकताच पूर्ण झाला. आता दाराशिकोहानं एकावन्न उपनिषदांवर फारसी भाष्य रचलं होतं त्या ' सिदं अकबरचं ' हिंदी रूपांतर करण्यात स्वारी दंग आहे.

असं बरंच चाललंय. त्यासाठी प्रांतोप्रांतीची माणसं जोडलीत. मोठा थोरला प्रेस उभारलाय. फाउंड्री घातलीय्. ' भुवनवाणी ' त्रैमासिकाचा प्रपंच विस्तारतो आहे. हा सगळा छांदिष्ट संसार अवस्थीजींच्या उत्साहाला सदोदित वाढावा देणारा. त्यांचा मुलगा विनयकुमार याच उद्योगात वाढतो आहे. पिताजींचा उद्योग वाढवावयाचा या जिद्दीनं जातोय.

अवस्थीजींनी आपल्या छपरी मिशात स्मित करून विनयाचं अभिवादन केलं आणि लगेच प्रुफांत आपली करडी नजर घातली. मला तो चेहरा त्या अफाट कामात चटकन गढून गेलेला दिसला. सत्तरी विसरलेला, ठणठणीत अंगकाठी आणि नजर शाबूत ठेवून दूरवर बघणारा. सभासंस्था-संमेलनाचा गाजावाजा नाही. ' तुम्ही आलात तर पाहा. बोला थोडं. जलपान करा. चलायचं म्हणताय् ? लागू द्यात आम्हांला आमच्या कामाला. तरी वीस-पंचवीस वर्षं अजून लागतील. तेवढी लागायचीच. तुम्ही सहज भेटलात, बरं वाटलं. '

'रविवार केसरी' ३१ डिसेंबर १९७२

卐 卐 卐

इतिहास जगविणे हाच एक उद्योग

माधवराव जोशी

इतिहास-संशोधक माधवराव जोशी जहागिरदार हे एक अगदी अपरिचित नाव. भा. इ. सं. मंडळात माधवराव कधी आले नाहीत. एकही कागद त्यांनी लिहिला नाही. वाचन मात्र अजून चालू आहे. सध्या वय वर्षे पासष्ट. अजून पंधरावीस वर्षे इतिहासाचे चिंतनमनन करणे सहज शक्य अशी प्रकृती. इतिहास हेच आरोग्याचे साधन.... पण इतिहासाला वाहून घेतलेला हा आडगावचा संशोधक कुणास ठाऊक नाही, हे मात्र खरं.

त्याचं असं आहे, माधवरावांना देखील धड ठाऊक नाही की, ते इतिहास-संशोधक आहेत. गावात एक नादी माणून एवढीच माहिती कायम आहे. पण तीही काही कमी नाही. त्यामुळेच तर आल्या-गेल्या मुसाफिराला मुल्हेरचा परिचय करून घेण्यासाठी गावकरी माधवरावांकडे धाडून देतो. अगदी माधवरावांशी वर्षानुवर्ष जमत नसलेला त्यांचा निंदक-मित्रदेखील पाठवून देतो आणि माधवरावही पहिल्या परिचयाच्या प्रस्तावनेत न पडता

पाहुण्याला आपल्याबरोबर इतिहासात घेऊन जातात. अगदी दारी आलेल्याला घरात नेण्यासारखे घेऊन जातात. कारण माधवरावांच्या मनाच्या बैठकीत सारा इतिहासच इथूनतिथून अंथरलेला आहे.

उद्या इतिहास विषयाचा एखादा डॉक्टर आमच्या माधवरावांच्या संशोधन कार्याचा आढावा घेईल, म्हटलं तर त्याच्या पदरी निराशाच यायची. एक तर माधवरावांना त्याच्यासाठी वेळ नसेल. दुसरे म्हणजे माधवरावांनी इतिहासकाळाच्या मागे धावण्याव्यतिरिक्त केले तरी काय ? आल्यागेल्याला सालेर मुल्हेर आणि बागलाणच्या उपेक्षित स्वराज्याच्या कहाण्या ऐकवून हलवून मात्र सोडले आहे. गावात इतिहास वाचणे, सांगणे, जगविणे, असा एक उद्योग केवळ तेच करतात, हे एक सांगता येईल. ' पट्टीचा ' संशोधक बागलणात आला तर माधवराव हा उत्तम गाईड ठरतो ' असा एक लौकिक यापलीकडे माधवराव हे वतने खालसा झालेले एक सामान्य जहागिरदार आहेत अनेक जोश्यांपैकी एक जोशी आहेत.

बागलाणच्या वीरभूमीचा कणन्कण माधवरावांनी पाहिला. कुठं काय आहे, कुठून किती अंतरावर आहे, ते तिथेच का आहे, असे संशोधकी हिशेब ते भराभरा सांगत सुटतात. साठी उलटून गेली तरी त्यांचा उत्साह तरुणाला लाजवील असा आहे. आमच्याबरोबर सोळा मैलांची पायपीट हसत हसत केली. त्यांनी आम्हांला मुल्हेरचा किल्ला केवळ दाखविलाच नाही, तर आमच्यासमोर तो सारा इतिहास उभा केला. दगडांचे ढीग त्यांना महालाचे ऐश्वर्य दाखवतात. कब्रस्थानांच्या आणि पीर-दर्ग्यांच्या जागी

त्यांना यावनी सत्तेची उन्नति-अवनती दिसते....आणि मग माधवराव डोळे किलकिले करून ती सारी चित्रे रंगवू लागतात.

त्यांच्या बोलण्याला कालच्याबरोबरीनेच आजची जोड असते. स्वराज्यानंतरची आमची वीस वर्षांतील स्थिती त्यांना सारखी डाचत असते. आक्रमण, प्रांतीयता, जातीयता, अन्नाचे परावलंबन, तलवारीने शत्रू कापावा तसे माधवराव या विषयावर बोलत राहतात आणि इतिहासाशी बेइमान झालेल्या नतद्रष्ट पुढाऱ्यांचा नावानिशी उद्धार करून–' जाऊ द्या झालं ' म्हणून सोडून देतात. त्यांचा खास शब्द ' विठ्ठल, विठ्ठल ! '

आणि त्यांच्या आतड्यांना पीळ का पडू नये ? लाथा मारून पाणी काढण्याची हिंमत असताना सारे ऐश्वर्य गेले. कल्पकता, कष्ट, योजकता, हुशारी सारे काही असताना एका कायद्याच्या खराट्याने माधवरावांची जहागिरदारी गेली. पण माधवरावांना त्याचं दुःख नाही. कसणाऱ्या कष्टकऱ्याची जमीन व्हायला त्यांची हरकत केव्हाच नव्हती. शेतकऱ्यांच्या आणि बहुजनांच्या नावाखाली आज जी मूर्ख माणसं सारे विधिनिषेध सोडून गबर होताहेत, समाजाला विकृत करताहेत त्याचं दुःख त्यांना आहे. ' लेको, तुम्ही व्हा मोठे ! पण जरा थोडा आचार ! विचार ! की आईबाप मारून मोकळे होणार ! अरे, आगी लावता घरादारांना ! ह्यासाठीच का तो गांधी रडला ? सुभाष झगडला ? '

सुभाषचंद्रांचं नाव काढलं की त्यांना भरतं येतं. आझाद हिन्द सेनेचे दिवस आठवतात. स्वतःचा जवानीतला पराक्रम

आठवतो....स्वातंत्र्यलढ्यात माधवराव हा बागलाणातला एक जळता निखारा होता. त्यांच्या शब्दावर मुल्हेरची पंचक्रोशी मुठी आवळायची. साहेब आणि साहेबांचे बगलबच्चे त्यांना हबकून असायचे. पुन्हा माणूस ताठ असा आणि सीधा की शिक्षा करायची म्हटलं तरी मामलतदाराची बुद्धि कुंठित व्हायची. मग त्यांनीच माधवरावांची वकिली करायची. साहेबाला चकवायचे. इकडे माधवरावांना विनवायचे, 'ही वेळ गेली. पुन्हा आगळीक करू नका ! ' पण माधवरावांचे आपले पुनश्च हरी ॐ ! एसेम्, लोहिया, गोरे इत्यादि मंडळींबद्दल बोलताना ते सहानुभूतीने बोलतात. या सर्वांना जमलं नाही म्हणून शेरा मारतात. पण बिचारी साधी माणसं म्हणून सोडून देतात. स्वातंत्र्यानंतर डांगच्या जंगलात माधवरावांनी दलितांच्या सेवेचे कार्य सुरू केले. पण सध्याच्या सवंग राजकारणाचा वीट आल्यावर तेथून बाहेर पडले. डांगचा मराठी मुलूख सौदेबाजीमुळे महाराष्ट्रापासून तोडला याचा त्यांना संताप आहे. पण गुजरात सडका करीत नाही, महाराष्ट्रापासून डांग कायमचा अलिप्त ठेवतो आहे म्हणून अधिक चीड आहे.

इकडे गावात माधवराव जहागिरदारांपेक्षा संशोधकीच जास्त करतात. घरोघरी खबदाडात पडलेल्या पोथ्यांची उचकापाचक करावी. एखादा कागद पाहून इतिहास लावावा, लोकांना चेतवावे, हा प्रिय उद्योग. माहिती अशी खडान् खडा की सगळे त्यांचे ऐकून घेतात, थक्क होतात.

मुल्हेर, हरगड, औरंगगडचे किल्ले ही माधवरावांची कर्मभूमी. सणक आली की ते एकटेच भटकत सुटतात. किल्ल्यां-

वरचे अवशेष किती शिल्लक आहेत, याची मोजदाद करतात. झाडझुडपांना सपासपा तुडवतात. सापाच्या ताज्या काती दिसल्या की बरोबरचा थबकतो, पण माधवराव आपले पुढे. केव्हा तरी मरायचेच आहे. इथं मरू. बिघडलं कुठं ? आणि या साऱ्या किल्ल्यावर काय कमी थडगी आहेत ? आले ते सारे गेलेच की ! डोळे किलकिले करून माधवराव हसतात. मुसाफिर म्हणतो–अजब मामला आहे !

' रविवार केसरी ' २८ जून १९७०

卐 卐 卐

शुद्धिपत्र

चुकीचा पडलेला शब्द व त्याचे ऐवजी बरोबर असलेला शब्द.
त्याची ओळ (वरून पाहावी.) दिला आहे त्याप्रमाणे वाचावे.

चुकीचा शब्द	**पृष्ठ**	**ओळ क्रमांक**	**बरोबर शब्द**
भनपासूनची	२१	१	गमभनपासूनची
परिसरात	२९	२	परिवारात
तसा	३३	२२	असा
महाग्नी	४१	११	महानग्नी
पुस्तक	४४	१८	पुस्तक-दुकान
स्वास्थ	४६	१३	स्वास्थ्य
‘ बाइम्स ’	५९	१०	‘ टाइम्स ’
माणून	६६	८	माणूस
त्यांना	६७	९	त्यांनी
संस्थाचे	६९	२४	संस्थांची.
परिवद्धर्ती	७७	१२	परिर्वाद्धत
अश्रूविना	७९	५	अन्नूविना
परभूत	८३	१५	परभृत
एकडयादुकटयाचा	८४	२१	एकटयादुकटयाचा
अजानबाहू	८७	१४	आजानबाहू
आदमी ही	८८	२३	आदमी हो
नियोगी	९१	५	निरोगी
फळफळावर	९१	२१	फळफळावळ
साठवतो.	९७	१६	साठवला.
धर्मासिंघाच्या	१००	२२	धर्मसंघाच्या
वाणि	१०१	१६	आणि
काली	१०२	१३	आली
जोश्यांच्यानंतर	१११	१७	चिं. वि. जोश्यांच्यानंतर
देवी देवी	११३	१५	देवोदेवी
दोहोपाई	१२३	१५	दोहोचौपाई